
कर्नाटक सरकार

शालेय शिक्षण आणि साक्षरता विभाग

पाठ आधारित मूल्यमापन साहित्य

2025-26






इयत्ता
9 वी

प्रथम भाषा - मराठी

राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण विभाग
बनशंकरी, तिसरा स्टॉप, बेंगळूर-560085
आणि
सरकारी शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालय, बेळगावी

GOVT. OF KARANATAKA

DEPARTMENT OF SCHOOL EDUCATION AND LITERACY

LESSON BASED ASSESSMENT MATERIAL

2025 - 26

SUBJECT: MARATHI

CLASS: 9

DEPARTMENT OF STATE EDUCATIONAL RESEARCH AND TRAINING,

BANASHANKARI 3RD STAGE, BENGALURU - 560085

AND

GOVT COLLEGE OF TEACHER EDUCATION BELAGAVI

FIRST LANGUAGE MARATHI

9 th Std

Lesson-Based Assessment Material (Question Bank)

Support and Guidance

<table>
<tr><td colspan="2">Smt. Rashmi Mahesh I.A.S.
Principal Secretary
School Education and Literacy Department</td></tr>
<tr><td>Dr. Trilokchandra K.V. I.A.S.
Commissioner, School Education Department,
Bengaluru</td><td>Sri. Gopalakrishna H.N.
Director
D.S.E.R.T., Bengaluru</td></tr>
<tr><td>GCTE BELAGAVI SUPPORT
PRINCIPAL
Shri Shreekant N
GOVT CTE BELAGAVI</td><td>Smt. RADHA P
S.A.D.P.I.
D.S.E.R.T., Bengaluru</td></tr>
<tr><td>Shri M. R. ALASE
Lecturer Govt CTE Belagavi</td><td>Smt. J. K. Chimmalagi Lecturer Govt CTE Belagavi</td></tr>
</table>

Resource Team

NAME	SCHOOL NAME
Shri. C. Y. PATIL : Reviewer	THALAKWADI HIGH SCHOOL, THALAKWADI
Shri. B. G. PATIL	VIDNYAN VIKAS MANDIR HIGH SCHOOL, BELAGAVI
Shri. M. S. KUMBHAR	CONTOMENT BOARD MARATHI HIGH SCHOOL CAMP
Smt. R. M. ASHTEKAR	MARKANDEY HIGH SCHOOL, MARKET YARD
Smt. R. S. KHORATE	SARASWATI GIRLS HIGH SCHOOL, BELAGAVI
Smt. P. B. SAYANEKAR	DYC BHARATESH HIGH SCHOOL, BELAGAVI
Shri. R. I. GURAV	B. K. MODEL HIGH SCHOOL BELAGAVI
Shri S. B. MULLA	SARDAR GOVT. HIGH SCHOOL, BELAGAVI
Shri. B. M. PATIL	MARATHI VIDYANIKETAN, BELAGAVI
Smt. S. R. DESAI	BALIKA ADARSH VIDYALAY, BELAGAVI
Shri. B. K. KAMBLE	PANDIT NEHARU HIGH SCHOOL BELAGAVI
Shri. S. L. NAREWADAKAR	RANGUBAI BHOSALE HIGH SCHOOL, BELAGAVI
SMT. M. P. KUGAJI	DILIP DAMALE HIGH SCHOOL, BELAGAVI
Cover page design : Ranjeet Chougule Govt. Sardar's High School Belagavi	
Editing Work : Y. K. Patil Leelavati V. karaguppikar High School, Agasage	

अनुक्रमणिका

गद्य विभाग

6.	ओळख	शांता शेळके यांचा परिचय करून देणे. बालमनाची निरागसता' समजून घेण्यास मदत करणे. अपरिचित व्यक्तीशी संवाद वाढविण्यास प्रेरित करणे. नातेसंबध समजून घेण्यास मदत करणे. स्थिर मानवी जीवनात अनपेक्षित येणाऱ्या संकटाची ओळख करून देणे.	**25**
7.	संत पुरंदरदास	संताविषयी अधिक माहिती मिळविण्यास मदत करणे संत साहित्य समजून घेण्यास सहाय्य करणे. परमेश्वरावरील निस्सिम भक्ती आणि त्याग समजून घेण्यास मदत करणे. संत पुरंदरदासांचा जीवन परिचय समजून घेण्यास मदत करणे	**28**
8.	बाबाखान दरवेशी	व्यक्तिचित्र हा साहित्य प्रकार समजून घेणे. व्यक्तिचित्र साहित्यातील पात्र, प्रसंग, घटना, यांचा समन्वय साधणे. प्राणी आणि मनोरंजन करणाऱ्या लोकांविषयी माहिती मिळविणे. प्राणीमात्रांवर दया करण्याचे सामर्थ्य विकसित करणे.	**31**
9.	वाचू आनंदे	वाचनाचे महत्व समजावून देणे. पुरातन ग्रंथाची ओळख करून देणे. ताम्रपट, शिलालेख, याबद्दल माहिती देणे. आधुनिक तंत्रज्ञान व पुस्तक यांच्यातील फरक समजावून देणे.	**33**
10.	उड़ती तबकडी अफलातून टोळी.	विज्ञान कथांची माहिती देणे. आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देणे. भारतातील शास्त्रज्ञांची माहिती देणे. विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासू वृत्ती निर्माण करणे.	**35**
11.	सा रम्या नगरी मॉस्को	प्रवासवर्णन साहित्याबद्दल माहिती देणे. जगातील इतर देशातील स्वच्छता, शिस्त, सौंदर्य यांची माहिती देणे. शहराचे ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक दर्शन घडविणे.	**38**
12.	यंत्र	दलित साहित्य प्रकार समजावून देणे. श्रमप्रतिष्ठा मूल्य समजावून आत्मसात करणे. यंत्रामुळे सामान्य माणसाच्या जीवनावर झालेले परिणाम समजावून सांगणे.	**41**

पद्य विभाग

अ. क्र.	पाठ्यघटक	अध्ययन निष्पत्ती	पृष्ठ क्रमांक
1.	अभंग त्रिदल	संत साहित्याची ओळख करून देणे. संतांचे कार्य समजावून देणे. प्राचीन पद्य साहित्याची ओळख करून देणे. परमेश्वर भक्तीचे महत्व समजावून देणे.	**45**
2.	सत्वर पाव गे मला	भारूड साहित्याची ओळख करून देणे. संत एकनाथांचे सामाजिक कार्य समजून देणे. भारूड गौळण साहित्याबद्दल आवड निर्माण करणे.	**48**
3.	सुश्लोक वामनाचा	मानवाची नम्रता आणि सुसंगत यांचा अभ्यास करणे. कवितेतून यमक अलंकारांची ओळख करून देणे. मानवी जीवन वाया न जाण्यासाठीचे उपदेश व सल्ले देणे.	**50**
4.	फटका	शाहिरी काव्याची ओळख करून देणे. अनंत फंदी यांच्या साहित्याचा अभ्यास करणे. सदाचार या मूल्यबद्दल माहिती देणे.	**54**
5.	अखंड	एकोणिसाव्या शतकातील समाजसुधारकांची माहिती होईल. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या समग्र साहित्याचा अभ्यास करणे, सत्य, ज्ञान, सदविवेक बुद्धी यांचा मानवी जीवनात वापर करण्यास प्रवृत्त करणे,	**56**
6	प्रेमस्वरूप आई	मातृ महिमा, मातृप्रेम समजावून सांगणे. माधव त्रिंबक पटवर्धन यांचा परिचय समजावून देणे. अनाथ मुलाच्या अवस्थेचे वर्णन करणे.	**60**
7	पोया	बहिणाबाई चौधरी यांच्या बोली भाषेचा अभ्यास करणे. भाषेतील गेयता, कल्पकता, कल्पनाविलास, बोलीभाषेचा गोडवा यांच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे. बहिणाबाईच्या कवितेतून ग्रामीण संस्कृती, ग्रामीण जीबन समजावून देणे.	**61**

8.	आचंद्रसूर्य नांदो	देशभक्ती मुलांच्या मध्ये जागृत करणे. देशभक्ती गीतातून स्वातंत्र्याविषयी देश प्रेम निर्माण करणे भारताचा पौराणिक ऐतिहासिक राजकीय इतिहास कवितेतून सांगणे ग. दि माडगूळकरांचे साहित्य समजावून देणे.	**63**
9.	हिरवळ आणिक पाणी	या कवितेतून निसर्ग सौंदर्य सृष्टीचे दर्शन घडविणे निसर्ग व मानव यांच्या भावभावनांची तुलना करणे बा.भ. बोरकर यांच्या साहित्याचा अभ्यास करणे निसर्गातील पाणी हिरवळ पशु पक्षी यांच्या मार्फत परस्परावरील प्रेम व श्रद्धा यांचे दर्शन घडविणे.	**65**
10.	सुंदर ते ध्यान	विडंबन काव्य प्रकार समजावून देणे. कवितेतून शेतकऱ्यांच्या कष्टाळूपणाची जाणीव करून देणे . पु. ल. देशपांडे यांच्या साहित्याचा अभ्यास करणे. शेतकऱ्यांच्या व्यथा समजावून देणे .	**67**
11.	माहेरची वाट	सासुरवासिनीच्या मातृप्रेमाबद्दलचे भावपूर्ण वर्णन समजावून देणे. स्त्री मनातील विरह, व्याकुळता, दु:ख, संवेदनशील चित्रण समजावून सांगणे. इंदिरा संत यांच्या साहित्याविषयी माहिती देणे. समानार्थी, विरुद्धार्थी शब्द ओळखणे.	**69**
12.	पाखरांनो तुम्ही	पर्यावरण संरक्षणाची जाणीव करून देणे प्राणी मात्रा विषयी भूतदया निर्माण करणे. विज्ञानयुगातील मानवाचा युध्दमान जीवन संघर्ष समजावून देणे. रमेश तेंडुलकर यांच्या साहित्या विषयी माहिती देणे.	**72**
12.	जग बदल घालूनी घाव	दलित साहित्याचा अभ्यास करणे, दलितांवर झालेल्या अन्याया विरुध्द लढा दिलेल्या व्यक्तींचा परिचय करून देणे. मुलांमध्ये एकीचे मूल्य निर्माण करणे.	**74**

(BluePrint)

खालीलप्रमाणे मराठी प्रथम भाषा – इयत्ता ९ वी साठी प्रश्नपत्रिकेचा आराखडा (BluePrint) दिला आहे.

प्रश्नपत्रिका आराखडा (BLUE PRINT)

प्रथम भाषा – मराठी | इयत्ता – ९ वी

एकूण गुण – १०० | वेळ – ३ तास १५ मिनिटे

1. उद्दिष्टानुसार गुणविभागणी

उद्दिष्टे (Objectives)	शेकडा (Percentage)	गुण (Marks)
स्मरण (Remembering)	21	21
आकलन (Comprehension)	36	36
अभिव्यक्ती (Expression)	39	39
प्रशंसा (Appreciation)	04	04
एकूण	100	100

2. विषयानुसार गुणविभागणी

विषय उपघटक	शेकडा	गुण	प्रश्नसंख्या
गद्य	34	34	14
पद्य	33	33	14
अपठित उतारा	04	04	01
व्याकरण	29	29	16
एकूण	**100**	**100**	**45**

- प्रथम भाषा मराठी पाठ्यपुस्तकात पूरक वाचन नसल्याने पुरकवाचनाचे 9 गुण गद्य व पद्य यामध्ये विभागले आहेत.

3. प्रश्नप्रकारानुसार गुणविभागणी व वेळ मर्यादा

प्रश्नाचे प्रकार	शेकडा	गुण	प्रश्नसंख्या	अपेक्षित वेळ
वस्तुनिष्ठ	10	10	10	15 मिनिटे
एक वाक्यात उत्तरे	07	07	07	15 मिनिटे
दोन-तीन वाक्यांत उत्तरे	20	20	10	40 मिनिटे
दीर्घ उत्तरे - 1	33	33	11	55 मिनिटे
दीर्घ उत्तरे - 2	20	20	05	35 मिनिटे
दीर्घ उत्तरे - 3	10	10	02	20 मिनिटे
एकूण	100	100	45	180 + 15 मिनिटे

- सूचना : सुरूवातीला प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटे

4. काठिण्य पातळीनुसार गुणविभागणी व प्रश्नसंख्या

क्र.सं	काठिण्य पातळी	शेकडा	गुण	प्रश्नसंख्या
1.	सोपे	30 %	30	21
2.	साधारण	50 %	50	20
3.	कठीण	20 %	20	04
4.	एकूण	100 %	100	45

5 . उद्दिष्टानुसार अपेक्षित रोखतानुसार अंक व प्रश्नसंख्या

अ. क्र.	उद्दिष्ट	एकूण गुण	एकूण अंक	प्रश्नसंख्या
1.	स्मरण	21	21	14
2.	आकलन	36	36	19
3.	अभिव्यक्ती	39	39	11
4.	रसग्रहण	04	04	01
5.	एकूण	100	100	45

गद्य 1
गुराख्याचे नेत्रपतन

उद्दिष्टानुसार गुणविभागणी :

गुराख्याचे नेत्रपतन	स्मरण	आकलन	अभिव्यक्ती	रसग्रहण	एकूण
प्रश्न	10	22	08	-	40
गुण	10	30	13	-	53

प्रश्न प्रकारानुसार गुणविभागणी :

अ. क्र.	प्रश्नाचे स्वरूप	प्रश्न	गुण
1.	वस्तुनिष्ठ प्रश्न - गुण 1	12	12
2.	लघुत्तरी प्रश्न - गुण 1	22	22
3.	लघुत्तरी प्रश्न - गुण 2	-	-
4.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 3	05	15
5.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 4	01	04
6.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 5	-	-
एकूण		40	53

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) महानुभाव वाङ् मयातील आद्यग्रंथकार व चरित्रकार असे .....यांना म्हणतात. (सोपे - ज्ञान)

अ) नागदेवाचार्य ब) केसोबास, क) म्हाइंभट ड) गोविंद प्रभू

2) लीळाचरित्र ग्रंथाचे लेखन यांनी केले आहे. (सोपे - ज्ञान)

अ) केसोबास ब) बल्लभाचार्य क) चक्रधर ड) म्हाइंभट्ट

3) लीळाचरित्र ग्रंथातील एकूण लीळांची संख्या इतकी आहे. (सोपे - ज्ञान)

अ) 1275. ब) 1810. क) 1509. ड) 1095

4) महानुभाव पंथाचे संस्थापक असे _______यांना म्हटले जाते. (सोपे - ज्ञान)

अ) चक्रधर स्वामी ब) भटोबास क) केसोबास ड) गोविंद प्रभू

5) गुराख्याचे नेत्रपतन या पाठाचे मूल्य हे आहे. (सोपे - ज्ञान)

अ) निष्ठा, प्रेम ब) दया, प्रेम क) कर्तव्य, कष्ट ड) ध्येय, कर्तव्य

6) श्री चक्रधर स्वामींनी हाताचा प्रहार याच्यावर केला. (सोपे - ज्ञान)

अ) गवळ्यावर ब) चोरावर क) गावकऱ्यावर ड) गुराख्यावर

7) यांच्या आठवणी लीळाचरित्रात आहेत. (सोपे - ज्ञान)

अ) म्हाइंभट्ट ब) चक्रधर स्वामी क) गोविंद प्रभू ड) नागदेवाचार्य

8) गुराख्याचे नेत्र पतन या पाठाचे लेखक कोण? (सोपे - ज्ञान)

अ) म्हाइंभट्ट ब) चक्रधर स्वामी क) गोविंद प्रभू ड) नागदेवाचार्य

9) श्री चक्रधर स्वामी या गावी राहणारे होते. (सोपे - ज्ञान)

अ) सराळे ब) कराळे क) पळस्पे ड) मुंबई

10) म्हाइंभट्ट यांनी कुणाचा अनुग्रह घेतला ? (साधारण - आकलन)

अ) गोविंद प्रभू ब) अल्लम प्रभू क) श्री चक्रधर स्वामी ड) नागदेवाचार्य

11) गुराख्याचे नेत्रपतन हा उतारा कोठून घेतला आहे ? (सोपे - ज्ञान)

अ) लीळाचरित्र एकांक ब) गोविंद प्रभू चरित्र क) श्री चक्रधर स्वामी चरित्र ड) गीता सार

12) गुराख्याचे नेत्रपतन हा उतारा यांनी संपादित केलेल्या पुस्तकातून घेतला आहे. (साधारण - आकलन)

अ) शं.गो.तुळपुळे ब) लीना सोहनी क) भालचंद्र सोहनी ड) डॉ. यु.म.पठाण

II. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

13) लीळाचरित्र एकांकाचे संपादन कोणी केले आहे ? (साधारण - आकलन)

14) गावच्या शिवेवर असलेल्या वृक्षाखाली कोण बसले होते ? (सोपे - आकलन)

15) दुसऱ्याच्या शेतात गुरे चरावयास कोणी सोडली होती ? (सोपे - आकलन)

16) गुराख्याचे नेत्रपतन या पाठातून आपण काय शिकलो ? (साधारण - आकलन)

17) गुराख्याचे नेत्रपतन पाठाचा साहित्य प्रकार कोणता ? (साधारण - आकलन)

18) 'बीजे करणे' वाक्प्रचाराचा अर्थ काय होतो ? (साधारण - आकलन)

19) 'चडकणा' या शब्दाचा अर्थ स्पष्ट करा. (साधारण - अभिव्यक्ती)

20) नगर जिल्ह्यातील सराळे गावचे रहिवासी कोण होते ? (सोपे - आकलन)

21) श्री चक्रधर स्वामी कोठे बसले होते ? (सोपे - आकलन)

22) श्री चक्रधराने कोणाचा पाठलाग केला ? (सोपे - अभिव्यक्ती)

23) गुराख्याने कोणता अपराध केला होता ? (सोपे - अभिव्यक्ती)

24) गुराख्याला शिक्षा देण्यासाठी चक्रधरांनी काय केले ? (साधारण - आकलन)

25) लीळाचरित्र ग्रंथात कोणाच्या आठवणी आहेत ? (सोपे - आकलन)

26) अनंत शक्ती परमेश्वरु या लिळेच्या माध्यमातून कोणते मूल्य स्पष्ट होते ? (साधारण - आकलन)

27) श्री चक्रधर स्वामींनी गुराख्याच्या डोळ्याला काय लावले ? (साधारण - आकलन)

28) गुराख्याच्या डोळ्याला दृष्टी कशी आली ? (साधारण - आकलन)

29) म्हाइंभट्ट यांचा मृत्यू केव्हा झाला ? (साधारण - आकलन)

30) म्हाइंभट्ट कोणत्या संप्रदायाचे प्रवर्तक होते ? (साधारण - आकलन)

31) खिरारी, शिवारु शब्दाचे अर्थ लिहा. (साधारण - आकलन)

32) श्री चक्रधरांनी गुराख्याच्या डोळ्यावर मारल्यावर काय झाले ? (साधारण - अभिव्यक्ती)

33) समर्थ रामदासांचा मठ कोठे आहे ? (साधारण - अभिव्यक्ती)

34) श्रीकृष्णाच्या बालक्रिडेचे वर्णन असलेले वामन पंडितांचे काव्य कोणते ? (कठीण - अभिव्यक्ती)

III. खालील प्रश्नांची चार ते पाच वाक्यात ऊत्तरे लिहा.

35) गावात भांडण का निर्माण झाले ? (साधारण - आकलन)

36) श्री चक्रधरांनी गुराख्याला पकडण्याचा प्रयत्न का केला ? (साधारण -आकलन)

37) श्री चक्रधरांनी गुराख्याला धडा शिकविण्यासाठी काय केले ? (साधारण - आकलन)

38) खालील वाक्ये प्रमाण मराठी भाषेत लिहा. (कठीण - अभिव्यक्ती)

डोळा निकाळ झाला.

गोसावी चडकणा हाणौंणि त्याचा डोळा खालि पाडीला

39) म्हाइंभट्ट भट यांचा परिचय लिहा. (साधारण - आकलन)

IV. खालील प्रश्नाचे आठ ते दहा वाक्यात उत्तरे लिहा.

40) श्री चक्रधरांनी गुराख्याचा जखमी झालेला डोळा कसा बरा केला ? (कठीण- अभिव्यक्ती)

गद्य 2

राजे लोकीं बहुत सगुण असावे

उद्दिष्टानुसार गुणविभागणी :

राजे लोकीं बहुत सगुण असावे	स्मरण	आकलन	अभिव्यक्ती	रसग्रहण	एकूण
प्रश्न	17	12	10	02	41
गुण	19	19	16	07	61

प्रश्न प्रकारानुसार गुणविभागणी :

अ. क्र.	प्रश्नाचे स्वरूप	प्रश्न	गुण
1.	वस्तुनिष्ठ प्रश्न - गुण 1	10	10
2.	लघुत्तरी प्रश्न - गुण 1	18	18
3.	लघुत्तरी प्रश्न - गुण 2	08	16
4.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 3	03	09
5.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 4	02	08
6.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 5	-	-
एकूण		41	61

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) राजेलोकी बहुत सगुण असावे या पाठाचे मूल्य हे आहे. (सोपे - ज्ञान)

अ) देशभक्ती ब) कर्तव्यनिष्ठा क) देश प्रेम ड) भक्ती

2) राजेलोकी बहुत सगुण असावे या पाठाचा साहित्य प्रकार--- (सोपे - ज्ञान)

अ) आज्ञापत्र ब) प्राचीन गद्य क) लघु निबंध ड) नाट्य उतारा

3) रामचंद्र पंतांचा ग्रंथ हा आहे. (सोपे - ज्ञान)

अ) ज्ञानेश्वरी ब) बखर क) चांगदेव पासष्टी ड) आज्ञापत्र

4) राजारामचा मुलगा हा होता. (साधारण - आकलन)

अ) श्रीराम शंभू छत्रपती ब) लक्ष्मण क) सहदेव ड) दुर्योधन

5) रामचंद्रपंत हा यांचा मुलगा होता. (साधारण - आकलन)

अ) रावसाहेब ब) नीलकंठ क) राजाराम ड) संभाजी

6) अमात्यांना हा किताब मिळाला. (सोपे - ज्ञान)

अ) पद्मश्री ब) शौर्यपदक क) हुकूमतपन्हा ड) सरकार

7) -------- म्हणजे राज्याचे जीवन. (सोपे - ज्ञान)

अ) खजिना ब) जलसंपत्ती क) सैन्य ड) खनिजसंपत्ती

8) आज्ञापत्र या पुस्तकाचे संपादन यांनी केले. (कठीण- अभिव्यक्ती)

अ) डॉ. प्र न जोशी   ब) ग प्र प्रधान   क) डॉ. यू म.पठाण   ड) डॉ.वि.भि.कोलते

9) रणजीत देसाई यांची कादंबरी ही आहे. (साधारण - आकलन)

अ) उल्का   ब) श्रीमान योगी   क) दोन ध्रुव   ड) ज्ञानेश्वरी

10) सर्व प्रजेचा नियंता कोण आहे ? (सोपे - ज्ञान)

अ) राणी   ब) राक्षस   क) राजा   ड) परमेश्वर

II. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

11) मराठ्यांच्या राज्याला संकटातून कोणी निभावून नेले ? (साधारण - आकलन)

12) परमेश्वराने या विश्वात प्रथम कोणाला निर्माण केले ? (साधारण - आकलन)

13) राजाने कशाचे भय बाळगावे ? (कठीण - अभिव्यक्ती)

14) राजाने कोणाचा सहवास दुरून करावा ? (साधारण - अभिव्यक्ती)

15) राजाने कशाविषयी अतिशय सावध राहावे ? (सोपे - ज्ञान)

16) कोणत्या सेवकांची नेमणूक करू नये ? (कठीण - अभिव्यक्ती)

17) राजाला कोणते व्यसन असू नये ? (सोपे - ज्ञान)

18) ईश्वराचा क्षोभ केव्हा होईल ? (सोपे - ज्ञान)

19) निर्वाह करणे म्हणजे काय ? (सोपे - आकलन)

20) सर्वकाल कोणास शरण गेले पाहिजे ? (सोपे - ज्ञान)

21) श्रीराम शंभू केव्हा गादीवर आले ? (साधारण - आकलन)

22) सेवकानी विशेष कार्य केल्याने काय द्यावे ? (सोपे - ज्ञान)

23) क्षोभ म्हणजे काय ? (सोपे - ज्ञान)

24) सर्वकाळ सावध कोणी असावे ? (सोपे - ज्ञान)

25) वसनागार म्हणजे काय ? (साधारण - अभिव्यक्ती)

26) सेवक लोकांची वेतने कोणी नेमस्त करावी ? (सोपे - ज्ञान)

27) शिवाजी महाराजांचे अमात्य कोण झाले ? (साधारण - अभिव्यक्ती)

28) उणी करणे म्हणजे काय ? (साधारण - आकलन)

III. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा.

29) ईश्वराने राजास का निर्माण केले ? (सोपे - ज्ञान)

30) राजाने सेवकांची नेमणूक कशी करावी ? (कठीण - अभिव्यक्ती)

31) राजाला विनोदाचे व्यसन का नसावे ? (साधारण - ज्ञान)

32) राजाच्या खजिन्या बद्दल कोणता विचार मांडला आहे ? (कठीण - अभिव्यक्ती)

33) रामचंद्रपंत अमात्य यांचा परिचय लिहा ? (साधारण - आकलन)

34) “राजे लोकास विनोदाचे व्यसन एकंदर नसावे” - सहसंदर्भ स्पष्टीकरण करा. (कठीण - अभिव्यक्ती)

35) “खजिना म्हणजे राज्याचे जीवन” - सहसंदर्भ स्पष्टीकरण करा. (कठीण - आकलन)

36) “सकल कार्यामध्ये अपकीर्तीचे भय बहुत वागवावे” - सहसंदर्भ स्पष्टीकरण करा. (कठीण - अभिव्यक्ती)

IV. खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

37) ब्राह्मण, वैदिक ,शास्त्रज्ञ, सत्पुरुष इत्यादी लोकांबरोबर राजाने कसे वागावे ? (कठीण - रसग्रहण)

38) पाकालय, जलस्थान, वसनागार ,फल स्थान, इत्यादी ठिकाणी नेमावयाचे सेवक कसे असावे ? (साधारण - आकलन)

39) आदर्श राजा कसा असावा ? (कठीण - अभिव्यक्ती)

V. खालील प्रश्नांची आठ ते दहा वाक्यात उत्तरे लिहा.

40) परमेश्वराने राजालाच राज्य करण्यास का निर्माण केले ? (कठीण - रसग्रहण)

41) राजाने सेवकांची नेमणूक परीक्षा करूनच का करावी ? (कठीण - आकलन)

गद्य 3

पोट

उद्दिष्टानुसार गुणविभागणी :

पोट	स्मरण	आकलन	अभिव्यक्ती	रसग्रहण	एकूण
प्रश्न	30	23	03	01	57
गुण	30	24	08	03	65

प्रश्न प्रकारानुसार गुणविभागणी :

अ. क्र.	प्रश्नाचे स्वरूप	प्रश्न	गुण
1.	वस्तुनिष्ठ प्रश्न - गुण 1	16	10
2.	लघुत्तरी प्रश्न - गुण 1	36	36
3.	लघुत्तरी प्रश्न - गुण 2	03	06
4.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 3	01	03
5.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 4	01	04
6.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 5	-	-
एकूण		57	65

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) वि. स. खांडेकर यांना या साली ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. (सोपे - ज्ञान)

अ) 1976 ब) 1974 क) 1972 ड) 1973

2) खांडेकरांच्या या कादंबरीला ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. (सोपे - ज्ञान)

अ) उल्का ब) ममता क) ययाती ड) क्रौंचवध

3) पोट या पाठाचा साहित्यप्रकार हा आहे. (साधारण - ज्ञान)

अ) लघु निबंध ब) लघुकथा क) ललित लेख ड) रूपक कथा

4) पोट या पाठाचे मूल्य हे आहे. (साधारण - आकलन)

अ) निराशावादी वृत्ती ब) जीवनवादी वृत्ती क) आशावादी वृत्ती ड) स्वच्छंदी वृत्ती

5) 'राव' या शब्दाचा समानार्थी शब्द शोधा. (सोपे - ज्ञान)

अ) राजा ब) माणूस क) भिकारी ड) शत्रु

6) 'परमेश्वर' या संधी चा प्रकार ओळखा . (सोपे - आकलन)

अ) स्वर संधी ब) व्यंजन संधी क) विसर्ग संधी ड) अन्य संधी

7) एकादशी ….. म्हण पूर्ण करा. (साधारण - आकलन)

अ) उपाशी रहाशी ब) भजन करशी क) देवाला जाशी ड) दुप्पट खाशी

8) आस्तिक या शब्दाचा अर्थ लिहा . (सोपे - आकलन)

अ) देव आहे मानणारा ब) देव नाही मानणारा क) अस्तित्वात मानणारा ड) नाही म्हणणार

9) संन्यासी शब्दाचा समानार्थी शब्द लिहा. (कठीण-- आकलन)

अ) योगी ब) महाराज क) राजा ड) देव

10) अस्मादिक या शब्दांचा अर्थ खालील पैकी कोणता आहे. (कठीण --आकलन)

अ) आमचा ब) त्यांचा क) तिचा ड) ते

II. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा संबंध लिहा.

11) पत्र : पान :: पुष्प :.......... (साधारण - आकलन)

12) दूध : क्षीर :: पाणी : .... (साधारण - आकलन)

13) अंत : प्रारंभ :: श्रेष्ठ : .... (साधारण - आकलन)

14) डोळे : नेत्र :: डोके : .... (साधारण - आकलन)

15) पोट : जठर :: ओठ : .... (साधारण - आकलन)

16) मान्य : अमान्य :: आठवणे : .... (साधारण - आकलन)

III. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

17) वि.स. खांडेकर यांचे संपूर्ण नाव काय ? (साधारण - ज्ञान)

18) 'पोपट कोणाप्रमाणे सर्वव्यापी आहे ? (साधारण - ज्ञान)

19) पोटोबाच्या भजनी कोण लागले आहे ? (साधारण - ज्ञान)

20) जगातील कोणत्याही कवीने काय केले नाही असे लेखक म्हणतो ? (साधारण - आकलन)

21) देवांना कोणत्या विद्येचा उपयोग झाला ? (सोपे - ज्ञान)

22) मनुष्याच्या शरीराचा अतिशय नाजूक भाग कोणता ? (सोपे - ज्ञान)

23) विठ्ठलाच्या आठवणीसाठी कोणत्या सुट्ट्या जागवाव्या लागतात ? (सोपे - ज्ञान)

24) पोट 'हा पाठ कोणत्या पुस्तकातून घेतला आहे ? (साधारण - आकलन)

25) माणसाला रोज पोटाची आठवण केव्हा होते ? (साधारण - ज्ञान)

26) पोटेश्वराची संभावना कोणत्या शब्दात केली जाते ? (साधारण - ज्ञान)

27) कवी लोक वेडे आहेत असे लेखक का म्हणतात ? (सोपे - ज्ञान)

28) पोट कोणा पेक्षा श्रेष्ठ आहे ? (सोपे - आकलन)

29) जीवनाचा भाष्यकार कोण असतो ? (सोपे - ज्ञान)

30) लेखकाने पोट कोणाप्रमाणे सर्वव्यापी आहे असे म्हटले ? (सोपे - ज्ञान)

31) यावचंद्रदिवाकरौ या शब्दाचा अर्थ काय ? (कठीण - ज्ञान)

32) पोटाची आठवण दररोज केव्हा होते ? (सोपे - ज्ञान)

33) हलाल या शब्दाचा अर्थ काय ? (साधारण - आकलन)

34) पोटावर काव्य कोणी रचले नाही ? (सोपे - ज्ञान)

35) पोटाकडे पाहिल्यावर कोणत्या कल्पना सुचतात ? (साधारण - आकलन)

36) पोट पुढच्या बाजूला असले तरी ते कोठे लागले आहे ? (सोपे - ज्ञान)

37) मनुष्य कोणते शब्द आनंदाने होशील ? (सोपे - ज्ञान)

38) देवांना कोणत्या विद्येचा उपयोग झाला नसता ? (सोपे - ज्ञान)

39) सारे जग कशाने भरून गेले असते ? (साधारण - आकलन)

40) प्रलयकाळी वटपत्रावर निजण्याइतके लहान कोण आहे ? (सोपे - ज्ञान)

41) पोट सुटले कि त्याची पकड पुर्वीपेक्षा कशी होते ? (सोपे - आकलन)

42) हृदयापेक्षा मनुष्याच्या शरीराचा नाजूक भाग कोणता ? (सोपे - ज्ञान)

43) शुक्रचार्य कोण होता ? (सोपे - ज्ञान)

44) पोटाचे कोणावर उपकार झाले आहेत ? (साधारण - आकलन)

45) कुटुंबात दाणादाण का उडाली असती ? (सोपे - ज्ञान)

46) शाळा बंद करण्याचे ठराव का पास झाले असते ? (सोपे - ज्ञान)

47) रोगी मरायला लागल्यावर डॉक्टर कोणत्या खेळात दंग झाले असते ? (सोपे - ज्ञान)

48) वकिलांनी धावपळ का केली नसती ? (साधारण - ज्ञान)

49) पोटा अभावी कोण कोण नामशेष झाले असते ? (सोपे - आकलन)

50) भयंकर आपत्तीतून जगाची मुक्तता का झाली आहे ? (कठीण - आकलन)

51) माध्यान्हकाळ झाली दाखविण्यासाठी कोण नेहमी तयार राहणार ? (सोपे - ज्ञान)

52) जगाचा गाडा सुरळीत चालविण्याचे श्रेय कोणाला आहे ? (सोपे - ज्ञान)

IV. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

53) पोट नसते तर आणखी कोणते मोठे अनर्थ ओढवले असते ? (सोपे - आकलन)

54) लोकांनी पोटाच्या बाबतीत कोणती गोष्ट लक्षात ठेवावी असे लेखकाला वाटते ? (साधारण - अभिव्यक्ती)

55) 'पण त्यांचे खरे स्वरूप विश्वव्यापूनही उरते. पोटाचेही तसेच आहे . संदर्भासहित स्पष्टीकरण करा. (सोपे -अभिव्यक्ती)

V . खालील प्रश्नांची पाच ते सहा ओळीत उत्तरे लिहा.

56) पोट परमेश्वर आहे हे लेखकाने कसे सिद्ध केले आहे ? (साधारण - रसग्रहण)

VI . खालील प्रश्नांची आठ ते दहा ओळीत उत्तरे लिहा.

57) पोट परमेश्वरापेक्षा श्रेष्ठ आहे हे पटवून देण्यासाठी कोणती उदाहरणे दिली आहे ? (साधारण- अभिव्यक्ती)

गद्य 4
कर्णाचे शल्य

उद्दिष्टानुसार गुणविभागणी :

राजेलोकीं बहुत सगुण असावे	स्मरण	आकलन	अभिव्यक्ती	रसग्रहण	एकूण
प्रश्न	21	11	05	02	39
गुण	21	20	12	08	61

प्रश्न प्रकारानुसार गुणविभागणी :

अ. क्र.	प्रश्नाचे स्वरूप	प्रश्न	गुण
1.	वस्तुनिष्ठ प्रश्न - गुण 1	18	18
2.	लघुत्तरी प्रश्न - गुण 1	09	09
3.	लघुत्तरी प्रश्न - गुण 2	04	08
4.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 3	06	18
5.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 4	02	08
6.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 5	-	-
	एकूण	39	61

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) वि. वा. शिरवाडकर यांना या साली ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. (साधारण - ज्ञान)

अ) 1988 ब) 1989 क) 1985 ड) 1986

2) वि. वा. शिरवाडकर यांचे सुप्रसिद्ध नाटक कोणते ? (साधारण - ज्ञान)

अ) वादळवेल ब) नटसम्राट क) जान्हवी ड) प्रवासी पक्षी

3) पृथ्वीने कोणाचा पक्ष घेतला होता ? (सोपे - ज्ञान)

अ) सैनिकांचा ब) कौरवांचा क) योद्ध्यांचा ड) पांडवांचा

4) आपला पक्ष कोणाचा अशी भ्रांत कोणाला पडली आहे ? (सोपे - ज्ञान)

अ) जांधिलाला ब) कर्णाला क) सात्यकिला ड) भीमाला

5) कुसुमाग्रजांचा गौरव या नावाने केला जातो. (साधारण - ज्ञान)

अ) वारकरी संप्रदायी ब) नाथ संप्रदायी क) अग्नि संप्रदायी ड) संप्रदायी

6) युद्ध भूमी वर सहास्य येणारा एक आवाज कोणाचा ? (साधारण - ज्ञान)

अ) कृष्णाचा ब) द्रोणाचार्यांचा क) भीष्माचा ड) भीमाचा

7) विरथ आणि निःशस्त्र कोण झाले आहे ? (सोपे - ज्ञान)

अ) सात्यकी ब) जांधिल क) अर्जुन ड) कर्ण

8) कुंतीला सूर्यापासून झालेल्या मुलाचे नांव हे आहे ? (साधारण - आकलन)

अ) अर्जुन ब) कर्ण क) युधिष्ठिर ड) भीम

9) सर्प या शब्दाला हा समानार्थी शब्द नाही. (साधारण - आकलन)

अ) साप ब) अहि क) उरग ड) सरीसृप

10) राजेश्वर या शब्दाची संधी अशी होते. (सोपे - ज्ञान)

अ) राज् + इश्वर ब) राज + ईश्वर क) राजा + ईश्वर ड) राजे + ईश्वर

11) निःशस्त्र या संधीचा प्रकार हा आहे. (सोपे - ज्ञान)

अ) स्वरसंधी ब) व्यंजनसंधी क) विसर्गसंधी ड) यापैकी नाही

12) रथचक्र या समासाचा प्रकार हा आहे. (सोपे - ज्ञान)

अ) षष्ठी तत्पुरुष ब) व्दितिया तत्पुरुष क) अव्ययीभाव समास ड) बहुव्रीही समास

13) हे रथाचे चक्र नव्हे ! दुर्दैवाचे चक्र आहे या वाक्यातील अलंकार हा आहे. (साधारण - आकलन)

अ) उपमा ब) अपन्हुती क) रूपक ड) अनन्वय

II. पहिल्या, दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा योग्य संबंध लिहा,

14) दुःख : वेदना :: मृत्यू : .... (सोपे - ज्ञान)

15) चाक : चक्र :: लाछन : .... (सोपे - ज्ञान)

16) निःपात : पात :: परमेश्वर : .... (सोपे - ज्ञान)

17) असत्य : सत्य नाही असे :: सुतपुत्र : .... (साधारण - ज्ञान)

18) महारथी : कर्मधारय समास :: अधर्म : .... (साधारण - ज्ञान)

III. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

19) वि. वा. शिरवाडकर यांचे टोपण नाव काय आहे ? (सोपे - ज्ञान)

20) कर्णाचे शल्य हा पाठ कोणत्या पुस्तकातून घेतला आहे ? (साधारण - आकलन)

21) उदारपणे जीवाचे दान देणारा खरा देवमाणूस कोणाला म्हटले आहे ? (साधारण - ज्ञान)

22) कर्णाचे सत्य समजल्यावर भीम रागाने कुंतीला काय म्हणाला ? (साधारण - आकलन)

23) कर्णाचा स्वामिनिष्ठ सेवक कोण ? सोपे ज्ञान

24) हे चक्र रथाचे नाही, दुर्दैवाचे आहे.' असे कोणी म्हटले आहे ? (साधारण - आकलन)

25) सात्यकीच्या सेनेचा पराभव कोणी केला ? (सोपे - ज्ञान)

26) कौरवांचा आधारस्तंभ कोणाला म्हटले आहे ? (साधारण - ज्ञान)

27) कर्णाचे शल्य या मूल्य कोणते ? (साधारण - ज्ञान)

IV. खालील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.

28) कौरवांनी कोणते कारस्थान केले होते ? (कठीण - अभिव्यक्ती)

29) जांधिलाच्या छातीची चाळणी कोणी व का केली ? (कठीण - अभिव्यक्ती)

30) कर्ण विरथ का झाला ? (कठीण - अभिव्यक्ती)

31) विद्या महासागराप्रमाणे अथांग आहे. – या वाक्यातील अलंकार ओळखून व्याख्या लिहा.

(साधारण - आकलन)

V. संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

32) 'तुझी जागा-माझ्या हृदयाजवळ आहे, पायाशी नाही!' (साधारण - आकलन)

33) 'आई गं-मारा, कर्णालाही अधर्मानंच मारा !' (साधारण - अभिव्यक्ती)

34) माझा कर्ण गेला! माझा मुलगा गेला! (साधारण - आकलन)

VI. खालील प्रश्नांची पाच ते सहा ओळीत उत्तरे लिहा.

35) कौरवांनी कोणता अधर्म केला होता ? (कठीण -आकलन)

36) जांधिलाने कर्णाला शेवटी कोणती विनंती केली ? (कठीण - अभिव्यक्ती)

37) एका आवाजाने अर्जुनास कोणता संदेश दिला ? (कठीण -आकलन)

VII. खालील प्रश्नांची आठ ते दहा ओळीत उत्तरे लिहा.

38) कर्णाची स्वभाव वैशिष्ट्ये लिहा. (कठीण- रसग्रहण)

39) कुंतीच्या स्वभावाची वैशिष्ट्ये लिहा. (कठीण- रसग्रहण)

गद्य 5

एनाक्षीमिया आणि वाघीण

उद्दिष्टानुसार गुणविभागणी :

एनाक्षीमिया आणि वाघीण	स्मरण	आकलन	अभिव्यक्ती	रसग्रहण	एकूण
प्रश्न	16	16	02	02	36
गुण	17	23	05	08	53

प्रश्न प्रकारानुसार गुणविभागणी :

अ. क्र.	प्रश्नाचे स्वरूप	प्रश्न	गुण
1.	वस्तुनिष्ठ प्रश्न - गुण 1	14	14
2.	लघुत्तरी प्रश्न - गुण 1	12	12
3.	लघुत्तरी प्रश्न - गुण 2	05	10
4.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 3	03	09
5.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 4	02	08
6.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 5	-	-
एकूण		36	53

I. प्रश्नाना योग्य पर्याय निवडून उत्तर लिहा

1) मारुती चिंतमपल्ली यांचा जन्म कोणत्या गावी झाला ? (सोपे - ज्ञान)

अ) सोलापूर ब) कोल्हापूर क) तुळजापूर ड) बेळगाव

2) मारुती चिंतमपल्ली काय म्हणून प्रसिद्ध होते. (सोपे - आकलन)

अ) प्राणीतज्ञ ब) पक्षीतज्ञ क) सर्पमित्र ड) भूतदया

3) एनाक्षीमिया कोठे राहत होते ? (सोपे - ज्ञान)

अ) झोपडी ब) घर क) गुहा ड) जंगल

4) पाखरे कशामुळे जखमी होत. (सोपे - आकलन)

अ) उन्हामुळे ब) पावसामुळे क) शिकारीमुळे ड) गारांच्या वर्षावामुळे

5) मांडवाच्या मध्यभागी काय पुरून बैठक केली होती ? (सोपे - ज्ञान)

अ) दगड ब) ओंडका क) गवत ड) बुंधा

6) डोहाळे लागलेल्या स्त्रियांना एनाक्षीमिया काय आणून द्यायचा ? (सोपे - ज्ञान)

अ) रानमेवा ब) सुकामेवा क) फळ ड) पाणी

7) 'आकर्षण ' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द ओळखा. (सोपे - आकलन)

अ) अनाकर्षण ब) आवड क) आनंद ड) दिसणे

8) 'अपरिचित 'या शब्दाचा समानार्थी शब्द ओळखा. (सोपे - आकलन)

अ) अनोळखी ब) ओळख नसलेला क) परिचित ड) ओळखीचा

9) 'निष्क्रिय ' या शब्दाचा विरुध्दार्थी शब्द ओळखा. (सोपे - आकलन)

अ) बरोबर ब) समाधान क) सक्रीय ड) आवड

10) 'क्लेशदायक ' या शब्दाचा समानार्थी शब्द ओळखा. (सोपे - आकलन)

अ) दुःखदायक ब) आनंदी क) आरामदायक ड) समाधानी

II. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा .

11) 'एनाक्षीमिया आणि वाघीण ' ही कथा लेखकाच्या कोणत्या कथासंग्रहातून घेतली आहे ? (सोपे - ज्ञान)

12) सोलापूरच्या 79 व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष कोण होते ? (सोपे - ज्ञान)

13) आदिवासी लोक वाघाची काय म्हणून पूजा करतात ? (सोपे - ज्ञान)

14) एनाक्षीमिया आणि वाघिणीची गोष्ट कोणी कोणास सांगितली ? (सोपे - आकलन)

15) मीया गरोदर स्त्रीची मदत कशी करत असे ? (सोपे - ज्ञान)

1 6) जानू गोंड जंगलात का गेला होता ? (सोपे - ज्ञान)

17) जानूला झाडांचा आसरा का घेता आला नाही ? (सोपे - ज्ञान)

1 8) वाघीण व मीयाच्या कबरी कोठे आहेत ? (सोपे - ज्ञान)

19) बाबा आमटे कोणते अभयारण्य पाहायला आले होते ? (सोपे - ज्ञान)

20) मांडव कशाने शाकारलेला होता ? (सोपे - ज्ञान)

21) मांडवात अहोरात्र काय पेटत असे ? (सोपे - ज्ञान)

22) मिया गावात रोज कशासाठी जात असे ? (सोपे - ज्ञान)

III. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा संबंध लिहा.

23) अचानक पडणारा पाऊस : अवकाळी : : सतत पडणारा पाऊस : ..... (सोपे - आकलन)

24) रानातील फळे : रानमेवा : : सुकवलेली फळे : .... (सोपे - आकलन)

25) हिरवीगार असणारी झाडे : सदाहरित : : झाडांची पाने गळणारा मोसम : .... (सोपे -आकलन)

26) रात्रनदिवस : अहोरात्र : : जळून जाने : .... (सोपे - आकलन)

IV. खालील प्रश्नांची उत्तरे दोन तीन वाक्यात लिहा.

27) मध्यरात्रीनंतर गावकरी मियांच्या झोपडीडे का फिरकत नसत ? (साधारण - आकलन)

28) जानू गोंड कोणत्या संकटात अडकला ? (सोपे - ज्ञान)

V. संदर्भासहित स्पष्टीकरण करा. (कठीण - अभिव्यक्ती)

29) "मियाला जंगली प्राणी वश आहेत ही बातमी साऱ्या दशक्रोषित पसरली "

30) "त्याने जानूला कपडे काढायला सांगितले त्याच्या सर्वांगाला धुनितील राख फासली "

31) "काय केलस मिया, माझ्यासारख्या साध्या माणसाचा जीव वाचवण्याकरता स्वतःचे प्राण दिलेस "

VI. खालील प्रश्नांची उत्तरे पाच सहा ओळीत लिहा.

32) जानूला वाचविण्याकरता मीयाने काय केले ? (साधारण - आकलन)

33) मीयाचा मृत्यू कसा झाला ? (सोपे - आकलन)

VII. खालील प्रश्नांची उत्तरे आठ दहा ओळीत लिहा.

34) जानू गोंड मीयाकडे का गेला ? (कठीण - रसग्रहण)

35) मिया आणि वाघीण यांचे संबंध कसे होते ? (कठीण - रसग्रहण)

VIII. वाक्यप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

36) मोर्चा वळविणे , सामोरे जाणे , गर्भगळीत होणे , कोंबडा आरवणे. (साधारण - आकलन)

गद्य 6

ओळख

उद्दिष्टानुसार गुणविभागणी :

ओळख	स्मरण	आकलन	अभिव्यक्ती	रसग्रहण	एकूण
प्रश्न	23	12	05	02	42
गुण	26	22	11	07	66

प्रश्न प्रकारानुसार गुणविभागणी :

अ. क्र.	प्रश्नाचे स्वरूप	प्रश्न	गुण
1.	वस्तुनिष्ठ प्रश्न - गुण 1	13	13
2.	लघुत्तरी प्रश्न - गुण 1	13	13
3.	लघुत्तरी प्रश्न - गुण 2	10	20
4.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 3	04	12
5.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 4	02	08
6.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 5	-	-
एकूण		42	66

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) ओळख या पाठाचे लेखिका कोण आहेत ? (साधारण - ज्ञान)

अ) शांताशेळके ब) कुसुमाग्रज क) मारुती चितमपल्ली ड) वि स खांडेकर

2) ओळख या पाठाचे मूल्य काय आहे ? (साधारण - ज्ञान)

अ) कर्तव्यनिष्ठा ब) जीवनवादीवृत्ती क) बालमनाची निरागसता ड) भक्ती

3) ओळख हा पाठ कोणत्या ललित संग्रहातून घेतला आहे ? (सोपे - ज्ञान)

अ) गोंदण ब) अनुबंध क) मायेचा पाझर ड) पावसा आधीचा पाऊस

4) शांता शेळके कोणत्या महाविद्यालयात मराठी विषयाच्या प्राध्यापिका म्हणून कार्य केले ? (सोपे - ज्ञान)

अ) मुंबई ब) दिल्ली क) कोलकत्ता ड) पुणे

5) लेखिका शांता शेळके या विषयाच्या प्राध्यापिका होत्या. (साधारण - ज्ञान)

अ) हिंदी ब) इंग्रजी क) मराठी ड) इतिहास

6) कावेरी या पुस्तकाचा वांङमय प्रकार हा आहे. (साधारण - ज्ञान)

अ) कथासंग्रह ब) काव्यसंग्रह क) कादंबरी ड) नाटक

7) मंडळी यावर खुर्च्या टाकून बसली होती. (सोपे - ज्ञान)

अ) सतरंजी ब) लॉन क) घोंगडी ड) गादी

8) छोटीचा एक चिमुकला स्विमिंग पूल याचा होता. (साधारण - आकलन)

अ) सिमेंटचा ब) रबराचा क) प्लास्टिकचा ड) मातीचा

9) यजमानांचा व्यवसाय हा होता . (साधारण - आकलन)

अ) वकिली ब) शिक्षक क) डॉक्टर ड) उद्योगपती

10) माणसे घरोघर निघून गेली तरी छोटीशी हे चालूच होते. (सोपे - ज्ञान)

अ) हुंदके देणे ब) खेळणे क) वाचणे ड) बोलणे

11) कटवले जाणे या वाक्यप्रचाराचा अर्थ असा आहे. (सोपे - ज्ञान)

अ) दूर करणे ब) जवळ करणे क) कौतुक करणे ब) अपमान करणे

12) सूर्य या शब्दाचा समानार्थी शब्द लिहा. (सोपे - ज्ञान)

अ) रवी ब) पाऊस क) चंद्र ड) पाणी

13) शनिवारी संध्याकाळी किती मराठी कुटुंबे एकत्रित झाली ? (साधारण - आकलन)

अ) पाच सहा ब) चार पाच क) सहा सात ड) सात आठ

II. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

14) यजमानांचे घर कसे होते ? (सोपे - ज्ञान)

15) मंडळी कोणती भाषा बोलत होती ? (सोपे - ज्ञान)

16) लॉनवर कोणाचा चिमुकला स्विमिंग पूल होता ? (सोपे - ज्ञान)

17) आईने प्लास्टिकची किती बदके छोटीच्या हातात दिली ? (साधारण - ज्ञान)

18) यजमानांना कोणता व्यासंग होता ? (साधारण - ज्ञान)

19) लेखिका शांता शेळके यांचे पूर्ण नाव काय ? (साधारण - ज्ञान)

20) यजमान यांची छोटी जेमतेम किती वर्षाची होती ? (साधारण - आकलन)

21) छोटी आत धावत जाऊन काय घेऊन आली ? (साधारण - ज्ञान)

22) छोटी पुन्हा पुन्हा कोणती प्रश्न विचारत होती ? (साधारण - आकलन)

23) छोटी कुठे उभे होती ? (सोपे - ज्ञान)

24) छोटीची कोणाशी तोंड ओळख झाली ? (साधारण - आकलन)

25) वादळानंतर छोटीने काय अनुभवले ? (सोपे - ज्ञान)

III. खालील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.

26) यजमानांच्या घराची रचना कशी होती ? (साधारण - ज्ञान)

27) छोटी काही वेळ बाजूच्या खुर्चीवर का जाऊन बसे ? (साधारण - ज्ञान)

28) यजमानांच्या घरी मैफिल कशी रंगत असे ? (कठीण - अभिव्यक्ती)

29) छोटी मुळापासून का हादरून गेली होती ? (कठीण - अभिव्यक्ती)

30) यजमानांनी पाहुण्यांची करमणूक कशा प्रकारे केली ? (कठीण - अभिव्यक्ती)

31) गाणी ऐकून माणसांच्या तोंडातून कोणते उदगार उमटत होते ? (साधारण - आकलन)

IV. संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

32) "वाहवा क्या बात है मार्व्हलस " (साधारण - आकलन)

33) " माझा स्विमिंग पूल माझा स्विमिंग पूल " (साधारण - अभिव्यक्ती)

34) " काय झालं? ही इतकी का रडते!" (साधारण - आकलन)

V. खालील प्रश्नांची पाच ते सहा ओळीत उत्तर लिहा.

35) छोटीचे लाड सगळेजण कसे करत होते ? (कठीण - आकलन)

36) यजमानांनी पाहुण्यांची जेवणाची सोय कशी केली होती ? (कठीण - अभिव्यक्ती)

37) छोटी संकटांना धीराने तोंड तोंड देईल असे आईला का वाटते ? (कठीण - आकलन)

38) परदेशात मराठी मंडळीचे विरंगुळ्याचे दिवस कोणते ? (कठीण - रसग्रहण)

VI. खालील प्रश्नांची आठ ते दहा ओळीत उत्तरे लिहा.

39) यजमानांच्या घरी सुंदर सहज वातावरण केव्हा व कसे तयार झाले होते ? (कठीण - रसग्रहण)

40) अचानक आलेल्या वादळ पावसाचे वर्णन करा. (कठीण - आकलन)

41) वाक्यप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (सोपे - ज्ञान)

लगट करणे , कटवले जाणे , आसन ठोकणे , छातीशी घट धरणे

42) समानार्थी शब्द लिहा. (सोपे - ज्ञान)

सूर्य , वारा , पाऊस , आई , चिंता , रात्र

गद्य 7

संत पुरंदरदास

उद्दिष्टानुसार गुणविभागणी :

संत पुरंदरदास	स्मरण	आकलन	अभिव्यक्ती	रसग्रहण	एकूण
प्रश्न	13	17	09	06	45
गुण	13	17	12	19	61

प्रश्न प्रकारानुसार गुणविभागणी :

अ. क्र.	प्रश्नाचे स्वरूप	प्रश्न	गुण
1.	वस्तुनिष्ठ प्रश्न - गुण 1	17	17
2.	लघुत्तरी प्रश्न - गुण 1	19	19
3.	लघुत्तरी प्रश्न - गुण 2	04	08
4.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 3	03	09
5.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 4	02	08
6.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 5	-	-
एकूण		45	61

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) अनुयुगाचे निर्माते हे पुस्तक कोणाचे आहे ? (कठीण - ज्ञान)

अ) शांता शेळके ब) डॉ. प्र. न. जोशी क) व्यंकटेश माडगूळकर ड) वि. वा. शिरवाडकर

2) डॉ.प्र.न. जोशी यांची कादंबरी कोणती ? (कठीण - ज्ञान)

अ) मायेचा पाझर ब) बनगरवाडी क) काय भुललाशी वारलिया रंगा ड) अन्न संस्कार

3) ब्राह्मणाने नथ शिवप्पाकडे देऊन किती मोहरा मागितल्या ? (सोपे - ज्ञान)

अ) दोनशे ब) चारशे क) पाचशे ड) हजार

4) पुरंदर दासांच्या घरात कोणता व्यवसाय होता ? (सोपे - आकलन)

अ) वखारीचा ब) लोहार क) शेती ड) सराफी

5) कर्नाटकाचा तुकाराम म्हणून यांचा उल्लेख केला जातो ? (साधारण - आकलन)

अ) संत कनकदास ब) संत बसवेश्वर क) संत पुरंदरदास ड) संत रामदास

6) शिवप्पाने रागारागाने नथ येथे सीलबंद करून ठेवली ? (सोपे - ज्ञान)

अ) तिजोरी ब) पेटी क) बँकेत ड) पोस्टात

7) तत्पुरुष समासाचे उदाहरण ओळखा. (कठीण - अभिव्यक्ती)

अ) यथासांग ब) पतीपत्नी क) आचंद्रसूर्य ड) मंत्रोप्रदेश

8) आपले संत हे पुस्तक कोणी लिहिले ? (कठीण - ज्ञान)

अ) व्यंकटेश माडगूळकर ब) डॉ. जयंत नारळीकर क) डॉ. प्र.न.जोशी ड) संत एकनाथ

II. सहसंबंध स्पष्ट करा.

9) संत पुरंदरदासांचा जन्म	: 1482	:: मृत्यू	:....	(साधारण - आकलन)
10) डॉ. प्र.न. जोशी जन्म	:1924	:: मृत्यू	:....	(साधारण - आकलन)
11) संत पुरंदरदासांचे वडील	: वरदप्पा नाईक	:: आई	:....	(सोपे - ज्ञान)
12) दुवा देणे	: आशीर्वाद देणे	:: पारा चढणे	:.....	(सोपे - अभिव्यक्ती)
13) मंत्रोपदेश	: स्वरसंधी	:: सन्मती	:....	(कठीण - अभिव्यक्ती)
14) वाचा जाणे	: बोलती बंद होणे	:: अतिथ्य करणे	:....	(साधारण - अभिव्यक्ती)
15) कन्यादान	: षष्ठी तत्पुरुष समास	:: पतीपत्नी	:...	(कठीण - अभिव्यक्ती)
16) अतिथी	: पाहूणा	:: लोभी	:...	(सोपे - ज्ञान)
17) सुशील	: सदाचारी	:: क्रोध	:....	(सोपे - ज्ञान)

III.पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

18) संत पुरंदरदासांचा जन्म कोणत्या गडावर झाला ? (साधारण - आकलन)

19) वरदप्पा नाईक यांनी मुलाचे नाव काय ठेवले ? (साधारण - आकलन)

20) श्रीनिवास यांच्या पत्नीचे नाव काय ? (सोपे - ज्ञान)

21) संपत्तीस कोणते सद्गुण शोभून दिसतात ? (कठीण - आकलन)

22) गयावया करणाऱ्या भिकाऱ्यास शेठजीने चटकन कोणते उत्तर दिले ? (कठीण - आकलन)

23) ब्राह्मण किती महिने हेलपाटे घालत होता ? (सोपे - आकलन)

24) गरीब ब्राह्मण पैशाची मदत कशासाठी मागत होता ? (साधारण - आकलन)

25) सरस्वतीला नाकातील नथ कोणी दिली होती ? (साधारण - आकलन)

26) सरस्वतीने ब्राह्मणास मदत म्हणून काय दिले ? (सोपे - आकलन)

27) शिवपाने सर्व संपत्ती कोणाला दिली ? (कठीण - ज्ञान)

28) घरदार सोडून शिवप्पा कोठे आले ? (सोपे - आकलन)

29) विजयनगरचा राजा कोण होता ? (साधारण - आकलन)

30) कृष्णदेवरायांचे गुरु कोण होते ? (साधारण - आकलन)

31) शिवप्पाने कोणाकडून मंत्रोपदेश घेतला? (साधारण - आकलन)

32) श्री व्यासरायांनी शिवप्पाचे नाव काय ठेवले ? (साधारण - ज्ञान)

33) शिवप्पा च्या नावावर कोणते ग्रंथ आहेत ? (कठीण - अभिव्यक्ती)

34) कोणत्या नद्यावर शिवप्पाची महास्तोत्रे आहेत ? (कठीण - ज्ञान)

35) दासमंडप कोठे आहे ? (कठीण - ज्ञान)

36) पुरंदरदासाने कोणाची भक्ती केली ? (सोपे - आकलन)

IV. खालील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.

37) साध्वी सरस्वती कोणत्या अपराधाचे प्रायश्चित घेणार होती ? (साधारण - अभिव्यक्ती)

38) परिचय लिहा: डॉ.प्र. न. जोशी. (कठीण - अभिव्यक्ती)

39) शिवपाने गरीब ब्राह्मणास त्रास कसा दिला ? (साधारण - अभिव्यक्ती)

40) संदर्भासहित स्पष्टीकरण करा." प्रभू किती दयावंत तू! तुला सर्व लेकरांची काळजी!" (कठीण - रसग्रहण)

V. खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

41) शिवप्पाला नवकोटनारायण म्हणून लोक का ओळखू लागले ? (कठीण - रसग्रहण)

42) गरीब ब्राह्मणाने सरस्वतीला कोणती विनवणी केली ?, सरस्वतीने त्याला मदत कशी केली ? (कठीण - रसग्रहण)

43) श्रीनिवास शेठजीच्या बुद्धीस जोराचा धक्का का बसला ? (साधारण - आकलन)

VI. खालील प्रश्नांची आठ ते दहा वाक्यात उत्तरे लिहा.

44) संत पुरंदरदासांच्या भक्ती मार्गाचे वर्णन करा ? (कठीण - रसग्रहण)

45) पुरंदरदासाने विठ्ठल भेटीच्या आनंदाचे वर्णन कसे केले आहे ? (कठीण - रसग्रहण)

गद्य 8

बाबाखान दरवेशी

उद्दिष्टानुसार गुणविभागणी :

बाबाखान दरवेशी	स्मरण	आकलन	अभिव्यक्ती	रसग्रहण	एकूण
प्रश्न	16	14	01	-	31
गुण	25	16	03	-	44

प्रश्न प्रकारानुसार गुणविभागणी :

अ. क्र.	प्रश्नाचे स्वरूप	प्रश्न	गुण
1.	वस्तुनिष्ठ प्रश्न - गुण 1	12	12
2.	लघुत्तरी प्रश्न - गुण 1	10	10
3.	लघुत्तरी प्रश्न - गुण 2	05	10
4.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 3	04	12
5.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 4	-	--
6.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 5	-	-
एकूण		31	44

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) व्यंकटेश माडगूळकर 1983 मध्ये- -------येथे असलेल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. (सोपे - आकलन)

अ) नागपूर ब) अंबेजोगाई क) औरंगाबाद ड) यवतमाळ

2) काळोख्या रात्री कोणाच्या घरापुढे माणसं गोळा झाली ? (सोपे - ज्ञान)

अ) उमाजीच्या ब) कुळंबीणीच्या क) लेखकाच्या ड) बाबाखानच्या

3) बाबाखानने हा प्राणी पाळला होता. (सोपे - ज्ञान)

अ) माकड ब) अस्वल क) कुत्रा ड) वाघ

4) बाबाखान हा कोण होता ? (सोपे - ज्ञान)

अ) कलाकार ब) भांडखोर क) दरवेशी ड) वेडा

5) बाबाखानने अस्वलाला कोठे बांधले होते ? (साधारण - आकलन)

अ) येण्या-जाण्याच्या रस्त्यात ब) झाडाखाली क) घरापासून दूर ड) देवळापाशी

6) बाबाखान अस्वलाला खायला काय देत असे ? (कठीण - आकलन)

अ) गवत ब) मांस क) शेरभर भरडलेल्या कण्या ड) फळे

7) बाबाखानने अस्वलाला का मारले नाही ? (साधारण - आकलन)

अ) ते त्याचे उदरनिर्वाहाचे साधन होते ब) ते त्याने पाळले होते

क) ते त्याचे काम करत असे ड) ते त्याला प्रिय होते.

8) बाबाखानची बायको कोणत्या कामासाठी बाहेर गेली होती ? (सोपे - ज्ञान)

अ) बाजारासाठी ब) दळण दळण्यासाठी क) कपडे धुण्यासाठी ड) फेरफटका मारण्यासाठी

II. पहिल्या जोडीतील संबंध ओळखून दुसऱ्या पदांशी जुळणारा शब्द लिहा.

9) मदारी : माकडाचा खेळ दाखवणारा :: दरवेशी : ___ (कठीण - आकलन)

10) कवाड : दार :: कसब : ___ (साधारण - ज्ञान)

11) येरगटणे : गुरफटणे :: दगावणे : ___ (साधारण - ज्ञान)

12) संत पुरंदरदास : आपले संत :: बाबाखान दरवेशी : ___ (सोपे - आकलन)

III. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

13) दरवेश्याच्या घरापुढे माणसे का जमा झाली होती ? (सोपे - ज्ञान)

14) या पाठात दरवेशाचे नाव काय आहे ? (सोपे - ज्ञान)

15) बाबाखानने अस्वल का पाळले होते ? (साधारण - आकलन)

16) बाबाखानला 'हिरवट टाळक्याचा 'असे का म्हटले आहे ? (कठीण - आकलन)

17) बाबाखानला राहायला घर कोणी दिले होते ? (सोपे - ज्ञान)

18) बाबाखानला एकूण मुलं किती होती ? (साधारण - आकलन)

19) बाबाखानजवळ कोणकोणत्या गाण्यांचा साठा होता ? (कठीण - आकलन)

20) देवऋषीपणाचा छुपा धंदा कोण करत असे ? (सोपे - ज्ञान)

21) बाबाखानचा पोशाख कसा असे ? (साधारण - आकलन)

22) 'बाबाखान दरवेशी ' हा पाठ कोणत्या पुस्तकातून घेतला आहे ? (सोपे - ज्ञान)

IV. संदर्भासह स्पष्टीकरण करा.

23) "काय गडबड हाय आत ? कवाड खोला बघू!" (सोपे - ज्ञान)

24) " नवऱ्यानं मारलं आणि पावसानं झोडपलं तर तक्रार न्यायची कुणाकडं ?" (साधारण - ज्ञान)

25) "बरं तर बरं- पोर मेलं असतं आज ?" (सोपे - आकलन)

26) " कसूर माफ असावी सरकार, काय चुकी घडली ?" (साधारण - ज्ञान)

V. खालील प्रश्नांची पाच - सहा वाक्यात उतरे लिहा.

27) बाबाखान दरवेश्याच्या स्वभावाचे वर्णन करा. (कठीण - अभिव्यक्ती)

28) अस्वलाच्या खेळाचे वर्णन तुमच्या शब्दात करा. (सोपे - ज्ञान)

29) बाबाखान च्या पत्नीचे वर्णन कसे केले आहे ? (साधारण - ज्ञान)

30) बाबाखानने अस्वलाचा सांभाळ कशा प्रकारे केला होता ? (साधारण - आकलन)

VI. वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

31) गहिवर मांडणे, धोंडा घालणे, खर्ची पडणे, गुर्मी असणे, गळा काढणे. (सोपे - आकलन)

गद्य 9

वाचू आनंदे.

उद्दिष्टानुसार गुणविभागणी :

वाचू आनंदे.	स्मरण	आकलन	अभिव्यक्ती	रसग्रहण	एकूण
प्रश्न	11	15	05	04	35
गुण	13	20	11	04	48

प्रश्न प्रकारानुसार गुणविभागणी :

अ. क्र.	प्रश्नाचे स्वरूप	प्रश्न	गुण
1.	वस्तुनिष्ठ प्रश्न - गुण 1	11	11
2.	लघुत्तरी प्रश्न - गुण 1	17	17
3.	लघुत्तरी प्रश्न - गुण 2	03	06
4.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 3	02	06
5.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 4	02	08
6.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 5	-	-
एकूण		35	48

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) वाचू आनंदे हा पाठ कोणत्या पुस्तकातून घेतला आहे ? (साधारण - ज्ञान)

अ) तंत्रयुगातील उमलती मने ब) आई क) अन्न संस्कार ड) यापैकी नाही.

2) डॉ.स्नेहलता देशमुख कोणत्या विद्यापीठाच्या कुलगुरू होत्या ? (कठीण - आकलन)

अ) नागपूर ब) कोल्हापूर क) मुंबई ड) पुणे.

3) आपण प्रत्येक गोष्ट याच्या कसोटीवर पडताळून बघत आहोत. (साधारण - आकलन)

अ) धर्माच्या ब) विज्ञानाच्या क) लोकमताच्या ड) देवाच्या.

4) वाचाल तर वाचाल असे यांनी म्हटले आहे. (सोपे - ज्ञान)

अ) डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन ब) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

क) वि. दा .सावरकर ड) लोकमान्य टिळक.

5) माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात हा अविभाज्य घटक आहे. (सोपे - आकलन)

अ) मोबाईल ब) दूरदर्शन क) संगणक ड) रेडिओ

6) आज मुलांच्या मनावर या माध्यमाचा पकडा आहे. (साधारण - आकलन)

अ) इलेक्ट्रॉनिक ब) तंत्रज्ञान क) यंत्रज्ञान ड) मंत्रज्ञान

7) वाचू आनंदे या पाठाचा साहित्यप्रकार कोणता ? (सोपे - ज्ञान)

अ) विज्ञान कथा ब) वैचारिक लेख. क) प्रवासवर्णन ड) ग्रामीण कथा.

8) आयुर्वेद शास्त्रावरील उत्कृष्ट ग्रंथ कोणता ? (कठीण - आकलन)

अ) चरक संहिता ब) रस गंगाधर क) अमृत लहरी ड) सर्व.

II. पहिल्या दोन पदांचा संबंध ओळखून तिसऱ्या पदाची जोडणारा संबंधित शब्द लिहा.

9) महाकवी कालिदास	: रघुवंश	:: जगन्नाथ पंडित	:--------	(कठीण - आकलन)
10) चित्त	: मन	:: स्मरण	:--------	(सोपे – ज्ञान)
11) आयुष्य	: जीवन	:: बळ	:-----	(सोपे – ज्ञान)

III. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

12) 'वाचू आनंदे' या पाठाच्या लेखिका सांगा. (साधारण - आकलन)

13) ' वाचू आनंदे ' पाठाचे मूल्य कोणते ? (साधारण - ज्ञान)

14) डॉ. स्नेहलता देशमुख यांच्या संस्कारक्षम साहित्याची नावे लिहा. (कठीण - आकलन)

15) संस्कार म्हणजे काय ? (साधारण - अभिव्यक्ती)

16) प्राचीन काळातील आयुर्वेदातील पारंगत वैद्य कोणते ? (कठीण - ज्ञान)

17) लेखिकेला आजोबा वारंवार काय सांगत ? (साधारण - आकलन)

18) उत्खननामध्ये सापडलेल्या कोणत्या द्योतक (प्रतीक) पासून त्या काळाची ओळख होते ?
(कठीण - आकलन)

19) कवी ब्राउनिंग यांनी सांगितलेली कोणती गोष्ट जीवाला भिडते ? (साधारण - अभिव्यक्ती)

20) आजकाल कोणते माध्यम जास्त लोकप्रिय झाले आहे ? (सोपे - ज्ञान)

21) मूल प्रगल्भ होण्यासाठी कोणती सवय लावावी ? (सोपे - ज्ञान)

22) आजकाल माणसांचे सर्वस्व कोणते ? (साधारण - आकलन)

23) पूर्णब्रह्म असे कशाला म्हटले आहे ? (सोपे -आकलन)

24) मनाचे पोषण कशामुळे होते ? (सोपे- ज्ञान)

IV. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा.

25) मुलांचा भावनिक बुद्ध्यांक उत्तम असतो हे कोणत्या प्रयोगाने सिद्ध केले आहे ? (कठीण - अभिव्यक्ती)

26) आपल्याला भूतकाळाची माहिती कशावरून मिळते ? (साधारण -आकलन)

27) ज्ञान विज्ञान सहित. - संदर्भासहित स्पष्टीकरण करा. (साधारण - आकलन)

V. खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

28) आजच्या परिस्थितीचे वर्णन लेखिकेने कसे केले आहे ? (सोपे - अभिव्यक्ती)

29) लेखिकेच्या मैत्रिणीने वाचनाची साथ कशी पसरविली ? (साधारण - ज्ञान)

VII. खालील प्रश्नांची आठ ते दहा वाक्यात उत्तरे लिहा.

30) उद्योजकाने आपल्या मुलांना काय विचारले ? मुलांनी त्यांना कोणकोणती उत्तरे दिली ?
(कठीण - आकलन)

31) लेखिकेने वाचनाचे महत्त्व कसे स्पष्ट केले आहे ? (सोपे -अभिव्यक्ती)

VIII. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

32) आकाशाला गवसणी घालणे, झुगारून देणे, पगडा असणे, चकित होणे (साधारण - आकलन)

गद्य 10

उडती तबकडी आणि अफलातून टोळी

उद्दिष्टानुसार गुणविभागणी :

उडती तबकडी आणि अफलातून टोळी	स्मरण	आकलन	अभिव्यक्ती	रसग्रहण	एकूण
प्रश्न	10	17	11	04	42
गुण	10	26	18	14	68

प्रश्न प्रकारानुसार गुणविभागणी :

अ. क्र.	प्रश्नाचे स्वरूप	प्रश्न	गुण
1.	वस्तुनिष्ठ प्रश्न - गुण 1	13	13
2.	लघुत्तरी प्रश्न - गुण 1	16	16
3.	लघुत्तरी प्रश्न - गुण 2	04	08
4.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 3	05	15
5.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 4	04	16
6.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 5	-	-
एकूण		42	68

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा ?

1) उडती तबकडी आणि अफलातून टोळी ही कथा कोणत्या संग्रहातून घेतली आहे. (साधारण - ज्ञान)

अ) टाईम मशीनची किमया ब) प्रेषित क) यक्षाची देणगी ड) अंतराळातील भस्मासुर.

2) गढीचे मालक कोणत्या शहरात राहत होते ? (सोपे - ज्ञान)

अ) पुणे ब) कोल्हापूर क) मुंबई ड) गारगोटी.

3) पिंट्याच्या खांद्यावर कोणी थाप मारली ? (साधारण - अभिव्यक्ती)

अ) सुंदर ब) बाजीराव क) मन्यामामा क) लली.

4) आंतरराष्ट्रीय कीर्तीचे खगोलशास्त्रज्ञ हे आहेत ? (कठीण - आकलन)

अ) डॉ. रवींद्र कोल्हे ब) डॉ.स्मिता कोल्हे क) डॉ. जयंत नारळीकर ड) डॉ.अरविंद.

5) "उडती तबकडी आणि अफलातून टोळी या पाठाचे मूल्य काय ? (साधारण - अभिव्यक्ती)

अ) दया ब) निष्ठा क) प्रेम ड) चौकसबुद्धी.

6) गारगोटी पासून किती मैलावर गढी होती ? (सोपे - आकलन)

अ) एक ब) दोन क) तीन ड) चार.

7) पिंट्याच्या डोक्यात कोणती कल्पना शिजत होती ? (साधारण-- ज्ञान)

अ) रहस्य शोधून काढण्याची ब) विमानाची बातमी

क) टोळीची माहिती ड) गारगोटीची माहिती.

8) पिंट्याच्या टोळीची खूण काय होती ? (सोपे - अभिव्यक्ती)

अ) गाडीचे चित्र ब) खेळण्याचे चित्र क) रॅकेटचे चित्र ड) विमानाचे चित्र

9) पिंट्याने आई-बाबांबरोबर कुठे जायचे सांगितले ? (सोपे - आकलन)

अ) काश्मीरला ब) मुंबईला क) पुण्याला ड) बेळगावला.

II. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा शब्द लिहा ?

10) परिचित	: अपरिचित	:: रात्र	:...........	(सोपे - ज्ञान)
11) ऑर्डर	: हुकूम	:: रिपोर्ट	:...........	(साधारण – अभिव्यक्ती)
12) गावाकडील गोष्टी	: व्यंकटेश माडगूळकर	:: यक्षाची देणगी	:...........	(साधारण - आकलन)
13) अश्विनी धोंगडे	:1947	:: जयंत नारळीकर	:...........	(सोपे - अभिव्यक्ती)

III. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

14) मोडकळीला आलेली गढी गारगोटी पासून किती मैलावर आहे ? (सोपे - ज्ञान)

15) मन्यामामा गारगोटीला का आला होता ? (कठीण - अभिव्यक्ती)

16) पिंट्याने आपल्या सहकाऱ्यांना वेशीजवळ किती वाजता बोलविले ? (सोपे - आकलन)

17) हवालदाराने भाला कोठे पुरून ठेवला होता ? (सोपे - अभिव्यक्ती)

18) अँबेसिडर वर कोणी चित्र काढले होते ? (साधारण - आकलन)

19) "आयुका" या संस्थेची स्थापना कोणी केली ? (साधारण - ज्ञान)

20) गढीचे रहस्य शोधून काढायची कल्पना कोणाच्या डोक्यात शिजत होती ? (सोपे - ज्ञान)

21) सुटाबुटातला गृहस्थ कोण होता ? (सोपे - अभिव्यक्ती)

22) टोळीमधील मुलामुलींची नावे काय ? (सोपे - ज्ञान)

IV. संदर्भासह स्पष्टीकरण करा.

23) "तेच तर आपल्या पथ्यावर पडणार आहे " (साधारण - आकलन)

24) " वा! पण मी डोके वापरले ना ? " (सोपे - रसग्रहण)

25) "आम्हाला आई-बाबांबरोबर विमानातून काश्मीरला जाऊन यायचय" (साधारण - अभिव्यक्ती)

26) "परवा रात्री गारगोटीत उडती तबकडी उतरली होती " (साधारण - रसग्रहण)

27) "बापरे!आज तर अमावस्या आहे " (साधारण - आकलन)

V. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा ?

28) दामू गाडीवानाने उडत्या तबकडी विषयी काय सांगितले ? (कठीण - अभिव्यक्ती)

29) पिंट्या आणि मन्यामामा यांच्यात कोणता ठराव झाला होता ? (साधारण - आकलन)

30) रामसिंघानीने सुभानराव व दामूला कोणत्या सूचना दिल्या होत्या ? (कठीण - अभिव्यक्ती)

31) गढीतील रहस्य शोधून काढण्यासाठी कोणी कोणी कसे प्रयत्न केले ? (कठीण - आकलन)

VI. खालील प्रश्नांची पाच ते सहा ओळीत उत्तरे लिहा ?

32) सुभानरावाने उडत्या तबकडीविषयी काय सांगितले ? (साधारण - रसग्रहन)

33) रामसिंघानीने गढीच्या संदर्भात कोणता डाव रचला होता ? (कठीण - अभिव्यक्ती)

34) गढीचे वर्णन करा ? (कठीण – रसग्रहण)

VII. खालील प्रश्नांची आठ ते दहा ओळीत उत्तरे लिहा ?

35) पिंट्या व त्याच्या सहकाऱ्यांनी यानासंबंधी कोणकोणते निष्कर्ष काढले ? (कठीण - आकलन)

VIII. खालील वाक्यप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा ?

36) डोके खाजविणे, छडा लावणे, आज्ञा करणे, पाळत ठेवणे, डाव रचने, खो घालणे, पथ्यावर पडणे

(साधारण - आकलन)

गद्य 11

सा रम्या नगरी मास्को

उद्दिष्टानुसार गुणविभागणी :

सा रम्या नगरी मास्को	स्मरण	आकलन	अभिव्यक्ती	रसग्रहण	एकूण
प्रश्न	23	14	12	01	50
गुण	25	17	20	03	62

प्रश्न प्रकारानुसार गुणविभागणी :

अ. क्र.	प्रश्नाचे स्वरूप	प्रश्न	गुण
1.	वस्तुनिष्ठ प्रश्न - गुण 1	20	20
2.	लघुत्तरी प्रश्न - गुण 1	19	19
3.	लघुत्तरी प्रश्न - गुण 2	08	16
4.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 3	02	06
5.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 4	01	04
6.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 5	-	-
एकूण		50	65

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) संस्कृत मधील 'सा' याचा अर्थ (सोपे - ज्ञान)

अ) तो ब) ती क) मी ड) तू

2) शांत, वर्दळ नसलेले यासाठी या पाठात आलेला शब्द. (सोपे - ज्ञान)

अ) वसती ब) ओसाड क) ओके ओके ड) निर्जन

3) 'दास कॅपिटल' ग्रंथाचा निर्माता. (सोपे - ज्ञान)

अ) स्टॅलिन ब) युरी गागारीन क) स्पुटनिक ड) काल मार्क्स

4) मास्को चा परिसर या आकारात वसलेला आहे. (सोपे - आकलन)

अ) वर्तुळाकार ब) चौकोनी क) त्रिकोणी ड) पंचकोनी

5) 'सा रम्या नगरी मास्को' या पाठाचा साहित्यप्रकार. (सोपे - ज्ञान)

अ) निबंध ब) प्रवास वर्णन क) चरित्र ड) वैचारिक निबंध

6) 'मास्को' प्रवास करण्यासाठी किती कोपेकचे तिकीट लागते. (साधारण – ज्ञान)

अ) तीन ब) चार क) पाच ड) सात

7) 'क्षणोक्षणी' या समासाचे उदाहरण आहे. (साधारण - आकलन)

अ) अव्ययीभाव ब) तत्पुरुष क) द्वंद्व ड) बहुरंगी

8) मास्कोत लेखिकेचा मुक्काम किती दिवसाचा होता. (सोपे - ज्ञान)

अ) आठ दिवस ब) दहा दिवस क) पाच दिवस ड) पंधरा दिवस

9) लेखिका या विषयाच्या प्राध्यापिका आहेत. (साधारण - सोपे)

अ) इंग्रजी ब) फारशी क) संस्कृत ड) मराठी

10) रशिया देशाची राजधानी ही आहे (साधारण - आकलन)

अ) लंडन ब) मास्को क) पणजी ड) बर्लिन

11) लेखिका मास्कोत या ऋतूत उतरल्या. (साधारण - आकलन)

अ) वसंत ब) शरद क) वर्षा ड) ग्रीष्म

12) मास्को या नगरीत इतके लोक राहतात. (साधारण - आकलन)

अ) एक कोटी ब) दोन लाख क) साठ लाख ड) 90 लाख

13) जगातील पहिला अवकाश यात्री हा होता. (सोपे – ज्ञान)

अ) लेनिन ब) स्टॅलिन क) युरी गागारीन ड) गार्गी

14) रशियाने अवकाशात सोडलेला पहिला अवकाश यान हे आहे. (सोपे – ज्ञान)

अ) स्पुटनिक ब) आर्यभट्ट क) अपोलो ड) इन्सॅट

15) मास्को शहरात हे प्रसिद्ध वस्तू संग्रहालय आहे. (सोपे - ज्ञान)

अ) पिकासो ब) रोड इन क) पुष्किन ड) बोटी लेली

II. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा संबंध लिहा.

16) पात्र : अपात्र :: पारदर्शक : ………. (सोपे - अभिव्यक्ती)

17) आई : जननी :: नयन : ……….. (सोपे - ज्ञान)

18) बिनधास्त : नञ तत्पुरुष समास :: मुलं मुली : ……….. (सोपे - ज्ञान)

19) मी प्रवासाला जातो :: वर्तमान काळ :: मी मुख निरोप घेतला : ………. (साधारण - ज्ञान)

20) सुंदरता : भाववाचक नाम :: रम्या : ………. (कठीण - अभिव्यक्ती)

III. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

21) सा रम्या नगरी मास्को पाठाचे मूल्य लिहा. (कठीण - अभिव्यक्ती)

22) सा रम्या नगरी मास्को हा पाठ कोणत्या पुस्तकातून निवडला आहे ? (साधारण - ज्ञान)

23) या पाठात मास्को शहराच्या कोणकोणत्या गोष्टींचे दर्शन घडते ? (साधारण - ज्ञान)

24) मास्कोला कोणते दोन चेहरे आहेत ? (सोपे - ज्ञान)

25) गोऱ्यापान फुल परीने कोणती फुलमाला माळलेली होती ? (सोपे - ज्ञान)

26) मेट्रोचे जग किती मार्गावर किती पातळ्यात पसरलेले आहे ? (सोपे - ज्ञान)

27) मास्कोतील देखने की चीज कशास म्हटले आहे ? (सोपे - ज्ञान)

28) वाटचाल हे प्रवास वर्णन कोणत्या लेखकाचे आहे ? (साधारण - आकलन)

29) चिनी माती हे प्रवासवर्णन कोणाचे ? (साधारण - आकलन)

30) मास्कोत कोणकोणत्या राजकारण्यांचे पुतळे उभे केले आहेत ? (कठीण -ज्ञान)

31) मास्कोत कोणकोणत्या साहित्यिकांचे पुतळे उभे केले आहेत ? (कठीण - ज्ञान)

32) मास्कोत कोणकोणत्या वैज्ञानिकांचेपुतळे उभे केले आहेत ? (सोपे - ज्ञान)

33) अंतराळ विज्ञानाचा जनक कोण ? (सोपे - आकलन)

34) मॉस्कोत कोणकोणत्या चित्रकारांच्या कलाकृतींच जतन केलं ? (साधारण - आकलन)

35) रशियामधिल खास कला कोणती ? (सोपे - आकलन)

36) लेखिकेला रशियातील लोकांचा कोणता स्वभाव भावला ? (साधारण - आकलन)

37) शहराचा खराखुरा चेहरा कोणता ? (साधारण - अभिव्यक्ती)

38) रशियातील महान साम्यवादी नेता कोण ? (साधारण - अभिव्यक्ती)

39) रशियाच्या अभ्युदयाचा शिल्पकार असे कोणास म्हणतात ? (साधारण - अभिव्यक्ती)

IV. तीन-चार वाक्यात उत्तरे लिहा.

40) 24 तास उजेडाचा एक दिवस लेखिकेने कसा अनुभवला ? (साधारण - ज्ञान)

41) एखाद्या शहराचा खराखुरा चेहरा कसा दिसतो ? (साधारण - आकलन)

42) लेखिकेला कोणता मोठा आनंददायी अनुभव झाला ? (साधारण - अभिव्यक्ती)

43) लेखिकेच्या पुण्यातील प्रदूषित डोळ्यांना कोणते दृश्य सुखावले ? (साधारण - अभिव्यक्ती)

44) मेट्रोचे स्टेशन ही एक देखने की चीज है संदर्भासह स्पष्ट करा. (साधारण - अभिव्यक्ती)

45) दुबळी माझी झोळी असे जाणवल्याशिवाय राहत नसेल संदर्भासह स्पष्ट करा. (साधारण - अभिव्यक्ती)

V. सुचनेप्रमाणे लिहा.

46) खालील वाक्यप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

मनात घर करणे, ठाण मांडून बसणे, भर घालणे, जतन करणे (साधारण – आकलन)

VI. पाच ते सहा वाक्य उत्तरे लिहा.

47) 30-35 मिनिटांच्या प्रवासात लेखिकेला काय काय दिसले ? (साधारण - अभिव्यक्ती)

48) मॉस्कोच्या वैभवात भर टाकणाऱ्या महत्त्वाच्या वास्तू कोणत्या ? (साधारण - रसग्रहण)

VII. आठ दहा वाक्यात उत्तरे लिहा.

49) वास्कोतील रेल्वे प्रवासाचे वर्णन करा मास्कोतील रस्त्याचे वर्णन करा. (कठीण - अभिव्यक्ती)

गद्य 12

यंत्र

उद्दिष्टानुसार गुणविभागणी :

यंत्र	स्मरण	आकलन	अभिव्यक्ती	रसग्रहण	एकूण
प्रश्न	08	09	12	05	34
गुण	08	10	23	16	57

प्रश्न प्रकारानुसार गुणविभागणी :

अ. क्र.	प्रश्नाचे स्वरूप	प्रश्न	गुण
1.	वस्तुनिष्ठ प्रश्न - गुण 1	14	14
2.	लघुत्तरी प्रश्न - गुण 1	10	10
3.	लघुत्तरी प्रश्न - गुण 2	03	06
4.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 3	03	09
5.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 4	02	08
6.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 5	02	10
एकूण		34	57

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) 'यंत्र' या पाठाचे लेखक....हे आहेत. (सोपे - ज्ञान)

अ) डॉ. जयंत नारळीकर ब) योगीराज वाघमारे

क) व्यंकटेश माडगूळकर ड) डॉ. स्नेहलता देशमुख .

2) लेखक योगीराज वाघमारे हे ....जीवनाचे अनेक अंगानी चित्रण करणारे समर्थक कथाकार आहेत. (कठीण - आकलन)

अ) धनगर ब) ग्रामीण क) दैवज्ञ ड) दलित .

3) 'यंत्र' हा पाठ ....या कथासंग्रहातून घेतलेला आहे. (साधारण - ज्ञान)

अ) गुडदाणी ब) उद्रेक क) बेगड ड) कापणी

4) यंत्र या पाठाचे मूल्य ....हे आहे . (साधारण - ज्ञान)

अ) चौकसबुद्धी ब) कृतज्ञता क) श्रमप्रतिष्ठा ड) स्वच्छता.

5) यंत्र या पाठाचा साहित्यप्रकार....हा आहे. (साधारण - अभिव्यक्ती)

अ) विज्ञान कथा ब) व्यक्तीचित्र क) चरित्र ड) दलित कथा.

6) वामन ....यांच्या मळ्याकडे निघाला होता. (सोपे - ज्ञान)

अ) आबा सावकार ब) बाबा सावकार क) पाटील मळा ड) काका सावकार

7) करीम गुमास्ता ...यांच्यावर डफरत होता. (साधारण - आकलन)

अ) बैलावर ब) बायकांवर क) मजुरावर ड) कामगांरावर

8) पाठातील 'पांद' या शब्दाचा अर्थ हा आहे ? (कठीण - रसग्रहण)

अ) पादचारी ब) शेतकरी क) लहान वाट ड) लहान वाटणी

9) ' गोतावळा' ही कादंबरी....यांची आहे. (साधारण - आकलन)

अ) व्यंकटेश माडगूळकर ब) शिवाजी सावंत क) वि. स. खांडेकर ड) आनंद यादव.

10) 'गर्भगळीत होणे ' या वाक्यप्रचाराचा अर्थ....हा आहे. (कठीण - अभिव्यक्ती)

अ) निराश होणे ब) चवताळणे क) अतिशय घाबरणे ड) हल्ला करणे.

II. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा योग्य संबंध लिहा.

11) जवारीची	: खुडणी	: : हरभऱ्याचे	: ......__	(सोपे - ज्ञान)
12) पालापाचोळा	: समहार द्वंद्व समास	: : दहापंधरा	:......___.	(कठीण - अभिव्यक्ती)
13) धनगराचा	: राणू	: : मांगाचा	: .....____	(साधारण - आकलन)
14) मोगरी	: लाकडी हातोडा	: : बिदागी	:......____	(कठीण - आकलन)

III. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा .

15) लेखक योगीराज वाघमारे यांच्या कथेतून कोणता वास्तव अनुभव व्यक्त होतो ? (कठीण - अभिव्यक्ती)

16) कोणती बाग ओलांडली की आबा सावकारांचा मळा येतो ? (सोपे - ज्ञान)

17) आबा सावकारांचा वाडा कोठे बांधलेला होता ? (सोपे - आकलन)

18) आबा सावकारांना कोण सुपारी कातरून देत होता ? (साधारण - आकलन)

19) वामनने कुणाला माश्याची अंगठी केली ? (साधारण - ज्ञान)

20) आबा सावकारांच्या मळ्यात कोण कोणत्या पिकांची मळणी होते ? (साधारण - अभिव्यक्ती)

21) शेतकरी वामनला केंव्हा उसनं - पासनं देतात ? (कठीण - आकलन)

22) मोकळ्या रानात कोणाची जनावरे चरत होती ? (सोपे - ज्ञान)

23) मळणी यंत्र कोणत्या गावाहून आणले होते ? (साधारण - अभिव्यक्ती)

24) वामनला बाजीरावच्या खळ्यावर का काम मिळाले नाही? (कठीण - अभिव्यक्ती)

IV. खालील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.

25) गावातील मळण्या जत्रेच्या अगोदर का करतात ? (साधारण - आकलन)

26) आबा सावकारांचे वर्णन लिहा . (साधारण - अभिव्यक्ती)

27) वामनाने गेल्या वर्षी मळणीच्या उत्पन्नातून काय काय खरेदी केले ? (कठीण - अभिव्यक्ती)

V. संदर्भसहित स्पष्टीकरण करा .

28) "आवला, चला ...आटपा". (कठीण - रसग्रहण)

29) "कुणीकडे वामना ?" (कठीण - रसग्रहण)

30) "झालं का मिस्तरी?" (कठीण - अभिव्यक्ती)

VI. खालील प्रश्नांची पाच ते सहा ओळीत उत्तरे लिहा.

31) मळणी यंत्र सुरू होताच वामनापुढे कोणते प्रश्न उभे राहिले ? (कठीण - रसग्रहण)

32) वामन मालकाकडे केंव्हा पदर पसरत असे ? (साधारण - अभिव्यक्ती)

VII. खालील प्रश्नांची आठ ते ओळीत उत्तरे लिहा.

33) आबा सावकाराच्या खळ्याभोवतीचे वर्णन करा. (साधारण - रसग्रहण)

34) वामनासंबंधी माहिती लिहा. (कठीण - अभिव्यक्ती)

पद्य विभाग

पद्य 1
अभंग त्रिदल

उद्दिष्टानुसार गुणविभागणी :

अभंग त्रिदल	स्मरण	आकलन	अभिव्यक्ती	रसग्रहण	एकूण
प्रश्न	13	19	08	03	43
गुण	13	19	12	03	47

प्रश्न प्रकारानुसार गुणविभागणी :

अ. क्र.	प्रश्नाचे स्वरूप	प्रश्न	गुण
1.	वस्तुनिष्ठ प्रश्न - गुण 1	18	18
2.	लघुत्तरी प्रश्न - गुण 1	22	22
3.	लघुत्तरी प्रश्न - गुण 2	02	04
4.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 3	01	03
5.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 4	-	-
6.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 5	-	-
एकूण		43	47

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1.गोरा कुभार यांचा जन्म या गावी झाला. (सोपे- ज्ञान)

अ) आळंदी ब) कोल्हापूर क) तेर ड) पंढरपुर.

2. संत गोरा कुंभार यांना या नावाने हाक मारत असत. (सोपे - ज्ञान)

अ) पाटील काका ब) गोरोबाकाका क) संतकाका ड) कुंभारकाका.

3. 'भक्ती' ही हे रूप धारण करते असे संत गोरा कुंभार म्हणतात. (सोपे- ज्ञान)

अ) श्रेष्ठ ब) . अव्यक्त क) पुण्य ड) अद्वैत.

4 संत मुक्ताबाई यांचा जन्म येथे झाला. (सोपे- ज्ञान)

अ) तेर ब) आळंदी क) कसबा ड) लातूर

5. संत गोरा कुंभारांनी आयुष्यभर या योगाचे आचरण केले. (सोपे - ज्ञान)

अ) ज्ञानयोग ब) राजयोग क) निष्काम कर्मयोग ड) सन्यास.

6. तेराव्या शतकातील तेजस्वी व स्पष्टवक्ती संत कवयित्री या आहेत. (सोपे- ज्ञान)

अ) जनाबाई ब) वेणाबाई क) बहिणाबाई ड) संत मुक्ताबाई.

7. थोर विठ्ठलभक्त असे यांना मानले जाते. (सोपे - ज्ञान)

अ) संत ज्ञानेश्वर ब) संत तुकाराम क) संत नामदेव ड) मुक्ताई.

8. 'किर्तन संप्रदायाचे आद्य आचार्य', असा यांचा गौरव केला जातो. (साधारण -ज्ञान)

अ) संत नामदेव ब) संत तुकाराम क) संत मुक्ताबाई ड) संत रामदास.

9. ताटीचे अभंग यानी लिहिले. (सोपे - ज्ञान)

अ) ज्ञानदेव ब) संत सोपानदेव क) संत मुक्ताबाई ड) संत जनाबाई.

10. नामदेवांचे गुरु हे होते. (सोपे - ज्ञान)

अ) निवृत्तीनाथ ब) संत गोरोबा क) विसोबा खेचर ड) मुक्ताबाई.

11. 'ताटी' या शब्दाचा अर्थ असा होतो. (सोपे - आकलन)

अ) दार ब) खिडकी क) ताट ड) भिंत

12. जननी या शब्दाचा समानार्थी शब्द असा होतो. (साधारण - आकलन)

अ) भार्या ब) भगिनी क) माऊली ड) पिता.

13. दुसऱ्याची पत्नी कोणासमान मानावी ? (साधारण - अभिव्यक्ती)

अ) आई ब) बहिण क) मावशी ड) काकू.

14. धन कशासमान मानावे ? (साधारण - अभिव्यक्ती)

अ) सोन्या समान ब) मोत्या समा क) दगडा समान ड) मातेसमान.

15. नेहमी अनुरागे काय गावे ? (साधारण - आकलन)

अ) भक्ती गीत ब) भावगीत क) लावणी ड) हरीचे नाम.

16. पराव्या कारणे प्राण वेची आता या ओळीचा अर्थ काय ? (कठीण -रसग्रहण)

अ) परक्याशी मैत्री करावी ब) परक्यावर राग धरावा

क) परक्यापासून अंतर ठेवावे ड) परक्या लोकांनाही मदत करावी.

17. सर्वकाळ संतांची संगत का करावी ? (कठीण -अभिव्यक्ती)

अ) प्रसिद्धीसाठी ब) आध्यात्मिक उन्नतीसाठी

क) व्यवहारासाठी ड) पाप मुक्तीसाठी.

18. संत नामदेव म्हणतात की, धनाची चिंता........ (साधारण -आकलन)

अ) करावी ब) टाळावी क) वाढवावी ड) इतरावर टाकावी.

II.खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

19. संत गोरा कुंभारांनी साखरेचे उदाहरण का दिले आहे ? (साधारण -आकलन)

20. संत मुक्ताबाईनी सतांची कोणती लक्षणे सांगितली आहेत ? (कठीण -अभिव्यक्ती)

21. संत मुक्ताबाईच्या मते विरक्त कोणाला म्हणावे ? (साधारण -आकलन)

22. संत मुक्ताबाईने ज्ञानेश्वरांना कोणती विनंती केली आहे ? (साधारण -आकलन)

23. सत नामदेव कोणाला लोटांगण घालावे असे म्हणतात ? (साधारण -आकलन)

24. परमेश्वराचे नाव कसे घ्यावे ? (सोपे - आकलन)

25. मनात कोणता भाव दृढ धरावा ? (साधारण -आकलन)

26. 'जननी' चा समानार्थी शब्द कोणता ? (साधारण -आकलन)

27. संत नामदेवांच्या अभंगात कोणता विचार मांडला आहे ? (कठीण - अभिव्यक्ती)

28. मुक्ताबाईची अभंगवाणी कोणत्या विषयावर प्रसिद्ध आहे ? (साधारण - रसग्रहण)

29. संतमंडळात मोठे स्थान व पारमार्थिक अधिकार असलेली व्यक्ती कोण आहे ? (साधारण-आकलन)

30. संत गोरा कुंभारांच्या आई वडिलांचे नाव काय ? (सोपे - ज्ञान)

31. गोरा कुंभार यानी सदैव विठ्ठल कुठे पाहिला ? (साधारण -आकलन)

32. मुका माणूस आपला आनंद का व्यक्त करू शकत नाही ? (सोपे - आकलन)

33. मुक्ताबाईच्या भावंडांची नावे सांगा. (सोपे- ज्ञान)

34 आहे त्या गोष्टीत समाधान का मानावे ? (साधारण -आकलन)

35. पराव्या कारणे म्हणजे काय ? (साधारण - आकलन)

36. विरुद्धार्थी शब्द लिहा. (साधारण -आकलन)

शांती मित्र सुखी

37. संत कवयित्री हे पुस्तक कोणी लिहिले ? (साधारण - आकलन)

38. आपले संत या पुस्तकाचे लेखक कोण ? (कठीण - रसग्रहण)

39. समानार्थी शब्द लिहा. (सोपे - ज्ञान)

द्रव्य दारा प्रीती

40. मुक्ताबाईनी कोणते तत्त्वज्ञान आत्मसात केले ? (साधारण -आकलन)

III. दोन तीन वाक्यात उत्तरे लिहा.

41. भक्तीचा आनंद शब्दातून व्यक्त करता येत नाही तेव्हा भक्ताची स्थिती कशी होते ?
(कठीण - अभिव्यक्ती)

42. संत मुक्ताबाईनी संतांच्या सद्गुणांचे वर्णन कसे केले आहे ? (कठीण- अभिव्यक्ती)

IV.पाच सहा वाक्यात उत्तरे लिहा.

43. संत मुक्ताबाईनी ताटीचे अभंग कोणत्या प्रसंगी लिहिले आहेत? (कठीण- अभिव्यक्ती)

पद्य 2

सत्वर पाव गे मला

उद्दिष्टानुसार गुणविभागणी :

सत्वर पाव गे मला	स्मरण	आकलन	अभिव्यक्ती	रसग्रहण	एकूण
प्रश्न	11	10	02	03	26
गुण	11	15	05	08	39

प्रश्न प्रकारानुसार गुणविभागणी :

अ. क्र.	प्रश्नाचे स्वरूप	प्रश्न	गुण
1.	वस्तुनिष्ठ प्रश्न - गुण 1	08	08
2.	लघुत्तरी प्रश्न - गुण 1	11	11
3.	लघुत्तरी प्रश्न - गुण 2	03	06
4.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 3	02	06
5.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 4	02	04
6.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 5	-	-
एकूण		26	39

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) 'सत्वर पाव गे मला' या कवितेचे कवी .... (सोपे - ज्ञान)

अ) संत ज्ञानेश्वर ब) संत तुकाराम क) संत एकनाथ ड) संत नामदेव

2) रोडगा म्हणजे .... (सोपे - ज्ञान)

अ) भेटवस्तू ब) देवीला वहावयाचा विशिष्ट रोट क) रोडाविणे ड) बक्षीस देणे

3) या भारुडात जागोजागी.......... हा अलंकार आहे . (कठीण -आकलन)

अ) यमक ब) श्लेष क) अनुप्रास ड) रूपक

4) सासुरवाशिण कोण किरकिर करते असे म्हणते ? (सोपे- ज्ञान)

अ) ननंद ब) नंनदेचे पोर क) दादला ड) जाऊ

5) 'सत्वर पाव गे मला' कवितेचा साहित्यप्रकार.................. (साधारण -आकलन)

अ) नाटक ब) भारुड क) प्राचीन पद्य ड) कविता

6) सासरा कोठे गेला आहे ? (सोपे - ज्ञान)

अ) शेताकडे ब) दिल्ली क) गावी ड) घराकडे

7) सासऱ्याला.......... हे रूपक वापरले आहे. (साधारण -ज्ञान)

अ) आशा ब) अहंकार क) वासना ड) जीव

8) निर्दाळी करणे म्हणजे............... (साधारण -आकलन)

अ) सोडवणूक करणे ब) नाश करणे क) पाणी देणे ड) मदत करणे

II. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

9) संत एकनाथ कोठे राहणारे होते ?	(सोपे -ज्ञान)
10) 'सत्वर पाव गे मला' या कवितेचे मूल्य कोणते ?	(सोपे- ज्ञान)
11) संत एकनाथांचे गुरु कोण होते ?	(सोपे - आकलन)
12) सासुरवाशिण कोणाकडे मागणे मागत आहे ?	(सोपे- ज्ञान)
13) संसाराच्या जाचाला कोण कंटाळले आहे ?	(सोपे- ज्ञान)
14) एकनाथानी सासू साठी कोणते रूपक वापरले आहे ?	(साधारण - आकलन)
15) सासुरवाशिणीला फडफड कोण बोलते?	(सोपे- ज्ञान)
16) विंचू चावला हे भारुड कोणाचे आहे ?	(साधारण -आकलन)
17) फडफड कोण बोलते ?	(सोपे -ज्ञान)
18) खरूज कोणाला होऊ दे, असे सासुरवाशिण म्हणते ?	(साधारण -आकलन)
19) नाथांच्या जीवनात कोणता समन्वय आढळतो ?	(कठीण -अभिव्यक्ती)

III. खालील प्रश्नांची दोन - तीन वाक्यात उत्तरे लिहा.

20) संत एकनाथ यांचा परिचय लिहा ?	(साधारण -रसग्रहण)
21) जीव रुपी सून भवानी आईला काय वाहू इच्छिते ?	(साधारण -आकलन)
22) सासुरवाशीणीचा कोण कोण जाच करत आहेत ?	(कठीण -रसग्रहण)

IV. खालील सहसंदर्भ स्पष्ट करा.

23) "सासू माझी जाच करती | लवकर निर्दाळी तिला"	(साधारण -आकलन)
24) "दादला मारून आहुती देईन | मोकळी कर गे तिला"	(साधारण -आकलन)

V. खालील प्रश्नांची चार - पाच वाक्यात उत्तरे लिहा.

25) संत एकनाथांच्या या भारुडातून प्रकटणारे रूपक उलगडून दाखवा ?	(कठीण -अभिव्यक्ती)
26) या भारुडाचा सारांश लिहा.	(कठीण -रसग्रहण)

पद्य 3

सुश्लोक वामनाचा

उद्दिष्टानुसार गुणविभागणी :

सुश्लोक वामनाचा	स्मरण	आकलन	अभिव्यक्ती	रसग्रहण	एकूण
प्रश्न	12	24	21	11	68
गुण	12	24	20	24	90

प्रश्न प्रकारानुसार गुणविभागणी :

अ. क्र.	प्रश्नाचे स्वरूप	प्रश्न	गुण
1.	वस्तुनिष्ठ प्रश्न - गुण 1	16	16
2.	लघुत्तरी प्रश्न - गुण 1	38	38
3.	लघुत्तरी प्रश्न - गुण 2	08	16
4.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 3	04	12
5.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 4	02	08
6.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 5	-	-
एकूण		69	90

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) वामन पंडित या परंपरेतील अग्रगण्य कवी होत. (सोपे - ज्ञान)

अ) संत परंपरा ब) पंडिती परंपरा क) शाहिरी ड) अर्वाचीन काव्य

2) 'यमक्या वामन' असे यांना म्हणतात. (सोपे -आकलन)

अ) मोरोपंत ब) मुक्तेश्वर क) वामन पंडित ड) नरहरी

3) 'सुश्लोक वामनाचा' या कवितेतील श्लोक या पुस्तकातून घेतले आहेत. (साधारण - आकलन)

अ) नीतिशतक ब) वैराग्य शतक क) शृंगार शतक ड) केकावली

4) दुसऱ्यावर उपकार करणाऱ्यांचा स्वभाव हा आहे. (साधारण - अभिव्यक्ती)

अ) दान करणे ब) नम्र होणे क) कष्ट करणे ड) दया करणे

5) जल देणारा तो (सोपे - ज्ञान)

अ) जलदाई ब) जलद क) जलदाता ड) नभ

6) अतिलाड केल्याने (साधारण - आकलन)

अ) मुलगा आनंदीत होतो ब) सुसंस्कार होतो क) मुलगा बिघडतो ड) मुलगा हट्टी होतो.

7) राजा व राज्य यामुळे लयाला जाते. (साधारण - आकलन)

अ) दुष्ट, स्वार्थी, लाचखाऊ मंत्र्यांमुळे ब) ऐषारामामुळे

क) पैसा उधळल्याने ड) आळसामुळे

II. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा संबंध लिहा.

8) मकर	: मगर	:: सुम	:	(साधारण - आकलन)
9) सिंधु	: समुद्र	:: वृक्ष	:	(साधारण - ज्ञान)
10) मेघ	: ढग	:: जल	:	(सोपे - ज्ञान)
11) कमल	: नलिनी	:: पैसा	:	(साधारण - आकलन)
12) कर	: हात	:: नृप	:	(सोपे - ज्ञान)
13) उपकार	: अपकार	:: नम्र	:	(साधारण - आकलन)
14) गमन	: आगमन	:: तप	:	(साधारण - अभिव्यक्ती)
15) दुष्ट	: सुष्ट	:: अध्ययन	:	(साधारण - कठीण)
16) बलवान	: कमकुवत	:: नृप	:	(साधारण - ज्ञान)

III. संधी सोडवा.

17) दुर्मंत्रे (साधारण - अभिव्यक्ती)

18) दुष्पुत्र (कठीण - अभिव्यक्ती)

19) खलाराधने (कठीण - अभिव्यक्ती)

IV. खालील शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.

20) महासर्प (कठीण - अभिव्यक्ती)

21) महासिंधू (कठीण - अभिव्यक्ती)

22) जलद (साधारण - अभिव्यक्ती)

23) फलभार (कठीण - अभिव्यक्ती)

24) गमनमार्ग (साधारण - अभिव्यक्ती)

25) दुष्पुत्र (साधारण - अभिव्यक्ती)

26) दुर्मंत्रे (साधारण - अभिव्यक्ती)

V) अलंकार ओळखा. (कठीण - अभिव्यक्ती)

27) वृक्ष फार लवती फलभारे
लोंबती जल - द घेऊनी नीरें
थोर गर्व न धरी वि - भवाचा
हा स्वभाव उपकार पराचा

28) वामन पंडितांनी आपल्या काव्यात कोणत्या अलंकाराचा विपुल प्रमाणात वापर केला आहे?
(साधारण - अभिव्यक्ती)

29)मगरीच्या दाढेतील मणी कसा काढू शकतो ? (साधारण - आकलन)

30)बाहुसामर्थ्याने महासागराच्या लाटातून कोठे जाऊ शकतो ? (साधारण - आकलन)

31)एक वेळ फूलाप्रमाणे कोणाला मस्तकावर धारण करू शकतो ? (सोपे - ज्ञान)

32) काळे ढग काय घेऊन येतात ? (साधारण - आकलन)

33) दुसऱ्या वर उपकार करणाऱ्या माणसांचा स्वभाव कसा असतो ? (साधारण - आकलन)

34) स्वाती नक्षत्रात पाण्याचा थेंब शिंपल्यात पडल्यावर काय होते ? (साधारण - आकलन)

35) वामन पंडित यांना कोणत्या नावाने संबोधले जाते ? (साधारण - ज्ञान)

36) झाडे कशाच्या ओझ्याने खाली वाकतात ? (सोपे - आकलन)

37) थोर माणसे कशाचा गर्व करीत नाहीत ? (साधारण - आकलन)

38) पाण्याचा थेंब केव्हा मोत्याप्रमाणे चमकतो ? (साधारण - आकलन)

39) लोखंडाच्या उदाहरणातून कवीने कोणता विचार मांडला आहे ? (कठीण - रसग्रहण)

40) धनाच्या तीन अवस्था कोणत्या ? उदाण उपभोग नाश होणे ? (साधारण - रसग्रहण)

41) राजाचे जीवन केव्हा नष्ट होते ? (सोपे -आकलन)

42)प्रापचिंक माणसाच्या संगतीने कोणाचे जीवन नष्ट होते ? (साधारण - आकलन)

43)मुलाचे खूप लाड केल्याने काय होते ? (सोपे - ज्ञान)

44) दुराचारी पुत्रामुळे कशाचा नाश होतो ? (साधारण - आकलन)

45) शील केव्हा बिघडते ? (साधारण - आकलन)

46) शेती केव्हा नष्ट होते ? (सोपे - ज्ञान)

47) लक्ष्मी कधी निघून जाते ? सोपे - आकलन

48) अब्रु कधी नष्ट होते ? (सोपे - ज्ञान)

49) मैत्री कधी नष्ट होते ? (सोपे - आकलन)

50)स्नेह कधी नष्ट होतो ? (साधारण - आकलन)

51) पैसा कधी नष्ट होतो ? (सोपे - आकलन)

52) ब्राह्मणजात कशामुळे नष्ट होत आहे असे वामनपंडितांना वाटते ? (साधारण - ज्ञान)

53) शेती कोणत्या कारणाने नापीक बनते ? (साधारण - आकलन)

54) लक्ष्मी कोणत्या कारणाने नष्ट होते ? (साधारण - आकलन)

V. खालील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.

55) मूर्खाचे लक्षण कोणते ? (साधारण -अभिव्यक्ती)

56) 'परोपकारी व्यक्तीचा स्वभाव संपत्तीकाळातही नम्र असतो' यासाठी कोणती उदाहरणे दिली आहेत.
(कठीण – रसग्रहण)

57) सज्जनांच्या संगतीने उत्तम अवस्था प्राप्त होते हे पटवून देण्यास कोणते उदाहरण दिले आहे ?
(कठीण - अभिव्यक्ती)

58) संगतीने माणसाला अधम, मध्यम अवस्था प्राप्त होते हे सांगण्यासाठी कोणती उदाहरणे दिली आहेत.
(कठीण - रसग्रहण)

VI. संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

59) परंतु क्षुद्राचे हृदय धरवेना क्षणभरी ॥ (साधारण- रसग्रहण)

60) हा स्वभाव उपकार-पराचा ॥ (साधारण - रसग्रहण)

61) ते स्वातीस्तव अब्धिशुक्ती-पुटकीं मोती घडे नेटकें । (कठीण - रसग्रहण)

VII. खालील प्रश्नांची पाच ते सहा ओळीत उत्तरे लिहा.

62) द्रव्याच्या तीन अवस्थांचे वर्णन कर. (साधारण - अभिव्यक्ती)

63) मूर्खाची समजूत घालणे कठीण आहे यासाठी कोणती उदाहरणे दिली आहेत. (कठीण - आकलन)

VIII. खालील प्रश्नांची आठ ते दहा ओळीत उत्तरे लिहा.

64) परोपकारी व्यक्तींचा स्वभाव कसा असतो ? हे सांगण्यासाठी कोणती उदाहरणे दिली आहेत ?

(कठीण - रसग्रहण)

65) जीवनातील कोणत्या गोष्टी हातातून निघून गेल्यास जीवन वाया जाते असे कविला वाटते ?

(कठीण - रसग्रहण)

IX. लघुगुरु खुणा करा व वृत्त ओळखा.

66) तोयाचें परि नावही न उरतें सं-तप्त-लोहांतरी ॥ (कठीण - अभिव्यक्ती)

67) द्रव्यास हे गमनमार्ग यथावकाश (साधारण - अभिव्यक्ती)

68)दुर्मंत्रे नृप, संगतीस्तव यती, कीं पुत्रही लालने । (कठीण - अभिव्यक्ती)

पद्य 4

फटका

उद्दिष्टानुसार गुणविभागणी :

फटका	स्मरण	आकलन	अभिव्यक्ती	रसग्रहण	एकूण
प्रश्न	15	11	03	03	32
गुण	15	14	08	09	46

प्रश्न प्रकारानुसार गुणविभागणी :

अ. क्र.	प्रश्नाचे स्वरूप	प्रश्न	गुण
1.	वस्तुनिष्ठ प्रश्न - गुण 1	14	14
2.	लघुत्तरी प्रश्न - गुण 1	10	10
3.	लघुत्तरी प्रश्न - गुण 2	03	06
4.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 3	04	12
5.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 4	01	04
6.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 5	-	-
एकूण		32	46

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) अनंत फंदी यांचे पूर्ण नाव काय ? (सोपे- ज्ञान)

अ) अनंत घोलप ब) सदानंद कदम क) सदाशिव घोलप ड) अनंत यादव

2) अनंत फंदी कोणत्या जिल्ह्याचे रहिवासी होते ? (सोपे- ज्ञान)

अ) सातारा ब) पूणे क) नाशिक ड) अहमदनगर

3) उत्तर पेशवाईतील लोकप्रिय शाहीर कोण ? (साधारण - ज्ञान)

अ) अनंत फंदी ब) बाबूराव काळे क) सदाशिव साठे ड) राम जोशी

4) अनंत फंदी यांची कोणती रचना प्रसिद्ध आहे ? (साधारण - ज्ञान)

अ) माधवग्रंथ ब) निधी क) रचना ड) समाजकाव्य

5) अनंत फंदी कोणाच्या उपदेशामुळे कीर्तनाकडे वळले ? (साधारण - ज्ञान)

अ) अहिल्याबाई ब) तुकाराम क) मुक्ताबाई ड) बहिणाबाई

6) कवी अनंत फंदी कोणता मार्ग सोडू नको म्हणत आहेत ? (साधारण - आकलन)

अ) धोपट ब) पुढचा क) वाकडा ड) मागे

7) अनंत फंदी कोणावर रूसू नको म्हणत आहेत ? (सोपे - ज्ञान)

अ) मायबापावर ब) बहिणीवर क) मित्रावर ड) बायकोवर

8) कोणाची मैत्री करू नको असे अनंत फंदी म्हणतात ? (सोपे - ज्ञान)

अ) शहाण्याची ब) चोराची क) भिकाऱ्याची ड) मूर्खाची

9) नास्तिक या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता ? (सोपे - ज्ञान)

अ) पुरोगामी ब) आस्तिक क) प्रतिगामी ड) शहाणा

10) सत्कर्म या समासाचा प्रकार हा आहे. (साधारण - आकलन)

अ) कर्मधारय ब) अव्ययीभाव क) नत्र तत्पुरुष ड) बहुव्रीही

II. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा शब्द लिहा.

11) राग : प्रेम :: धर्म : .... (साधारण - ज्ञान)

12) सुख : दुःख :: मुर्ख : .... (साधारण - ज्ञान)

13) स्वहित : षष्ठी तत्पुरूष समास :: सुविचार : .... (साधारण - आकलन)

14) अखंड : महात्मा जोतीराव फुले :: फटका : .... (सोपे - ज्ञान)

III. एका वाक्यात उत्तरे लिहा

15. बिकट वाट म्हणजे काय ? (साधारण - आकलन)

16. अनंत फंदी कशाची भाजी भाकरी बरी म्हणत आहेत ? (सोपे - ज्ञान)

17. नौबदिचा डंका कधी वाजेल ? (साधारण - आकलन)

18. कशाचा विडा उचलू नकोस असे अनंत फंदी म्हणतात ? (साधारण -आकलन)

19. स्वहितासाठी काय करू नको असे अनंत फंदी म्हणतात ? (साधारण - आकलन)

20. फटका या कवितेचे मूल्य कोणते ? (सोपे - ज्ञान)

21. फटका ही कविता कोणत्या पुस्तकातून घेतली आहे ? (साधारण - ज्ञान)

22. फटक्याची रचना कोणत्या भाषेत केली आहे ? (साधारण - ज्ञान)

23. फटका या प्रकारात कोणता उपदेश केलेला आहे ? (साधारण - आकलन)

24. अनंत फंदी यांचा पिढीजात व्यवसाय कोणता होता ? (साधारण - आकलन)

IV. खालील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.

25. अंगी कोणते गुण असावेत व कोणते गुण नसावेत ? (कठीण - अभिव्यक्ती)

26. कवी कशाचा गर्व धरू नको असे सांगतात ? (कठीण - आकलन)

27. सत्ता, अपयश याबद्दल कवीने काय म्हटले आहे ? (कठीण - रसग्रहण)

VI. संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

28. सुविचार कातरु नको । सत्संगत अंतरू नको ॥ (कठीण - आकलन)

29. बहुत कर्जबाजारी होऊनी । बोज आपला दवडू नको II (साधारण - अभिव्यक्ती)

VII. खालील प्रश्नांची पाच ते सहा ओळीत उत्तरे लिहा.

30. निंदा व स्तुती या बद्दल कवीने काय म्हटले आहे ? (कठीण - रसग्रहण)

31. या फटक्यात कवीने कोणते सद्गुण सांगितले आहेत ? (कठीण -अभिव्यक्ती)

VIII. खालील प्रश्नाचे आठ ते दहा ओळीत उत्तर लिहा.

32. फटका या कवितेत कवीने काय काय करू नये असे सांगितले आहे ? कठीण - रसग्रहण)

पद्य 5

अखंड

उद्दिष्टानुसार गुणविभागणी :

अखंड	स्मरण	आकलन	अभिव्यक्ती	रसग्रहण	एकूण
प्रश्न	19	14	03	02	38
गुण	25	14	11	06	56

प्रश्न प्रकारानुसार गुणविभागणी :

अ. क्र.	प्रश्नाचे स्वरूप	प्रश्न	गुण
1.	वस्तुनिष्ठ प्रश्न - गुण 1	11	11
2.	लघुत्तरी प्रश्न - गुण 1	18	18
3.	लघुत्तरी प्रश्न - गुण 2	03	06
4.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 3	03	09
5.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 4	03	12
6.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 5	-	-
एकूण		38	56

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) महात्मा फुले यांचा जन्म या गावी झाला. (सोपे - ज्ञान)

अ) करगुन ब) पुणे क) रत्नागीरी ड) कोल्हापूर

2) महात्मा फुले यांनी या चालीरीतीना फाटा दिला. (सोपे - ज्ञान)

अ) आधुनिक ब) जुन्या चालीरीती क) पारंपारिक ड) पाश्चिमात्य

3) समतेवर आधारित समाजाची संकल्पना मांडणारे थोर विचारवंत कोण ? (सोपे- ज्ञान)

अ) महात्मा गांधीजी ब) कर्मवीर भाऊराव पाटील क)महात्मा फुले ड) महर्षी शिंदे

4) महात्मा फुले यांनी या समाजाची स्थापना केली. (सोपे- ज्ञान)

अ) प्रार्थना समाज ब) ब्राह्मो समाज क)आर्य समाज ड)सत्यशोधक समाज

5) महात्मा फुलेंचा जन्म कोणत्या साली झाला ? (सोपे- ज्ञान)

अ) 1827 ब)1927 क)1826 ड) 1829

6) महात्मा फुले यांचा मृत्यू या साली झाला. (सोपे- ज्ञान)

अ) 1990 ब) 1890 क) 1940 ड) 1880

7) महात्मा फुलेंच्या पत्नीचे नाव काय ? (सोपे - आकलन)

अ) कस्तुरबा ब) सखुबाई क) सवित्रीबाई ड) बिठाबाई

II. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा .

8) एकोणिसाव्या शतकातील थोर कर्ते समाज सुधारक कोण ? (सोपे - ज्ञान)

9) महात्मा फुलेंनी स्वतःच्या काव्यरचनेला कोणते नाव दिले ? (सोपे - आकलन)

10) पिडा म्हणजे काय ? (सोपे - आकलन)

11) रोकडा कशाला म्हणतात ? (साधारण - आकलन)

12) कुनिती म्हणजे काय ? (कठीण - आकलन)

13) लोभ कशाला म्हणतात ? (साधारण - आकलन)

14) मानवी चित्तास स्वस्थता केव्हा लाभते ? (सोपे - आकलन)

15) यशवंत होण्यासाठी कोणत्या गुणांची गरज आहे ? (सोपे - आकलन)

16) मानवाचा कोणता धर्म आहे ? (सोपे - ज्ञान)

17) ज्ञानी माणूस कोणास म्हटले आहे ? (सोपे - ज्ञान)

18) धनंजय कीर यांनी लिहिलेले फुलेंचे चरित्र कोणते ? (सोपे - आकलन)

19) 'सत्य ' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता आहे ? (सोपे -आकलन)

20) 'मानव 'या शब्दाचा समानार्थी शब्द लिहा. (सोपे - आकलन)

21) आपले जीवन कोणत्या मार्गी खर्च करावे असे महात्मा फुले म्हणतात ? (सोपे -ज्ञान)

22) मानवाने कसे वागावे असे महात्मा फुले असे म्हणतात ? (सोपे - ज्ञान)

23) अखंड ही कविता फुलेंच्या कोणत्या पुस्तकातून घेतली आहे ? (सोपे - ज्ञान)

24) फुलेंनी कोणत्या हेतूने विपुल असे लेखन केले आहे ? (सोपे- ज्ञान)

25) महात्मा फुले कोणता धर्म कायम करावा असे म्हणतात ? (सोपे- ज्ञान)

III. दोन ते चार वाक्यात उत्तरे लिहा .

26) महात्मा फुलेंनी कोणत्या गोष्टीविरुद्ध लढा दिला (सोपे- ज्ञान)

27) महात्मा फुलेंनी कोण कोणते ग्रंथ लिहिले आहेत ? (सोपे- ज्ञान)

28) महात्मा फुले यांनी कशासाठी अपार कष्ट घेतले ? (सोपे- ज्ञान)

IV. पहिल्या दोन पदांचा संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा संबंध लिहा.

29) ज्ञानी	: अज्ञानी	: : स्वछता	: - - - - -	(सोपे - आकलन)
30) आशा	: निराशा	: : धर्म	: - - - - -	(सोपे - आकलन)
31) जिव्हाळा	: प्रेम	: : चित्त	: - - - -	(साधारण -आकलन)
32) संताची रचना	: अभंग	: : फुलेंची रचना : - - - -		(सोपे- ज्ञान)

V . पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

33) मानवाला यशवंत होण्यासाठी कोणकोणत्या सद्गुणांची आवश्यकता आहे ? (सोपे- ज्ञान)

34) महात्मा फुलेंनी कोणत्या मानवाला सद्गुनी म्हटले आहे ? (कठीण - अभिव्यक्ती)

35) महात्मा फुले सत्याचे स्वरूप कसे स्पष्ट केले आहे ? (कठीण - अभिव्यक्ती)

VI. संदर्भासह स्पष्टीकरण करा.

36) "धीर धरूनीया सर्वा सुख देती ॥यशवंत होती ॥ज्योती म्हणे " ॥ (कठीण - रसग्रहण)

37) "मानवाचा धर्म सत्य हीच नीती बाकीची कुनीती ॥ ज्योती म्हणे " ॥ (कठीण - रसग्रहण)

38) " आपसुखदुःख पराचे जाणतो ॥ त्यांच्याशी वर्ततो ॥ तोच धन्य " ॥ (कठीण - अभिव्यक्ती)

पद्य 6

प्रेम स्वरुप आई

उद्दिष्टानुसार गुणविभागणी :

प्रेम स्वरुप आई	स्मरण	आकलन	अभिव्यक्ती	रसग्रहण	एकूण
प्रश्न	15	06	05	01	27
गुण	16	09	13	04	42

प्रश्न प्रकारानुसार गुणविभागणी :

अ. क्र.	प्रश्नाचे स्वरूप	प्रश्न	गुण
1.	वस्तुनिष्ठ प्रश्न - गुण 1	11	11
2.	लघुत्तरी प्रश्न - गुण 1	08	08
3.	लघुत्तरी प्रश्न - गुण 2	03	06
4.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 3	03	09
5.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 4	02	08
6.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 5	-	-
एकूण		27	42

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) माधव ज्यूलियन या मंडळाचे सभासद होते. (साधारण - ज्ञान)

अ) साहित्य मंडळ ब) साहित्य एकादमी क)साहित्य संघ ड) रवीकिरण मंडळ

2) सुधारक या पुस्तकाचा साहित्य प्रकार हा आहे. (सोपे - ज्ञान)

अ) खंडकाव्या ब) सुनीत काव्या क) विडंबन काव्या. ड) नाटक

3) कवीचा जीव याचा हेका सोडीना. (साधारण - ज्ञान)

अ)विद्या हवी ब)आई हवी क) धन हवे ड)वडील हवे

4) काय सोडून उल्के समान वेगाने ये असे म्हटले आहे ? (सोपे - ज्ञान)

अ) कैलास ब) आकाश क) हिमालय ड) स्वर्ग

5) प्रेमस्वरूप आई या कवितेचे कवी कोण ? (साधारण - आकलन)

अ) वामन पंडित ब) संत एकनाथ क) कुसुमाग्रज ड) माधव ज्युलियन

6) प्रेमस्वरूप आई ही कविता कोणत्या पुस्तकातून घेतली आहे ? (सोपे - ज्ञान)

अ) गजलांजली ब) तुटलेले दिवे क) सुधारक ड)मधु लहरी.

7) प्रेमस्वरूप आई या कवितेचे मूल्य काय आहे ? (साधारण - ज्ञान)

अ) मातृप्रेम ब)सदाचार क) भक्ती ड) परोपकार

II. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जोडणारा शब्द लिहा.

8)	राजपुत्र	: तत्पुरुष समास	:: यथाशक्ती	:........	(साधारण - ज्ञान)
9)	सेवक x	मालक	:: सुयोग	:..........	(सोपे - ज्ञान)
10)	मुलगा	:नाम	::भारत देश	:...........	(सोपे - ज्ञान)
11)	आज्ञा -	हुकूम	:: पुत्र	:..........	(सोपे - आकलन)

III. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

12) कवी माधव ज्युलियन यांना काय म्हणून संबोधण्यात येत असे ? (सोपे - ज्ञान)

13) कवीचे पूर्ण नाव लिहा. (सोपे - ज्ञान)

14) विद्याधन प्रतिष्ठा मिळवून सुद्धा कवी पोरकाच का ? (साधारण - आकलन)

15) भूक पोरक्याची शांत का होत नाही ? (सोपे - ज्ञान)

16) प्रणय पंढरीचे वारकरी असे कोणाला म्हणतात ? (साधारण - ज्ञान)

17) कवीच्या जीवनात कोणाची उणीव जाणवत आहे ? (सोपे - ज्ञान)

18) कवी कोणाचा हेका सोडेना ? (साधारण - आकलन)

19) कवी कोणाच्या आठवणीने व्याकुळ होत आहे ? (कठीण - अभिव्यक्ती)

IV. खालील प्रश्नांची तीन किंवा चार वाक्यात उत्तरे लिहा.

20) कवीला ब्रह्मांड का आठवत आहे ? (साधारण - ज्ञान)

21) वात्सल्य सिंधू असे कोणाला व का म्हटले आहे ? (साधारण - आकलन)

22) दुसऱ्यांचे वात्सल्य पाहून कवीला काय वाटते ? (कठीण - अभिव्यक्ती)

V. संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

23) आईविणेपरी मी हा पोरकाच राही (साधारण -आकलन)

24) नेत्री तुझ्या हसावे चित्ती तुझ्या ठसावे (कठीण - अभिव्यक्ती)

25) चित्ती तुझी स्मरण काहीच रूपरेखा (कठीण - अभिव्यक्ती)

VI. खालील प्रश्नांची आठ ते दहा ओळीत उत्तर लिहा.

26) मातेच्या वियोगाने आणि आठवणीने येणारी व्याकुळता व्यक्त करा. (कठीण - रसग्रहण)

27) अव्यक्त अश्रुधारा म्हणजे काय ? (कठीण - अभिव्यक्ती)

पद्य 7
पोया

उद्दिष्टानुसार गुणविभागणी :

पोया	स्मरण	आकलन	अभिव्यक्ती	रसग्रहण	एकूण
प्रश्न	14	07	06	05	32
गुण	15	07	16	09	47

प्रश्न प्रकारानुसार गुणविभागणी :

अ. क्र.	प्रश्नाचे स्वरूप	प्रश्न	गुण
1.	वस्तुनिष्ठ प्रश्न - गुण 1	14	14
2.	लघुत्तरी प्रश्न - गुण 1	09	09
3.	लघुत्तरी प्रश्न - गुण 2	05	10
4.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 3	02	06
5.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 4	02	08
6.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 5	-	-
एकूण		32	47

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) शेतकऱ्याचा सर्वात मोठा सण कोणता ? (सोपे - ज्ञान)

अ) दसरा ब) दिवाळी क) भाऊबीज ड) बैलपोळा

2) बैलांना कशाचा नैवेद्य ठेवावयास सांगितले आहे ? (सोपे - ज्ञान)

अ) पुरणाच्या पोळ्या ब) दहिभात क) ज्वारी ड) आंबील

3) कामदार बंदा असे कोणाला म्हटले आहे ? (साधारण - ज्ञान)

अ) कामगाराला ब) माणसालाक क) बैलाला ड) मालकाला

4) मीठभाकर हा काव्यसंग्रह कोणाचा आहे ? (कठीण - आकलन)

अ)गदिमा ब) ग.ल.ठोकळ क) बहिणाबाई चौधरी ड) बा.भ.बोरकर

5) बहिणाबाई चौधरींचा जन्म खेड्यात.....कुटुंबात झाला ? (सोपे -ज्ञान)

अ)शेतकरी ब) सावकारी क)सधन ड) राजकारणी

6) पोया कवितेचा साहित्यप्रकार कोणता ? (कठीण -ज्ञान)

अ) दलित कविता ब) ग्रामीण कविता क) निसर्ग कविता ड) देशभक्तीपर

7) पोया कवितेचे मूल्य कोणते ? (कठीण - ज्ञान)

अ)देशप्रेम ब) निसर्ग प्रेम क) मातृप्रेम ड) कृतज्ञता

II. पुढील ओळीतील सहसंबंध ओळखून उत्तरे लिहा.

8) बहिणाबाई चौधरी जन्म	: 1880	:: निधन....	(साधारण - आकलन)
9) पोया साहित्यप्रकार	: ग्रामीण कविता	:: मूल्य :......	(कठीण - ज्ञान)
10) माथ्यावर	: रेशमाचे गोंडे	:: पायात......	(साधारण - आकलन)
11) गळ्यात	: गुंठ्याघुंगरू	:: अंगावर.....	(साधारण - आकलन)
12) शेंदूर	: केशरी रंग	:: चुल्हे......	(साधारण - आकलन)
13) बंदा	: कामगार	:: खुराक....	(साधारण - आकलन)
14) घंट्याघुंगरू	: द्वंद्व समास	:: पुरणपोळी	(कठीण - अभिव्यक्ती)

III. पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

15) निसर्गकन्या म्हणून कोणाचा गौरव केला जातो ? (साधारण - आकलन)

16) पोया ही कविता कोणत्या काव्यसंग्रहातून निवडले आहे ? (कठीण - ज्ञान)

17) शेंदूर घोटण्यास का सांगितले आहे ? (साधारण - ज्ञान)

18) घरदार कशासाठी सजवण्यास सांगितले आहे ? (साधारण - ज्ञान)

19) शेतकरी कोणाच्या जीवावर शेती पिकवितो ? (साधारण - ज्ञान)

20) वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. उपकाराचे देणे फेडणे. (कठीण - रसग्रहण)

21) वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.मगदुल होणे. (कठीण - रसग्रहण)

22) बहिणाबाई आयाबायांना लवकर उठण्यास का सांगत आहे ? (सोपे - ज्ञान)

23) पोया सणादिवशी बैलांना खुराक कशाचा दिला जातो ? (सोपे - ज्ञान)

IV. पुढील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.

24) पोळा सणाची पूर्वतयारी कशी करण्यास सांगितली आहे ? (कठीण - अभिव्यक्ती)

25) पोळा सणादिवशी बैलांना कसे सजवण्यास सांगितले आहे ? (साधारण - ज्ञान)

26) पोया सणादिवशी स्त्रियांना काय करण्यास सांगितले आहे ? (कठीण - अभिव्यक्ती)

27) परिचय लिहा - बहिणाबाई चौधरी. (कठीण - रसग्रहण)

28) बैलाच्या कष्टाचे वर्णन कसे केले आहे ? (कठीण - रसग्रहण)

V. खालील प्रश्नांची पाच ते सहा ओळीत उत्तरे लिहा.

29) पोळा सणा दिवशी बहिणाबाई कोणते मागणे मागते ? (कठीण - रसग्रहण)

30) संदर्भासह स्पष्ट करा.' उभे कामाचे ढिगारे, बैल कामदार बंदा' (साधारण - अभिव्यक्ती)

IV. पुढील प्रश्नांची सात ते आठ वाक्यात उत्तरे लिहा.

31) बैलाशी कृतज्ञतेने कसे वागावे असे कवयित्रीने सांगितले आहे ? (कठीण - अभिव्यक्ती)

32) बैलपोळा सणाचे वर्णन करा ? (कठीण - अभिव्यक्ती)

पद्य 8

आचंद्रसूर्य नांदो

उद्दिष्टानुसार गुणविभागणी :

आचंद्रसूर्य नांदो	स्मरण	आकलन	अभिव्यक्ती	रसग्रहण	एकूण
प्रश्न	13	14	04	-	31
गुण	21	20	10	-	51

प्रश्न प्रकारानुसार गुणविभागणी :

अ. क्र.	प्रश्नाचे स्वरूप	प्रश्न	गुण
1.	वस्तुनिष्ठ प्रश्न - गुण 1	09	09
2.	लघुत्तरी प्रश्न - गुण 1	12	12
3.	लघुत्तरी प्रश्न - गुण 2	03	06
4.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 3	05	15
5.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 4	01	04
6.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 5	01	05
एकूण		31	51

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) ग. दि. माडगूळकर यांचा जन्म या वर्षी झाला. (साधारण- ज्ञान)

अ) 1977 ब) 1919 क) 1976 ड) 1980

2) 'आकाशाची फळे' या पुस्तकाचा साहित्य प्रकार हा आहे. (सोपे -आकलन)

अ) कादंबरी ब) काव्यसंग्रह क) आत्मचरित्र ड) कथासंग्रह

3) पार्थास बोध याने केला. (सोपे -आकलन)

अ) श्रीकृष्णाने ब) शिवबाने क) माधवाने ड) गौतमाने

4) येथे याचा पायाच सत्य आहे. (सोपे -आकलन)

अ) जन शासनाचा ब) भांडवलशाहीचा क) हुकूमशाहीचा ड) सावकारशाहीचा

5) यवतमाळ येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन या साली झाले. (साधारण- ज्ञान)

अ) 1981 ब) 1917 क) 1977 ड) 1976

6) 'गीतरामायण' कोणी लिहिले. (सोपे -आकलन)

अ) व्यंकटेश माडगूळकर ब) ग. ल. ठोकळ क) योगीराज वाघमारे ड) ग. दि. माडगूळकर

7) ग. दि. माडगूळकरांच्या आत्मचरित्राचे नाव हे आहे. (कठीण -अभिव्यक्ती)

अ) चैत्रबन ब) वाटेवरल्या सावल्या क) जोगिया ड) गीतरामायण

II. पहिल्या ओळीतील संबंध ओळखून दुसऱ्या पदाशी जुळणारा शब्द लिहा.

8) रघुत्तम : श्रीराम :: माधव :…………… (सोपे - ज्ञान)

9) चंद्र : शशी :: सूर्य :…………… (सोपे - आकलन)

III. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

10) 'गदिमांना' भारत सरकारने कोणता किताब दिला ? (सोपे - ज्ञान)

11) 'आधुनिक वाल्मिकी' असे कोणाला म्हटले आहे ? (सोपे - ज्ञान)

12) येथे मेळ कशाकशाचा झाला आहे ? (साधारण - आकलन)

13) नरसिंह योग्यतेचे कोण आहे ? (साधारण - आकलन)

14) हा देश कशाचे स्तन्य प्याला आहे ? (सोपे - ज्ञान)

15) या देशात कशाची रामायणे घडावीत असे कवीला वाटते ? (सोपे - आकलन)

16) या कवितेत स्वतंत्र भारताचा गौरव कसा केलेला आहे ? (सोपे - ज्ञान)

17) १९७६ च्या यवतमाळ येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष कोण होते ?
(सोपे - ज्ञान)

18) ग. दि. माडगूळकरांची लेखन वैशिष्ट्ये लिहा. (सोपे - आकलन)

19) गीताख्य म्हणजे काय ? (साधारण - ज्ञान)

20) 'आचंद्रसूर्य नांदो' या कवितेचे मूल्य लिहा. (सोपे - अभिव्यक्ती)

21) ग. दि. माडगूळकरांचे पूर्ण नाव लिहा. (सोपे - आकलन)

VI. संदर्भासह स्पष्टीकरण करा.

22) 'शिर उंच उंच व्हावे, हिम वंत पर्वताचे' (कठीण - आकलन)

23) 'येथे सदा निनादो, जयगीत जागृताचे' (कठीण - ज्ञान)

24) 'रामायणे घडावी, येथे पराक्रमाची' (सोपे - आकलन)

V. खालील प्रश्नांची पाच ते सहा ओळीत उत्तरे लिहा.

25) हे क्षेत्र पुण्यदायी कशाने बनले आहे ? (साधारण - अभिव्यक्ती)

26) परंपरांचा सन्मान नित्य आहे असे कवीने का म्हटले आहे ? (कठीण - आकलन)

27) या देशातील जागती प्रथा कोणती ? (कठीण - ज्ञान)

28) ग. दि. माडगूळकरांचा परिचय लिहा. (सोपे - आकलन)

29) हिमालय पर्वताचे शिर उंच व्हावे असे कविला का वाटते आहे ? (साधारण - ज्ञान)

VI. खालील प्रश्नाचे आठ-दहा ओळीत उत्तर लिहा.

30) 'काळ 'आ चंद्र सूर्य नांदो' या कवितेचा सारांश थोडक्यात लिहा. (साधारण - ज्ञान)

VII. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंधलेखन करा. (कठीण - अभिव्यक्ती)

31. अ) 'राष्ट्रीय एकात्मता : काळाची गरज

पद्य 9
हिरवळ आणिक पाणी

उद्दिष्टानुसार गुणविभागणी :

हिरवळ आणिक पाणी	स्मरण	आकलन	अभिव्यक्ती	रसग्रहण	एकूण
प्रश्न	09	11	04	02	26
गुण	09	14	07	06	36

प्रश्न प्रकारानुसार गुणविभागणी :

अ. क्र.	प्रश्नाचे स्वरूप	प्रश्न	गुण
1.	वस्तुनिष्ठ प्रश्न - गुण 1	10	10
2.	लघुत्तरी प्रश्न - गुण 1	09	09
3.	लघुत्तरी प्रश्न - गुण 2	05	10
4.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 3	01	03
5.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 4	01	04
6.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 5	-	-
एकूण		26	36

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) हिरवळ आणिक पाणी या कवितेचा साहित्य प्रकार कोणता ? (सोपे - ज्ञान)

अ) भावकविता ब) निसर्ग कविता क) ग्रामीण कविता ड) विडंबन.

2) कवी बा.भ.बोरकर यांचा जन्म कोणत्या गावी झाला ? (साधारण - आकलन)

अ)बोरी ब) मुंबई. क) रायगड ड)पुणे.

3) कवीला गाणी हे पाहिल्यानंतर स्फुरतात. (साधारण - आकलन)

अ) हिरवळ आणिक पाणी ब) चंद्र आणि तारे क) वेली व फुले ड)मुले आणि मुली.

4) हवेतून खेळणारे आरोग्य असे असते. (साधारण - ज्ञान)

अ) सुंदर ब)आरसपाणी क) धडधाकट ड)दुबळे

5) शरदाचे आमंत्रण कशात असते ? (कठीण - ज्ञान)

अ) मोहात ब)रागात क)लोभात ड)स्मितात.

6) जीवन सुस्थिर यावर झालेले असते. (सोपे - आकलन)

अ) प्रेम ब) विश्वास क) माया ड) भक्ती

7) सुखात कोण चरत आहेत ? (सोपे - आकलन)

अ) ससा ब) गुरे वासरे क)कासव ड)यापैकी नाही.

8) पानोपानी या सामासिक शब्दाचा समास ओळखा. (कठीण - अभिव्यक्ती)

अ)तत्पुरुष समास ब)द्वंद्व समास क)अव्ययीभाव समास. ड) बहुव्रीही समास.

9) पुत्र या शब्दाचा समानार्थी शब्द लिहा. (सोपे - ज्ञान)

अ) दादा. ब) काका क) मुलगी ड) मुलगा.

10) उरी जिथे भूमीची माया उन्हात घाली हिरवी छाया. वरील ओळीतील अलंकार ओळखा. (सोपे- ज्ञान)

अ) रूपक ब) उत्प्रेक्षा क) दृष्टांत ड) उपमा.

II. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा

11) हिरवळ आणिक पाणी या कवितेचे कवी कोण ? (कठीण - ज्ञान)

12) कवी बा.भ. बोरकर यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये सांगा. (कठीण - आकलन)

13) हिरवळ आणिक पाणी या कवितेचे मूल्य कोणते ? (साधारण - ज्ञान)

14) ही कविता कोणत्या काव्यसंग्रहातून घेतली आहे ? (कठीण - ज्ञान)

15) कवी बा.भ.बोरकरांची कोणत्या गोष्टीवर श्रद्धा होती ? (कठीण - आकलन)

16) आनंदाचे पाझर कोठे सापडतात ? (सोपे - आकलन)

17) शृगाराची निर्मळ अमृतवाणी कोठे आढळते ? (कठीण - ज्ञान)

18) दिलासा कशामुळे मिळतो ? (सोपे - आकलन)

19) मनाला उद्याचा भार केव्हा नसतो ? (साधारण - आकलन)

III. खालील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.

20) गुरे वासरे कोठे व कशी चरतात ? (सोपे - अभिव्यक्ती)

21) समृद्ध धरित्रीच्या ठिकाणाचे वर्णन कवीने कसे केले आहे ? (साधारण - रसग्रहण)

22) अंगणात शृगाराची निर्मळ अमृतवाणी केव्हा असते? (सोपे -आकलन)

IV. संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

23) जिथे अशी समृद्ध धरित्रि धुमति घरे अन् पुत्र कलत्री. (साधारण - अभिव्यक्ती)

24) माणूस जेथे हवाहवासा. अभंग -ओवीमध्ये दिलासा. (सोपे – अभिव्यक्ती)

V. खालील प्रश्नांचे पाच - सहा वाक्यात उत्तरे लिहा.

25) शरद ऋतुचे वर्णन कवीने कसे केले आहे ? (साधारण -आकलन)

VI. खालील प्रश्नाचे सात ते आठ वाक्यात उत्तरे लिहा.

26) या कवितेमध्ये केलेले निसर्गाचे वर्णन तुमच्या शब्दात लिहा. (कठीण - रसग्रहण)

पद्य 10

सुंदर ते ध्यान

उद्दिष्टानुसार गुणविभागणी :

सुंदर ते ध्यान	स्मरण	आकलन	अभिव्यक्ती	रसग्रहण	एकूण
प्रश्न	06	11	07	07	31
गुण	06	20	13	19	58

प्रश्न प्रकारानुसार गुणविभागणी :

अ. क्र.	प्रश्नाचे स्वरूप	प्रश्न	गुण
1.	वस्तुनिष्ठ प्रश्न - गुण 1	12	12
2.	लघुत्तरी प्रश्न - गुण 1	09	09
3.	लघुत्तरी प्रश्न - गुण 2	-	-
4.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 3	04	12
5.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 4	05	20
6.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 5	01	05
एकूण		31	58

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) 'सुंदर ते ध्यान'असे कोणाला उद्देशून म्हटले आहे ? (सोपे - आकलन)

अ)शेतकरी ब) विठ्ठल क) औत ड) विळा

2) शेतकऱ्यांची मकरकुंडले कोणती आहेत ? (साधारण - अभिव्यक्ती)

अ) नांगरविळा ब) तुळशीहार क) कासे पितांबर ड) घामाच्या धारा.

3) झोपडीत रखुमाई कशी राहिली आहे ? (साधारण - ज्ञान)

अ) भुकेलेली ब) माथ्यावर टिळा लावून क) कष्टणारी ड) कमरेवर हात

4) अन्नावीण देखील आई काय करते ? (सोपे - आकलन)

अ) कष्ट करते ब) वाट पाहते क)आरती म्हणते ड)नगारे वाजविते.

5) भुकेलेली पोरी आरत्या कशी म्हणत आहेत ? (सोपे - रसग्रहण)

अ) धोंगडीचा उबारा घेऊन ब)माथ्यावर टिळा लावून

क)पोटाचे नगारे वाजवून ड)कष्ट करून.

6) पितांबर या समासाचा प्रकार हा आहे ? (साधारण - आकलन)

अ) अव्ययीभाव समास ब)तत्पुरुष समास क)द्वंद्व समास ड)कर्मधारेय समास.

7) औत या शब्दाचा समानार्थी शब्द हा आहे. (साधारण - ज्ञान)

अ) कुदळ ब)नांगर क)कोयता ड)फावडा.

8) विडंबन या शब्दाचा अर्थ असा होतो ? (साधारण - आकलन)

अ) किंचाळणे ब)पाहणे क)वेडावणे ड)डोकावणे.

9) पु. ल.देशपांडे यांचे पूर्णनाव हे आहे. (सोपे - ज्ञान)

अ) पुंडलिक लक्ष्मण देशपांडे ब) पुनीत ललित देशपांडे

क) पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे ड) पुरोहित ध्यानचंद गोखले.

II. पहिल्या जोडीतील संबंध ओळखून दुसऱ्या पदांशी जुळणाऱ्या शब्द लिहा.

10) माथा : कपाळ :: कासे :.......... (साधारण - आकलन)

11) पाप : पुण्य : :सुंदर :.......... (सोपे - ज्ञान)

12) प्रेमस्वरूप आई : माधव ज्युलियन ::सुंदर ते ध्यान :.......... (सोपे - आकलन)

III. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा?

13) शेतकऱ्याचे ध्यान कशावरती आहे ? (साधारण -आकलन)

14) शेतकऱ्याचा पोशाख कसा आहे ? (सोपे - अभिव्यक्ती)

15) शेतकऱ्याला थंडीला उबारा कशाचा मिळतो ? (सोपे - ज्ञान)

16) चिखलाचा टिळा कोणी व कोठे लावला आहे ? (साधारण - अभिव्यक्ती)

17) पु. ल. देशपांडे यांच्या कोणत्या पुस्तकाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला ?
(कठीण - आकलन)

18) सुंदर ते ध्यान हा मूळ अभंग कोणी लिहिला ? (साधारण - अभिव्यक्ती)

19) तुकारामांच्या मूळ अभंगात विठ्ठलाच्या जागी कोणाचे रूपक वर्णन केले आहे ? (सोपे - ज्ञान)

20) सुंदर ते ध्यान या कवितेचे मूल्य काय ? (कठीण - रसग्रहण)

21) विडंबन काव्य म्हणजे काय ? (साधारण -अभिव्यक्ती)

IV. खालील संदर्भासह स्पष्टीकरण करा.

22) "तुळशि -हार नाही गळा, कमरेला विळा माथ्यावर टिळा, चिखलाचा " (कठीण - रसग्रहण)

23) " आरत्या म्हणती त्याची भुकेलेली पोरे पोटाचे नगारे, वाजवोनी " (कठीण - रसग्रहण)

24) "मकर कुंडले त्याला घामाच्याच धारा,थंडीला उभारा धोंगडीचा" (कठीण - रसग्रहण)

25) "झोपडीत भुकेलेली राही रखुमाई कष्ट नारी आई, अन्नावीन (कठीण - रसग्रहण)

V. खालील प्रश्नांची पाच सहा वाक्यात उत्तरे लिहा.

26) नांगरटी करण्यासाठी शेतकरी निघाला असल्याचे वर्णन कसे केले आहे ? (साधारण - आकलन)

27) झोपडीत रखुमाई आणि पोरी कशी राहिली आहेत त्याचे वर्णन करा ? (साधारण - अभिव्यक्ती)

28) संत तुकारामांचा मूळ अभंग सुंदर ते ध्यान याबद्दल लिहा ? (साधारण - आकलन)

29) सुंदर ते ध्यान या कवितेत शेतकऱ्याचे रूपक कसे वर्णन केले आहे ? (कठीण - आकलन)

30) शेतकऱ्याचे व्यक्तिचित्रण करा ? (साधारण - अभिव्यक्ती)

VI. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा.

अ) शेतकरी- एक पोशिंदा ब) विठ्ठल माझा मित्र. (कठीण - अभिव्यक्ती)

पद्य 11
माहेराची वाट

उद्दिष्टानुसार गुणविभागणी :

माहेराची वाट	स्मरण	आकलन	अभिव्यक्ती	रसग्रहण	एकूण
प्रश्न	29	13	04	03	49
गुण	31	18	08	10	67

प्रश्न प्रकारानुसार गुणविभागणी :

अ. क्र.	प्रश्नाचे स्वरूप	प्रश्न	गुण
1.	वस्तुनिष्ठ प्रश्न - गुण 1	17	17
2.	लघुत्तरी प्रश्न - गुण 1	19	19
3.	लघुत्तरी प्रश्न - गुण 2	09	18
4.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 3	03	09
5.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 4	01	04
6.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 5	-	-
एकूण		49	67

I.खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) माहेरची वाट अशी आहे. (कठीण - ज्ञान)

अ) नाजूक निळी मलमल ब) हिरवा गालिचा क) वळणाची ड)घाटमात्याची

2) वेशी वरती हे झाड आहे. (कठीण - आकलन)

अ) नारळ ब) फणस क) कडुलिंब ड) वड

3) माहेरवाशींची ओटी याने भरली. (कठीण - ज्ञान)

अ) खणनारळ ब) फळे फुले क) तांदूळ ड) गहू

4)पिसोळी सदैव या वाटेवरून जाते. (कठीण - ज्ञान)

अ) काटेरी ब) रुळलेली क) कोबडधोबड ड) रुंद

5) माहेरची वाट या कवितेचा साहित्यप्रकार (सोपे - ज्ञान)

अ) भावकविता ब) देशभक्ती कविता

क) निसर्ग कविता ड) सामाजिक कविता

6) माहेरची वाट ही कविता या संग्रहातून निवडली आहे. (सोपे - ज्ञान)

अ) शेला ब) मेंदी क) मृगजळ ड) गर्भ रेशीम

7) पंचवटी हे या समासाचे उदाहरण आहे. (साधारण -आकलन)

अ) द्विगु समास ब) कर्मधारय समास क) अव्ययीभाव समास ड) बहुव्रीही समास

8) फूल यास समानार्थी शब्द (साधारण - ज्ञान)

अ) अबोली ब) पुष्प क) गुलाब ड) कमळ

9) माता या शब्दाचा समानार्थी शब्द (साधारण -ज्ञान)

अ) जननी ब) माऊली क) आई ड) बाबा

10) माहेर याचा विरुद्धार्थी शब्द (साधारण - ज्ञान)

अ) आई बाबा ब) भाऊ क) सासर ड) सून

11) समाहारद्वंद्व समासाचे उदाहरण (साधारण - आकलन)

अ) हसतमुख ब) अनंत क) भाजी भाकरी ड) पंचवटी

12) सुगंध या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द (साधारण - ज्ञान)

अ) वास ब) दरवळ क) फूल ड) दुर्गंध

II.खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात द्या.

13) वाटेवर काय अंथरलेले आहे ? (साधारण - ज्ञान)

14)कडुलिंब काय ढाळतो आहे ? (साधारण -आकलन)

15) जिच्यासाठी माहेर आहे तीच येते असे कोणास म्हटले आहे ? (साधारण - ज्ञान)

16) तिला काय जवळ वाटते आहे ? (सोपे - ज्ञान)

17) आई लेकीला कोणता आशीर्वाद देते ? (सोपे - ज्ञान)

18) इंदिरा संत यांचे पूर्ण नाव लिहा. (सोपे - आकलन)

19) माहेराची वाट या कवितेचे मूल्य कोणते ? (सोपे - आकलन)

20) गर्भ रेशीम या काव्यसंग्रहाला कोणते पुरस्कार मिळाले आहेत ? (सोपे - ज्ञान)

21) इंदिरा संतांच्या कवितांची वैशिष्ट्ये कोणती ? (सोपे - ज्ञान)

22) माहेरची आठवण कोणास येते ? (सोपे - ज्ञान)

23) सासुरवाशीणीला कोण भेटण्यास आले आहे असे वाटते ? (सोपे - ज्ञान)

24) पिसोळीचा रंग कोणता ? (सोपे -ज्ञान)

25) पापण्यावरून कशाचा सुगंध दरवळतो ? (साधारण - ज्ञान)

26) कुंकू कशात ठेवले आहे ? (सोपे - ज्ञान)

27) आई आशीर्वादाच्या अक्षता कोठे टाकते ? (साधारण - अभिव्यक्ती)

28) डोळे उघडताच काय दिसते ? (कठीण - ज्ञान)

29) माहेराची वाट या कवितेत कोण नाहीशे होते ? (कठीण - ज्ञान)

30)इंदिरा संतांचे महाविद्यालयीन शिक्षण कोठे झाले ? (कठीण - ज्ञान)

31) ' घाल घाल पिंगा वाऱ्या ' या कवितेचे कवी कोण ? (कठीण - ज्ञान)

III. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचशी जोडणारा शब्द लिहा.

32) कडुलिंब	: वृक्ष	:: पिसोळी	:…………..	(साधारण - ज्ञान)
33) जवळ	: दूर	:: हसत	:…………..	(साधारण - ज्ञान)
34) फळेफुले	: समाहार द्वंद्व समास	:: अनंत	:…………..	(साधारण - आकलन)
35) मोहोळ ढाळतो	: वर्तमानकाळ	:: मन भरून आले	:…………..	(साधारण - ज्ञान)
36) नाजूक	: घट्ट :	:: आशीर्वाद	:…………..	(साधारण -आकलन)

IV. तीन चार वाक्यात उत्तरे लिहा.

37. तिचे डोळे डबडबून का येतात ? (साधारण - ज्ञान)

38. ती लेकीला मन भरुन कशी भेटते ? (साधारण - ज्ञान)

39. पिसोळी प्राण्याविषयी माहिती लिहा. (साधारण -आकलन)

40. इंदिरा संतांच्या कविता संग्रहांची नावे लिहा. (कठीण - अभिव्यक्ती)

41. अलंकार ओळखून लक्षणे लिहा. (साधारण -आकलन)

वेशीवरला कडुलिंब पावलावर मोहर ढाळतो.

42. अलंकार ओळखून लक्षणे लिहा. (साधारण - अभिव्यक्ती)

निळी मलमल अशी नाजुक की

43. " तिच्यावर अंथरलेली निळी मलमल अशी नाजूक की " संदर्भासह अर्थ स्पष्ट करा.

(साधारण -आकलन)

44. " मोहर ढाळतो पापण्यावरून सुगंध फिरवितो "संदर्भासहित अर्थ स्पष्ट करा. (साधारण - अभिव्यक्ती)

45. " फळा फुलांनी ओटी भरते "संदर्भासह अर्थ स्पष्ट करा. (साधारण - अभिव्यक्ती)

V. पाच सहा वाक्यात उत्तरे लिहा.

46. माहेरच्या वाटेचे वर्णन करा. (साधारण आकलन)

47. आईच्या भेटीचे वर्णन करा. (कठीण -रसग्रहण)

48. इंदिरा संत यांचा परिचय लिहा. (कठीण -रसग्रहण)

VI.आठ ते दहा वाक्य उत्तरे लिहा.

49. माहेरची वाट या कवितेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा. (कठीण - रसग्रहण)

पद्य 12

पाखरांनो तुम्ही

उद्दिष्टानुसार गुणविभागणी :

पाखरांनो तुम्ही	स्मरण	आकलन	अभिव्यक्ती	रसग्रहण	एकूण
प्रश्न	02	11	08	05	26
गुण	02	13	15	16	46

प्रश्न प्रकारानुसार गुणविभागणी :

अ. क्र.	प्रश्नाचे स्वरूप	प्रश्न	गुण
1.	वस्तुनिष्ठ प्रश्न - गुण 1	12	12
2.	लघुत्तरी प्रश्न - गुण 1	05	05
3.	लघुत्तरी प्रश्न - गुण 2	02	04
4.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 3	04	12
5.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 4	02	08
6.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 5	01	05
एकूण		26	46

I.खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) पाखरांनो तुम्ही या कवितेचे कवी ....हे आहेत. (सोपे - ज्ञान)

अ) इंदिरा संत ब) रमेश तेंडुलकर क) अण्णाभाऊ साठे ड) बहिणाबाई चौधरी.

2) पाखरानो तुम्ही ही कविता.......यातून घेतलेली आहे. (साधारण -आकलन)

अ) सत्यकथा ब) गर्भरेशीम क) चित्रवीणा ड) गुडदाणी .

3) कवीनी.......य महाविद्यालयात मराठी विभाग प्रमुख म्हणून काम पाहिले आहे. (सोपे - ज्ञान)

अ) आरपीडी ब) एलफिस्टंट क) कीर्ती ड) राजाराम.

4) पाखरानो तुम्ही या कवितेचा साहित्यप्रकार हा आहे. (साधारण -आकलन)

अ) दलित कथा ब) भावकथा क) निसर्ग कविता ड)सामाजिक कविता

5) रोज सकाळी यांचे सूर पसरतात. (कठीण - अभिव्यक्ती)

अ) गाण्याचे ब) किलबिलाटाचे क) सायरनचे ड) पाखरांचे.

6) दिलासे कसले दिले जातात. (साधारण -आकलन)

अ) विश्वासाचे ब) जीवनाचे क) ऑल क्लिअरचे ड) होल्डचे

7) न जुळणारा शब्द लिहा . (सोपे -आकलन)

अ) खग ब) अंडज क) विहंग ड) नभ

8) घड्याळावर याचे जीवन अवलंबून आहे. (कठीण - अभिव्यक्ती)

अ) पक्षांचे ब) माणसांचे क) प्राण्यांचे ड) यापैकी नाही.

II. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा योग्य संबंध लिहा.

9) न्यायान्याय : वैकल्पिक द्वद्व समास : : वनभोजन : _______. (साधारण - अभिव्यक्ती)

10) ऑल क्लिअर : सर्व ठीक : : तालीम :_____. (साधारण -आकलन)

11) जीवन संघर्ष : जीवनासाठी संघर्ष : : दररोज :_______ (कठीण - आकलन)

12) पाखरू : खग : : वृक्ष :____ (साधारण - आकलन)

IV. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

13) सायरन म्हणजे काय ? (साधारण - अभिव्यक्ती)

14) आकाश कसे आहे ? (साधारण -आकलन)

15) हवेत कशाची कंपनी आहेत ? (कठीण - आकलन)

16) कवीने कोणाला उद्देशून ही कविता लिहिली आहे ? (कठीण - अभिव्यक्ती)

17) पाखरांना कशाची सवय झाली ? (साधारण -आकलन)

V. खालील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.

18) सायरनच्या आवाजाचा पाखरावर काय परिणाम होतो ? (कठीण - रसग्रहण)

19) कवीची रोजची तालीम कशी आहे ? (कठीण - रसग्रहण)

VI. संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

20) "हवेत चढत जातात त्या सुरांची उंच उंच कंपनने " (कठीण - अभिव्यक्ती)

21) "पाखरांनो तुम्हालाही आता याची सवय झाली असेल ..." (साधारण - आकलन)

22) "युद्धमान जीवन संघर्षाची आमची ही रोजची तालीम..." (कठीण - रसग्रहण)

23) "समजतात तुम्हाला हे धोक्याची इशारे " (कठीण - अभिव्यक्ती)

VII. खालील प्रश्नांची पाच ते सहा ओळीत उत्तरे लिहा.

24) कवीने पाखरांना कोणकोणते प्रश्न विचारले आहेत ? (कठीण रसग्रहण)

25) सायरन चे सूर ऐकल्यावर माणसे कोणती प्रतिक्रिया व्यक्त करतात ? (कठीण - अभिव्यक्ती)

VIII. पुढील प्रश्नांचे आठ ते दहा ओळीत उत्तर लिहा.

26) पाखरांच्या जीवनावर कोणकोणत्या कारणामुळे समस्या निर्माण झाल्या आहेत ते लिहा.

(कठीण रसग्रहण)

पद्य 13

जग बदल घालुनी घाव

उद्दिष्टानुसार गुणविभागणी :

जग बदल घालुनी घाव	स्मरण	आकलन	अभिव्यक्ती	रसग्रहण	एकूण
प्रश्न	09	05	15	-	29
गुण	09	06	34	-	48

प्रश्न प्रकारानुसार गुणविभागणी :

अ. क्र.	प्रश्नाचे स्वरूप	प्रश्न	गुण
1.	वस्तुनिष्ठ प्रश्न - गुण 1	10	10
2.	लघुत्तरी प्रश्न - गुण 1	09	09
3.	लघुत्तरी प्रश्न - गुण 2	05	10
4.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 3	01	03
5.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 4	04	16
6.	दीर्घोत्तरी प्रश्न - गुण 5	-	-
एकूण		29	48

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) जग बदल घालुनी घाव या कवितेचे कवी कोण आहेत ? (सोपे - ज्ञान)

अ) अण्णा भाऊ साठे ब) व्यंकटेश माडगूळकर क) संत एकनाथ ड) अनंत फंदी

2) जग बदल घालुनी घाव या कवितेचे मूल्य हे आहे ? (सोपे - ज्ञान)

अ) बंधुभाव ब) मातृप्रेम क) मानवता ड) सदाचार

3)जग बदल घालुनी घाव या कवितेचा साहित्यप्रकार हा आहे. (सोपे - ज्ञान)

अ) दलित कविता ब) अखंड क) फटका ड)भावकविता

4) अन्नाभाऊ साठे यांचे जन्म गांव - - - - - - (सोपे - ज्ञान)

अ) वाटेगांव ब) तेर क) नायगांव ड) खानदेश

5) झाडावर पक्षी बसला होता. अधोरेखित शब्दांची जात ही आहे. (साधारण -आकलन)

अ) नाम ब) सर्वनाम क) शब्दयोगी अव्यय ड) यापैकी नाही

II. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा शब्द लिहा .

6) पाखरांनो तुम्ही : रमेश तेंडुलकर : : जग बदल घालुनी घाव :.... (साधारण -आकलन)

7) पाखरांनो तुम्ही : सामाजिक : : जगबदल घालुनी घाव :......... ..(साधारण -आकलन)

8) माहेराची वाट : आपुलकी : : जग बदल घालुनी घाव : ....(साधारण -आकलन)

9) तोंडपाठ : तृतीय तत्पुरुषसमास : : सदाचार :.................. (कठीण - अभिव्यक्ती)

10)पंधरा दिवसातून एकदा प्रसिद्ध होणारे: पाक्षिक : : तीन महिन्यातून एकदा प्रसिद्ध होणारे :................

(कठीण - अभिव्यक्ती)

III. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा

11) जग बदल घालुनी घाव असे कोण सांगुन गेले ? (सोपे - ज्ञान)

12) गुलामगिरीच्या चिखलात काय रुतून बसले आहे ? (सोपे - ज्ञान)

13) अखंड कोणी पिळले असे कवी म्हणतो ? (सोपे - ज्ञान)

14) मगराने काय गिळले आहे ? (सोपे - ज्ञान)

15) कवितेतील यमक जुळणारे शब्द लिहा ? (कठीण - ज्ञान)

16) वाटेगांव हे कोणत्या जिल्हय़ात आहे ? (कठीण - अभिव्यक्ती)

17) लोकनाट्य चळवळीचे प्रमुख आधार स्तंभ म्हणून कोणाल ओळखले जाते ? (कठीण - अभिव्यक्ती)

18) दलितावर कशा प्रकाराचे जिणे लादले होते ? (कठीण - अभिव्यक्ती)

19) एकजुटीने कशावर आरूढ होऊ असे कवी म्हणतो ? (कठीण - अभिव्यक्ती)

IV. खालील प्रश्नांची दोन तीन वाक्यात उत्तरे लिहा

20) दलिताना कोणी कोणी त्रास दिला ? (सोपे - आकलन)

21) दलितांनी पुढे जाण्यासाठी काय करावे ? (कठीण - अभिव्यक्ती)

22)अण्णा भाऊ साठे यांचा परिचय लिहा. (कठीण - अभिव्यक्ती)

23) डॉ भीमराव आंबेडकर दलितांना कोणता सल्ला देतात ? (कठीण - अभिव्यक्ती)

24) मगराने जणु माणिक गिळीले (अलंकार ओळखुन लक्षणे लिहा) (कठीण - अभिव्यक्ती)

V. खालील प्रश्नांची चार ते पाच वाक्यात उत्तरे लिहा

25) दलितांचे जगणे कशा प्रकारचे होते ? (साधारण - अभिव्यक्ती)

26)परंपरेच्या पकडीतून बाहेर पडण्यासाठी डॉ . भीमराव आंबेडकर दलिताना काय सांगतात ?

(कठीण - अभिव्यक्ती)

27) कलंकित जिणे टाकून दलितांनी काय करावे असे कविने सांगितले आहे ? (कठीण - अभिव्यक्ती)

28) धनवंतानी अखंड पिळले I धर्माधांनी तसेच छळले I (कठीण - अभिव्यक्ती)

मगराने जणु माणिक गिळते I चोर जाहले साव I

(संदर्भासह स्पष्टीकरण करा)

VI. खालील प्रश्नाचं उत्तर सात ते आठ वाक्यात लिहा. (कठीण - अभिव्यक्ती)

29) " जग बदल घालुनी घाव " या कवितेचा सारांश लिहा.

गद्य विभाग उत्तरे

गद्य 1. गुराख्याचे नेत्रपतन

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) क) म्हाइंभट
2) ड) म्हाइंभट
3) क) 1509
4) अ) चक्रधर स्वामी
5) ब) चक्रधर स्वामी
6) ब) दया, प्रेम
7) ड) गुराख्यावर
8) ब) चक्रधर स्वामी
9) ब) म्हाइंभट्ट
10) अ) सराळे
11) क) श्री चक्रधर स्वामी
12) अ) लीळाचरित्र एकांक
13) ब) लीना सोहनी

II. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

14) लीळाचरित्र एकांकाचे संपादन 'श्री भालचंद्र सोहनी' यांनी केले आहे.
15) गावाच्या शिवेवर असलेल्या वृक्षाखाली श्री चक्रधर स्वामी बसले होते.
16) दुसऱ्याच्या शेतात गुरे चारावयास गुराख्याने सोडली होती,
17) गुराख्याचे नेत्रपतन या पाठातून आपण एखाद्या व्यक्तीने गुन्हा केल्यास त्याला शिक्षाही मिळावी व त्यावर प्रेमही करावे असा संदेश मिळतो.
18) 'गुराख्याचे नेत्रपतन' या पाठाचा साहित्यप्रकार 'प्राचीन गद्य' हा आहे.
19) 'बिजे करणे' या वाक्प्रचाराचा अर्थ 'जाणे' असा होतो.
20) चडकणा या शब्दाचा अर्थ हाताचा प्रहार होय.
21) 'म्हाइंभट्ट' हे नगर जिल्ह्यातील सराळे गावचे रहिवासी होते.
22) श्री चक्रधर स्वामी गावाच्या सीमेवर असलेल्या वृक्षाच्या खाली बसले होते.
23) श्री चक्रधरांनी गुराख्याचा पाठलाग केला.
24) गुराखी लाच घेऊन दुसऱ्याच्या शेतात गुरे चारत होता.
25) गुराख्याला शिक्षा देण्यासाठी श्री चक्रधरांनी पाठलाग करून त्याला मार दिला.
26) लीळाचरित्र ग्रंथात श्री चक्रधर स्वामींच्या आठवणी आहेत.
27) श्री चक्रधर स्वामींनी गुराख्याच्या डोळ्याला आपल्या तोंडातील तांबुळ लावला.
28) गुराख्याच्या डोळ्याला दृष्टी श्री चक्रधर स्वामी यांच्या कृपेने मिळाली.
29) म्हाइंभट्ट यांचा मृत्यू सुमारे 1303 च्या सुमारास झाला.
30) म्हाइंभट्ट हे महानुभाव संप्रदायाचे प्रवर्तक होते.
31) 'खीरारी' म्हणजे 'गुराखी' व 'शिवारु' म्हणजे 'शेतजमीन' होय.

32) श्री चक्रधरांनी गुराख्याला मारहाण करताना डोळ्याला मार लागल्याने त्याचा डोळा निकामी झाला.

33) समर्थ रामदासांचा मठ ‘सज्जनगड’ येथे आहे ?

34) श्रीकृष्णाच्या बालक्रीडेचे वर्णन असलेले वामन पंडितांचे काव्य वनसुधा हे होय.

III. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

35) एक गुराखी चोरून आपली गुरे दुसऱ्याच्या मालकीच्या जागेत चारीत असे याबद्दल त्यास लाच मिळत असे तेव्हा गावातील दोन गटात भांडण जुंपले.

36) श्री चक्रधर स्वामी वृक्षाखाली आसनस्थ होते. तेव्हा समोरून काही लोक गुराख्याचा पाठलाग करताना त्यांना दिसले. नक्की या गुराख्याने काहीतरी चूक केलेली असावी व त्याला शिक्षा झाली पाहिजे म्हणून चक्रधर स्वामींनी त्यांच्या हाणामारीत भाग घेतला.

37) श्री चक्रधर स्वामी त्या गुराख्याचा पाठलाग करायला निघाले. त्याच्या जवळ जाऊन त्यांनी गुराख्याच्या डोळ्यावरच हाताने सपाटून मार दिला. त्यामुळे त्या गुराख्याचा डोळा कामातूनच गेला.

38) डोळा निकामी झाला. श्री चक्रधर स्वामीनी हाताचा प्रहार करून त्याचा डोळा खाली पाडला.

39) म्हाइंभट्ट हे महानुभाव पंथाचे निष्ठावंत अनुयायी व संप्रदायाचे प्रवर्तक होते. महानुभाव वाङ्मयातील आद्यग्रंथकार व चरित्रकार होते. नगर जिल्ह्यातील सराळे गावचे राहणारे होते. ते पांडित्याच्या बाबतीत अपरसूर्यच होते.त्यांनी चक्रधर स्वामींचा अनुग्रह घेतला होता. ते त्यांचे शिष्य झाले.

IV. खालील प्रश्नांची आठ ते दहा वाक्यात उत्तरे लिहा.

40) एक गुराखी काही लोकांच्याकडून लाच घेऊन जनावरे दुसऱ्यांच्या शेतात चारीत असे. हे जेंव्हा लोकांना समजले तेंव्हा काही लोक त्याला मारण्यास धावले. त्याच ठिकाणी चक्रधरस्वामी बसलेले होते. त्यांना खात्री पटली की नक्कीच या गुराख्याने काहीतरी चूक केलेली असावी. म्हणून तेही त्याला मारण्यासाठी त्याच्या पाठीमागून पळू लागले आणि चक्रधरस्वामींनी जोराने धावत जाऊन त्याला पकडले व त्याच्या डोळ्यावर सपाटून मार दिला. त्याचा डोळा कामातूनच गेला. याचे त्यांना खूप वाईट वाटले त्यांनी लगेच आपल्या तोंडातील तांबूळ काढून त्याच्या डोळ्यावर बांधून तो डोळा परत नीट करून दिला.

गद्य 2 राजे लोकीं बहुत सगुण असावे

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) ब) कर्तव्यनिष्ठा
2) अ) आज्ञापत्र
3) ड) आज्ञापत्र
4) अ) श्रीराम शंभू छत्रपती
5) ब) नीलकंठ
6) क) हुकूमतपन्हा
7) अ) खजीना
8) अ) प्र.न. जोशी
9) ब) श्रीमानयोगी
10) क) राजा

II. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

11) मराठ्यांच्या राज्याला संकटातून रामचंद्रपंत अमात्य यांनी निभावून नेले.
12) परमेश्वराने या विश्वात प्रथम राजे लोक यांना निर्माण केले.
13) राजाने ईश्वराच्या अवकृपेचे व अपकृतिचे भय बाळगावे.
14) राजाने तपस्वी शिघ्रकोपी यांचा सहवास दुरून करावा.
15) राजाने स्वशरीर संरक्षणाविषयी अतिशय सावध राहावे.
16) तऱ्हेवाईक ,शेरखोर,अमर्याद बालभाष्य ,व्यसनी, कुचाळ्या करणारा व एक धन्यापासून हरामखोरी करून आला असेल तर अशा सेवकांची नेमणूक करू नये.
17) राजाला विनोदाचे व्यसन असू नये.
18) ईश्वराच्या आज्ञेचे पालन न केल्याने ईश्वराचा क्षोभ होईल.
19) निर्वाह करणे म्हणजे पार पाडणे होय.
20) सर्वकाल ईश्वरास शरण गेले पाहिजे.
21) श्री राम शंभू 1714 मध्ये गादीवर आले.
22) सेवकांनी विशेष कार्य केल्याने बक्षीस द्यावे.
23) क्षोभ म्हणजे अवकृपा होय.
24) सर्वकाळ राजाने सावध असावे.
25) वसनागार म्हणजे कपडे ठेवण्याची जागा होय.
26) सेवक लोकांची वेतने राजाने नेमस्त करावी.
27) शिवाजी महाराजांचे अमात्य निळो सोनदेव अमात्य झाले .
28) उणी करणे म्हणजे कमी करणे होय.

III. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा.

29) संपूर्ण जनतेवर कोणाचे तरी नियंत्रण असले पाहिजे. त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी व त्यांच्याकडे लक्ष देण्यासाठी कोणाची तरी गरज असते म्हणून ईश्वराने राजाला निर्माण केले

30) जे लोक प्रामाणिक व हुशार असतात व लालची नसतात. आपल्या कामाला प्रथम स्थान देतात त्याला कशाची अपेक्षा नसावी आणि त्यामध्ये जो कोणी विश्वासू असेल अशा सेवकांची नेमणूक करावी.

31) सेवका बरोबर विनोद करताना त्या विनोदात मर्यादा राहत नाही. त्यामुळे आपणच आपली मर्यादा घालवून घेतल्याप्रमाणे होते व कमीपणा येतो म्हणून राजाला विनोदाचे व्यसन नसावे.

32) जर राजाने खजिन्याचा विचार करून जेणेकरून दिवसेंदिवस राज्यात खजिना मोठ्या प्रमाणात राहील. खजिना म्हणजे राज्याचे जीवन. वेळप्रसंगी खजिना जवळ असेल तर सर्व संकटांचा परिहार करता येतो. म्हणून खजिना समृद्ध करून ठेवावा आणि त्यावर बारीक नजर ठेवावी.

33) नाव- रामचंद्रपंत नीलकंठ अमात्य

कालखंड - 1650-1733

वडील - नीलकंठ उर्फ निळो सोनदेव अमात्य

ग्रंथ - आज्ञापत्र

किताब - हुकूमतपन्हा

34) **संदर्भ -** पाठाचे नाव - राजे लोकीं बहुत सगुण असावे, लेखक - रामचंद्रपंत नीलकंठ अमात्य

संदर्भ ग्रंथ - आज्ञापत्र

स्पष्टीकरण - जेंव्हा आपण विनोद करतो तेंव्हा त्याला कोणाचेही भान राहत नाही. विनोद करता त्यात आपली मर्यादा ओलांडू शकतात म्हणून वरील वाक्य म्हटले आहे .

35) **संदर्भ -** पाठाचे नाव - राजे लोकीं बहुत सगुण असावे, लेखक - रामचंद्रपंत नीलकंठ अमात्य

संदर्भ ग्रंथ -आज्ञापत्र

स्पष्टीकरण - जेंव्हा राजाकडे खजिना असतो तेंव्हा तो कोणत्याही गोष्टीवर विजय मिळवू शकतो वेळप्रसंगी खजिन्याचा वापर करून संकटाचा पर्याय करू शकतो म्हणून वरील वाक्य म्हटले आहे.

36) **संदर्भ -** पाठाचे नाव - राजे लोकीं बहुत सगुण असावे, लेखक -रामचंदपंत नीलकंठ अमात्य

संदर्भ ग्रंथ - आज्ञापत्र

स्पष्टीकरण - राजाने जास्तीत जास्त प्रजेला महत्त्व दिले पाहिजे ही प्रजा करण्यासाठी राज्य दिले हे राजाला समजले पाहिजे व या आज्ञेचे पालन केल्यास क्षोभ होईल कोणत्याही कार्यात राजाने अपकीर्तीचे भय बाळगावे .

IV. खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

37) ब्राह्मण, वैदिक, शास्त्रज्ञ, सत्पुरुष इत्यादी लोकांबरोबर राजाने परमनिष्ठेनं वागले पाहिजे. त्यांच्याकडून ज्ञान संपादन करून घेतली पाहिजे त्यांच्याकडून स्वतःच्या कल्याणभी वृद्धीसाठी आशीर्वाद घेतले पाहिजे त्यांच्या चरिर्थाची सोय करून घ्यावी व ब्राह्मण वैदिक शास्त्रज्ञ सतपुरुष यांना संतोष करावे.

38) जेंव्हा राजा पाकालय, जलस्थान, वसनागार ,कारखाने इत्यादी ठिकाणी सेवकांची नेमणूक करतो तेंव्हा त्यांनी प्रथम ते लोक विश्वासू असले पाहिजेत. त्यांचबरोबर ते सेवक प्रामाणिक असले पाहिजेत लालची नसावेत व कामाला महत्त्व देणारे असावेत याची काळजी घ्यावी व त्यांची परीक्षा घेऊनच राजाने सेवकांची नेमणूक करावी.

39) सर्वसामान्य जनतेची काळजी घेणारा ,शत्रूंचाही यथोचित सन्मान ठेवणारा, नियोजन, व्यवस्थापन , युद्ध कला, अर्थकारण, संरक्षण सज्जता या क्षेत्रात निपुण असणारा स्वच्छ चारित्र्याचा व महिलांचा आदर करणारा असावा. जनतेचे हित जोपासणारा ,धर्माचे आचरण करणारा राज्यात अध, पंगु ,आतुर, अनाथ, अनुत्पन्न जे असतील त्यांचा जीवनोपाय करून चालवीत जाणारा असावा.

V. खालील प्रश्नांची आठ ते दहा वाक्यात उत्तरे लिहा.

40) पूर्ण विश्वाचा निर्माता परमेश्वर असतो. ईश्वराने राजाला निर्माण केले कारण सकलसृष्टीचा रक्षक कोणीतरी असला पाहिजे तेंव्हा सृष्टीमध्ये रक्षक असत नाहीत तेव्हा धर्माचे पालन करून धर्मप्रवर्तन केले पाहिजे म्हणून ईश्वराने राजाला निर्माण केले आहे गरीब लोक स्वतःचा उदरनिर्वाह करू शकत नाहीत तेंव्हा राजाने त्यांची मदत केली पाहिजे जनतेवर नियंत्रण ठेवण्यासाठी व त्यांच्या रक्षणासाठी एक नियमावलीची गरज असते तेव्हा कोणीतरी जनतेला पालन पोषण करणार असतो त्यामुळे त्यांना दिलासा मिळतो व ते न घाबरता सांगू शकतात यासाठी ईश्वराने राजाला निर्माण केले.

41) कारण समाजातील कांहीं लोकांवर आपण डोळे झाकून विश्वास ठेवू शकत नाही. दरबारामध्ये अनेक लोक असतात जे लालची फक्त स्वतःचा विचार करणारे आहेत व दुसऱ्याची निंदा करणारे असतात. ते ढोंगी व राजाला लुबाडण्यासाठी आलेले असतात तेव्हा राजाने आपल्या सेवकांची निवड करताना विश्वासू आहेत का? लालची आहेत का? हे तपासूनच म्हणजेच त्यांची परीक्षा घेऊनच नेमणूक करावी.

गद्य 3

पोट.

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) ब) 1974
2) क) ययाती
3) अ) लघु निबंध
4) ब) जीवनवादी वृत्ती
5) अ) राजा
6) क) विसर्ग संधी
7) ड) दुप्पट खाशी
8) अ) देव आहे मानणारा
9) अ) योगी.
10) अ)आमचा.

II. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा संबंध लिहा

11) फूल
12) जल
13) कनिष्ठ
14) मस्त
15) कवड
16) विसरणे

III. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

17) विष्णू सखाराम खांडेकर आहेत .
18) परमेश्वराप्रमाणे सर्वव्यापी आहे.
19) जगातील झाडून सारे प्राणी पोटाच्या मागे लागले आहेत.
20) पोटावर काव्य केले नाही
21) संजीवनी विद्येचा उपयोग झाला नसता.
22) पोट हा शरीराचा अतिशय नाजूक भाग आहे.
23) आषाढी कार्तिकी सारख्या सुट्ट्या जागवाव्या लागल्या असत्या
24) वायुलहरी ह्या पुस्तकातून घेतलेला आहे
25) दररोज सकाळी अकरा वाजता पोटाची आठवण होते
26) वितभर पोटाची खळगी अशा शूद्र शब्दात पोटेश्वर ची संभावना केली आहे
27) एकाही कवीने पोटावर काव्य रचले नाही
28) परमेश्वरापेक्षा श्रेष्ठ आहे
29) साहित्यकार जीवनाचा भाष्यकार असतो

30) परमेश्वरा प्रमाणे सर्वव्यापी आहे असे म्हटले
31) सूर्य चंद्र असे पर्यंत असा अर्थ आहे
32) सकाळी अकरा वाजता आठवण होते
33) एक प्रकारचे भयंकर विष असा अर्थ होतो
34) कवी नी रचले नाही
35) कितीतरी चमत्कृतिजन्य कल्पना सुचतात
36) मागे लागले आहे
37) हृदय भेदक शब्द आनंदाने सोशिल
38) संजीवनी विद्येचा उपयोग झाला नसता
39) राक्षसांनी भरून गेले असते
40) परमेश्वर लहान आहे
41) अधिक घट्ट होते
42) हृदयापेक्षा मनुष्याच्या शरीराचा नाजूक भाग पोट आहे.
43) हिंदू पुराणानुसार असुरांचे (राक्षस, दैत्य, दानव) गुरु आणि पुरोहित होते.
44) पोटाचे जगावर उपकार झाले आहेत.
45) पोट नसते तर कुटुंबात दाणादाण उडाली असती.
46) पोट नसते तर.... शाळा बंद करण्याचे ठराव पास झाले असते.
47) बिझिकच्या खेळातील राजा राण्यांची लग्न लावण्यात दंग झाले असते
48) अशिलाचा गळा फासात सापडेल म्हणून
49) पोटा अभावी खानावळी, उपाहारगृहे, आचारी नामशेष झाले असते.
50) पोटोबा ने अवतार घेतल्यामुळे भयंकर आपत्तीतून जगाची मुक्तता झाली आहे.
51) मध्यान्हकाळ झाली दाखविण्यासाठी पोट नेहमी तयारराहणार.
52) जगाचा गाडा सुरळीत चालविण्याचे श्रेय पोटाला आहे.

IV. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

53) पोट नसते तर शाळा वाढविण्याऐवजी बंद करण्याचे ठराव पास झाले असते. डॉक्टरांना काम राहिले नसते. कुटुंबात दाणादाण उडून नवऱ्यांनी नोकऱ्यांना व बायकांनी नवऱ्यांना सोडचिठ्या दिल्या असत्या, कुटुंबात व समाजात अराजकता माजली असती व सर्वत्र मोठा अनर्थ म्हणजे प्रत्येक गावात कविमंडळे उत्पन्न होऊन त्यांची परस्परात युद्धे होऊन, दुष्काळात मरणाऱ्या माणसाऐवजी कवितांनी गुदमरून जाणाऱ्या माणसांचे देखावे दिसले असते.

54) लोकांनी एवढे लक्षात ठेवावे की शस्त्रक्रियेसाठी पोट फाडले तरी ते (पोट) मरत नाही. पोट जाळण्यासाठी कुणी स्वाभिमानावर निखारा ठेवला तरी त्याची (पोटाची) राख होत नाही. उजाडले हे दाखविण्यासाठी ज्याप्रमाणे सूर्य त्याचप्रमाणे माध्यान्हकाल (दुपारचे बारा वाजले असून जेवणाची वेळ झाल्याचे) दाखविण्यासाठी ते (पोट) नेहमी राहणारच !

55) **संदर्भ :-** हे विधान वि. स. खांडेकर यांच्या 'वायुलहरी' निबंधसंग्रहातील 'पोट' लघुनिबंधाच्या पाठातील आहे.

स्पष्टीकरण :- लेखकाने पोटाचे खरे स्वरूप दाखविण्यासाठी परमेश्वराचा दाखला दिला आहे. आपण त्या विश्वनिर्मात्या परमेश्वराला त्याचे स्वरूप हे विश्वव्यापून उरल्याचे म्हणतो त्याचप्रमाणे हे पोट

देखील त्या परमेश्वराइतकेच विश्वव्यापी असून ते त्या परमेश्वरापेक्षाही अधिक श्रेष्ठ असल्याचे म्हटले आहे.‘पण पोट मात्र कोणालाही सोडवता येत नाही.

V. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

56) हे विधान पोट या पाठातील आहे वि स खांडेकर यांच्या वायुलहरी' निबंधसंग्रहात हा लघुनिबंध आहे. लेखकाला एकेदिवशी शाळा चुकविण्यासाठी काहीतरी कारण हवे होते. कोणी एखादी मोठी व्यक्ती मृत पावल्यास शाळेला सुट्टी मिळते किंवा मोठा पाऊस झाला तरी सुट्टी मिळते किंवा शाळा चुकविता येते. देवदेखील लेखकाकडे पैसा ठेवून किंवा त्याच्या डोक्यावर संततधार धरण्याचे आश्वासन देऊन वळेना. पण लेखकाचे पोट मात्र त्याच्या मदतीला धावून गेल्याचे लेखक सांगतो. पोट त्याच्या मनाप्रमाणे दुखू लागल्याने त्याला गाणे सुचले. पण गोड गळा (सूर) नसल्याने तो रडत असल्यासारखे त्याच्या आईस वाटून लेखकाला त्या दिवशी मनाप्रमाणे शाळा चुकविता आहे. म्हणून मदतीला आलेल्या पोटाला उद्देशून 'पोटा थोर तुझे उपकार' म्हणून गाणे गाण्याला सुरू केले.

VI. खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

57) पोट हे परमेश्वरापेक्षा मोठे असल्याचे वेदांतानेही सिद्ध करता येईल असे लेखक म्हणतो.. प्रत्येक प्राण्याच्या शरीरात परमेश्वराचा अंश आहे तसे प्रत्येक प्राण्याला समोरच दिसणारे पोट आहे. ते पोट राव-रंक, शेठ- शेतकरी, गवई- गवंडी, कवी-कपी असा भेद करत नाही. परमेश्वराचा अंत लागत नाही तसाच प्रत्येकाच्या पोटात काय आहे याचा पत्ता तो जिच्या मुठीत आहे त्या बायकोलाही लागत नाही. परमेश्वर प्रलयकाळी वटपत्रावर झोपण्याइतका लहान पण त्याचे खरे स्वरूप विश्व व्यापून उरते तसेच पोटाचेही आहे. "पोटाची खळगी वीतभरच' अशी पोटाची क्षुद्र संभावना केली तरी ही खळगी आजपर्यंत पूर्णपणे कोणालाही भरता आलेली नाही. परमेश्वर फळ, पान, फूल किंवा भक्तीने दिलेल्या पाण्यावरही संतुष्ट होतो पण पोटाला रोज चहा, दूध, दारू व प्रसंगी विष देऊनही पुरत नाही. म्हणजे शिवशंकरालाही लाजविणारे पोट आहे. अशा अनेक उदाहरणानी पोट या परमेश्वरापेक्षा मोठे असल्याचे दाखविले आहे आणि पोटाला ते पोटेश्वर अशा शब्दाने मोठेपण देतात.

गद्य 4

कर्णाचे शल्य

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) अ) 1988
2) ब) नटसम्राट
3) ड) पांडवांचा
4) ब) कर्णाला
5) क) अग्नि संप्रदायी
6) अ) कृष्णाचा
7) ड) कर्ण
8) ब) कर्ण
9) ड) सरीसृप
10) क) राजा + ईश्वर
11) क) विसर्ग संधी
12) अ) षष्ठी तत्पुरूष
13) क) रुपक

II. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा संबंध लिहा

14) मरण
15) डाग
16) परम + ईश्वर
17) सारथ्याचा पुत्र
18) नञ तत्पुरुष समास

III. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

19) कुसुमाग्रज
20) कौंतेय
21) जांधिल
22) मातृहत्येचं पातक पत्करून सुद्धा या गदेनं तुझ्या मस्तकाचा चुराडा करून टाकावा असं वाटतय मला
23) जांधिल
24) जांधिलाने
25) जांधिलाने
26) कर्णाला
27) निष्ठा – प्रेम

IV. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

28) कौरवानी लाक्षागृहात पांडवाना जाळण्याचं कारस्थान रचले होते. त्याचप्रमाणे द्यूतांमध्ये असत्याचा आश्रय घेतला होता. भर राजमंडळात पांचालीच्या निरीला (अंगावरील वस्त्र काढण्याचे) हात घालण्याचे कारस्थान रचले होते.

29) जांधिलाच्या छातीची चाळणी सात्यकीशी लढताना सात्यकीच्या बाणानी केली. जांधिलाने सात्यकीच्या सेनेचा चुराडा करून टाकला होता. सात्यिकी कर्णाच्या अंगावर चढाई करून जात होता. तेव्हा आपल्याला ठार केल्याशिवाय सात्यकी कर्णापर्यंत पोहोंचणारच नाही असे, लढताना बाण लागून छातीची चाळणी झाली होती आणि ती सात्यकीने लढून केली होती.

30) अर्जुनाला कर्णाने तीन वेळा मागे पिटाळून लावले होते. परंतु त्याचवेळी पृथ्वीने पांडवांचा पक्ष घेऊन कर्णाच्या रथाचे चाक अर्धवट गिळले होते. (चिखलात रुतले होते) म्हणून कर्णाला ते चाक बाहेर काढण्यासाठी रथाच्या खाली उतरावे लागले. असा कर्ण विरथ झाला.

31) उपमा अलंकार _ दोन वस्तूतील साम्य जेथे शब्द चमत्कृतीपूर्ण रितीने जेथे वर्णन केलेले असते तेथे उपमा अलंकार होतो.

V. संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

32) **संदर्भ :-** वरील विधान 'कर्णाचे शल्य' या पाठातील असून याचे लेखक वि. वा. शिरवाडकर हे आहेत.
स्पष्टीकरण :- जांधिल कर्णाला जेव्हा अर्जुन तुमच्यावर चाल करून येत आहे. आतापर्यंत तुमच्यासारख्या देवमाणसाची सेवा करण्याचं भाग्य मला लाभलं. आता भाग्याचं मरण येण्यापूर्वी तुमच्या पायावर डोके टेकू दे असे म्हणतो तेव्हा कर्णाने जांधिलाला 'तुझी जागा -माझ्या हृदयाजवळ आहे, पायाशी नाही!' असे उद्गार काढले आहेत.

33) **संदर्भ :-** हे विधान कर्णाचे शल्य या पाठातील असून याचे लेखक वि. वा. शिरवाडकर हे आहेत.
स्पष्टीकरण :- एक आवाज श्रीकृष्णाचा जेव्हा कर्णाला त्याने केलेल्या अधर्मकृत्याची जाणीव देऊन अर्जुना, कसलाही विचार न करता, कर्ण तुला तुझे कृत्य अधर्माचे आहे म्हणून सांगत असला तरी या सुवर्णसंधीचा फायदा घे आणि या गर्वाढ्य सूतपुत्राचा नायनाट कर !' म्हणतो तेव्हा तो त्याला मारताना कर्णाच्या तोंडी 'आई गं - मारा, कर्णालाही अधर्मानंच मारा !' असे उद्गार आलेले आहेत, दुर्योधनाला मदत हाच धर्म असे कर्ण मानत होता.

34) **संदर्भ :-** वरील वाक्य ' कर्णाचे शल्य या पाठातील असून प्रस्तुत पाठ विष्णू वामन शिरवाडकर यांनी लिहिला आहे.
स्पष्टीकरण :- जेव्हा युद्धभूमीवर पांडवांना कर्णाचा राग येतो व अर्जुन बाणाच्या वर्षावांनी कर्णाचा वध करतो. तेव्हा कर्ण रथाजवळ कोसळतो. त्यावेळी कुंती धावत येते व कर्णाचे मस्तक आपल्या मांडीवर घेऊन वरील वाक्य म्हणते.

VI. खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

35) कौरवांनी लाक्षागृहात पांडवांना जाळण्याचे कारस्थान केले होते. द्युतामध्ये खेळताना असत्याचा आश्रय घेतला होता. भर राजमंडळात पांचालीच्या निरीत हात घातला. असे अनेक अधर्म कौरवांनी केले होते.

36) जांधिल कर्णाला शेवटी एक आग्रहाची विनंती करतो की, याठिकाणी चाक उपसून काढण्याच्या नादामध्ये राहू नका. अर्जुन पुन्हा आपल्यावर चढाई करण्याच्या तयारीने येत आहे, म्हणून आग्रहाचे सांगणे होते की, तुम्ही माघारी जा एवढे बोलून जांधिल निरोप घेतो.

37) कुरुक्षेत्रावर जेव्हा महाभारत घडत होते. तेव्हा कर्ण आपले चाक काढण्यात दंग असते. तेव्हा अर्जुन त्याच्यावर बाणांचा वर्षाव करीत असतो. त्यावेळी कर्ण मोठ्याने अर्जुनाला अधर्म करु नकोस म्हणून ओरडू लागतो. तेव्हा एक आवाज अर्जुनाला सांगतो हीच ती वेळ आहे कोणत्याही गोष्टीचा विचार करु नकोस. हा कर्ण धर्मयुद्धात अजिंक्य आहे. पृथ्वीने त्याचा रथचक्र गिळून तुला आज अखेरची संधी दिली आहे. त्याचा लाभ घे व सुतपुत्राचा नायनाट कर. असा एका आवाजाने अर्जुनास संदेश दिला.

VII. खालील प्रश्नांची आठ ते दहा वाक्यात उत्तरे लिहा.

38) कर्ण हा सूतपुत्र होता. तो कुंतीचा मुलगा व सर्वात मोठा पांडव होता. त्याचा स्वभाव चांगुलपणाचा व दयेने भरलेला होता. तो सेवकांवर मित्राप्रमाणे प्रेम करीत असे. जरी कौरव अधर्माने वागत असले तरी कर्णाने त्यांना कधीच दगा दिला नाही. सतत उपकाराची जाणीव ठेवली. पांडव हे त्याचे सख्खे भाऊ होते. पण त्यांच्यावर भावाप्रमाणे त्यांनी कधीच प्रेम केले नाही. सैनिकांना व गोरगरिबांना आपल्या हृदयात ठेवले.

39) कुंती ही शूरवीर स्त्री होती. तिच्या पोटी वीर पुरुषाचा जन्म झाला. कर्ण हा कुंतीचा सर्वात मोठा मुलगा होता व युद्धभूमीवरील एक श्रेष्ठ महावीर होता. कुंती आपल्या मुलावर जीवापाड प्रेम करत होती. तिच्या स्वभावामध्ये त्यागाचा गुण ममतेचा गुण झळकून येतो. सहसा स्त्रिया युद्धभूमीवर जात नाहीत. पण कुंती आपल्याप्रमाणे कुणाचाही विचार न करता युद्धभूमीवर गेली व आपल्या पुत्राचे म्हणजेच कर्णाचे मस्तक स्वतःच्या मांडीवर घेऊन घडलेली हकीकत सांगत होती.

गद्य 5

एनाक्षीमिया आणि वाघीण

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) अ) सोलापूर
2) ब) पक्षीतज्ञ
3) अ) झोपडीत
4) ड) गारांच्या वर्षावामुळे
5) ड) बुंधा
6) अ) रानमेवा
7) अ) अनाकर्षण
8) अ) अनोळखी
9) क) सक्रिय
10) अ) दुःखदायक

II. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा संबंध लिहा

11) संततधार
12) सुकामेवा
13) पानगळीत
14) भस्मसात

III. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

15) 'एनाक्षीमिया आणि वाघीण T ही कथा लेखकाच्या 'सुवर्ण गरुड 'या कथासंग्रहातून घेतली आहे.
16) सोलापूरच्या 79 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्रीमान मारुती चिंतनपल्ली हे होते.
17) आदिवासी लोक वाघाची देव म्हणून पूजा करत असत.
18) एनाक्षीमिया आणि वाघिणीची गोष्ट बाबा आमटे यांनी लेखक मारुती चितमपल्ली याला सांगितली.
19) मिया गरोदर स्त्रीला काम पडू नये म्हणून त्यांचे अंगण झाडून देणे .पोहऱ्याने विहिरीतील पाणी काढून देणे व रानातील रानमेवा आणून देणे अशा रितीने मदत करत होता.
20) जानू गोंड जंगलात सरपन गोळा करण्यासाठी गेला होता.
21) विजेच्या आगीचा लोड एखाद्या झाडावर पडला की ते झाड समोरच जळून राख व्हायचे त्यामुळे जानूला झाडांचा आसरा घेता येईना.
22) वाघीण हो मियांच्या कबरी 'चंद्रपूर - मूल 'रस्त्याकडे ला गावच्या सीमेवर आहेत.
23) बाबा आमटे 'नागझिरा 'अभयारण्य पाहिला आले.
24) मांडव गवताने साकारलेला होता.
25) मानवात अहोरात्र धुनी पेटत असे.
26) मिया रोज गावात भिक्षा मागण्यासाठी जात असे.

IV. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

27) मध्यरात्रीनंतर जंगलातील एक वाघीण या दोन्ही जवळ मियांच्या शेजारी येऊन बसे तो तिच्याशी तासान तास बोले ती सारे एक चित्ताने ऐके .खरे तर वाघाच्या जातीला आगीची भीती वाटते . ते आगीच्या जवळपास देखील फिरत नाही . परंतु ही वाघीन भीत नसे . हळूहळू ही गोष्ट गावकऱ्यांना माहीत झाली त्यामुळे मध्यरात्रीनंतर गावकरी मियाच्या झोपडीकडे फिरकत नसत .

28) सरपन गोळा करण्यासाठी डोंगरात गेलेला या गावचा जानू गोंड .अशा थंडीतल्या पावसात जंगलात अडकला .जिकडे तिकडे आभाळ भरून आलेले .ढगांचा गडगडात व विजांचा कडकडात याबरोबर वादळ - वारे सुटले विजेच्या आगीचा लोळ एखाद्या झाडावर पडला की ते झाड समोरच जळून राख व्हायचे .त्यामुळे त्याला झाडांचा आसरा घेता येईना . डोक्यावरचे ओझे फेकून देऊन तो पिसाट सारखा पाय वाट्याने धावत मियांच्या झोपी जवळ पोहोचला अशा रीतीने तो संकटात अडकला .

29) **संदर्भ :** वरील वाक्य एनाक्षीमिया आणि वाघीण 'या पाठातील असून या पाठाचे लेखक आहेत मारुती चिंतमपल्ली हे आहेत.

स्पष्टीकरण : मध्यरात्रीनंतर मीयाच्या झोपडीजवळ एक वाघीण येई मीयाच्या आणि वाघिणीच्या खूप गप्पा होत असत . हे जेव्हा गावकऱ्यांना समजले तेव्हा त्यांना मिळाला जंगली प्राणी वश आहेत . असे वाटू लागले

30) **संदर्भ :-** वरील वाक्य ' एनाक्षीमिया आणि वाघीण 'या पाठातील असून या पाठाचे लेखक मारुती चिंतामणी आहेत

स्पष्टीकरण : - सरपण गोळा करण्यासाठी गेलेला जानू अचानक आलेल्या पावसामुळे तो जंगलात अडकतो . तो अपरात्री अचानक मीयाच्या झोपडीत जातो त्याचवेळी वाघीण यायची वेळ होते वाघिणीने जानुला ओळखताच ती हल्ला करेल म्हणून मी याने त्याला कपडे काढायला लावून धुनीतील राग त्याच्या सर्वांगाला फासली व स्वतःची कफनी त्याला दिली यातून मियाची युक्ती स्पष्ट होते .

31) **संदर्भ :-** वरील वाक्य ' एनाक्षीमिया आणि वाघीण 'या पाठातील असून या पाठाचे लेखक मारुती चित्तमपल्ली हे आहेत

स्पष्टीकरण : - मिया जाणू गोंडचे प्राण वाचवण्यासाठी त्याला झोपडीत बसवून त्याचे कपडे आपण परिधान करून तो वाघाला सामोरे गेल्याने मीया गतप्राण होतो . पण चूक लक्षात येतात पश्चाताप झाल्याने स्वतःही वाघीण प्राण सोडते . हे जानू गोंडला समजताच त्याने म्हटलेल्या वरील वाक्यातून त्यागीपणाचे दर्शन घडते.

V. खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

32) मियाला एक युक्ती सुचली त्याने जानूला कपडे काढायला सांगितले त्याच्या सर्वांगाला धुनीतली राग लावली अशामुळे शरीराचा गंध प्राण्यांना येत नाही. स्वतःची कपणी त्याच्या अंगात . जानूचे ओले कपडे धुणीवर सुकवून मियाणे स्वतः घातले रस्त्याने येणाऱ्या वाघिणीला सामोरे जावे म्हणून मी या जगातून चालू लागला .अशाप्रकारे जानूला वाचण्यासाठी मियाने युक्ती केली .

33) मियानेआपली कफन त्याला घालायला दिली व त्याचे कपडे आपण घातले . रस्त्याने येणाऱ्या वाघीणीला सामोरे जावे म्हणून मीया जंगलातून चालू लागला . तिची सावट एकाग्रतेने ऐकू लागला .अपेक्षेप्रमाणे तिची वाटेत भेट झाली . परंतु दुरूनच तिने गुरगुरून आपला राग व्यक्त केला ' हे पाहून मियाला आश्चर्य वाटले . तिने त्याला ओळखले नाही आणि त्याच्यावर कडाडून हल्ला केला . त्यात मीयाचा मृत्यू झाला.

VI. खालील प्रश्नांची आठ ते दहा वाक्यात उत्तरे लिहा.

34) मनुष्य आणि प्राणी यांच्यातील मैत्रीचे दर्शन एनाक्षीमिया आणि वाघीण ' या कथेत मारुती चिंतमपल्ली यांनी केले आहे .एनाक्षीमिया हा घनदाट जंगलातील झोपडीत राहत असे .त्याच्या सोबतीला रात्री वाघिण यायची त्यामुळे झोपडीकडे मध्यरात्रीनंतर कोणी फिरकत नसे . पण एके दिवशी सरपन गोळा करण्यासाठी जानू गोंड जंगलात जातो व विजांच्या कडकडात ' वादळ ' वाऱ्यात सुटलेल्या पावसात ' तो अडकतो वीज झाडावरती पडून झाडे जळून खाक होत होती . त्यामुळे झाडांचा आसरा त्याला घेता येत . या अडचणीतून वाट काढत मीयाच्या झोपडी जवळ यायला त्याला मध्यरात्र होते . अशा प्रकारे विजांच्या पावसात जीव वाचवण्यासाठी 'आश्रय घेण्यासाठी जानू गोंड मीयाकडे जातो .

35) 35) मारुती चिंतामपल्ली यांनी 'एनाक्षीमिया आणि वाघीण ' या वन्यजीवन कथेत मिया आणि वाघीण यांच्या मैत्रीचे दर्शन घडविले आहे . घनदाट जंगलामध्ये एनाक्षीमयाची झोपडी होती . त्या झोपडी मध्ये मध्यरात्रीनंतर वाघीण येऊन बसायची त्या प्राण्याला मीयाचा लळा लागला असून दोघांच्यात जिव्हाळा होता . मीयाचे बोलले वाघीण लक्षपूर्वक ऐकायची 'मध्येच आपुलकीने त्याच्या पायावरून मान घासायची वाघिणीला मीयाविषयी प्रेम आणि आकर्षण वाटायचे . त्यामुळेच ती आगीला सुद्धा घाबरत नसायची .पण एके दिवशी मियाणे वेगळे कपडे परिधान केल्याने जंगलात दुरूनच मियाला न ओळखल्यामुळे वाघीण मी यावर हल्ला करते .त्यामध्ये मीयाचा गतप्राण होतो .पण थोड्या वेळाने आपली चूक लक्षात येऊन वाघिणीला पश्चा - ताप होतो . आपण आपल्या मित्राला मारल्यानेआक्रोश करत डरकाळी फोडून जमिनीवर पडून शेपटी आपटत प्राण सोडते .अशा प्रकारे मीया आणि वाघीण यांचे आपुलकीचे 'स्नेहाचे 'जिवलग मैत्रीचे व दिव्य प्रेमाचे संबंध होते.

VII. वाक् प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा .

36)

1. मोर्चा वळविणे :- इच्छित स्थळी जाणे, घटना स्थळी पोहोचणे.
   वाक्यात उपयोग :- जंगली प्राण्याना पांगविण्यासाठी लोकानी जंगलाकडे 'मोर्चा वळविला'.
2. सामोरे जाणे :- सामना करणे, तोंड देणे .
   वाक्यात उपयोग :- सामोरे गेल्याशिवाय आपल्याला यश मिळत नाही .
3. गर्भगळीत होणे :- खूप घाबरणे .
   वाक्यात उपयोग :- भला मोठा साप पाहून आम्ही गर्भगळीत झालो .
4. कोंबडा आरवणे :- पहाट होणे .
   वाक्यात उपयोग :- खेड्यातील पहाट ही 'कोंबडा आरवल्यानेच होते .

गद्य 6

ओळख

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) अ) शांता शेळके
2) क) बालमनाची निरागसता
3) ड) पावसा आधीचा पाऊस
4) अ) मुंबई
5) क) मराठी
6) अ) कथासंग्रह
7) ब) लॉन
8) क) प्लास्टिकचा
9) क) डॉक्टर
10) अ) हुंदके देणे
11) अ) दूर करणे
12) अ) रवी
13) ड) पाच-सहा

II. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

14) यजमानांचे घर सुरेख होते.
15) मंडळी मराठी भाषा बोलत होती.
16) लॉनवर छोटीचा चिमुकला स्विमिंग पूल होता.
17) आईने प्लास्टिकची दोन बदके छोटीच्या हातात दिली.
18) यजमानांना शास्त्रोक्त संगीताचा व्यासंग होता.
19) लेखिकेचे पूर्ण नाव शांता जनार्दन शेळके हे होते.
20) यजमान यांची छोटी जेमतेम पाच सहा वर्षाची होती.
21) छोटी आत धावत जाऊन पत्त्यांचा छोटा जोड घेऊन आली.
22) छोटी पुन्हा पुन्हा एवढा वारा येतो कसा ? इतका पाऊस पडतो कसा? असे प्रश्न विचारत होती.
23) छोटी दारापाशी उभी होती.
24) छोटीची दुःखाशी तोंड ओळख झाली.
25) वादळानंतर छोटीने क्षणापूर्वीचे स्थिर जीवन एका घटकेत कसे अस्थिर होते ते तिने अनुभवले आहे.

III. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

26) यजमानांचे घर सुरेख होते पुढल्या बाजूला चिमुकली बाग मागे खूप दूरवर पसरलेले हिरवेगार मोकळे लॉन त्यापलीकडून एक हायवे जात होता कितीही दूरवर नजर टाकली तरी वाटेत कसलाही अडथळा म्हणून येत नव्हता सरळ पाहिले तर नजर थेट निळ्या भोर क्षितिजाला जाऊन भिडे.
27) आलेल्या पाहुणे मंडळीत तिच्या बरोबरीचे एकही छोटे मुल नव्हते त्यामुळे ती मोठी माणसांचे गप्पा रंगलेले असताना मध्ये जाऊन ती अधिकच लडिवाळपणे साऱ्यांची लगट करी पण मध्येच कधीतरी तिला परकेपणा जाणवे कधी तिचा पुढे आलेला हात सहज बाजूला सारला जाई कधी आईचे तोंड आपल्याकडे वळून ती तिला काहीतरी सांगू लागे तेव्हा आई बिनचूकपणे काही वेगळेच उत्तर तिला देई

एखादा अंकल तिचे पिंगे केस मागे सारी, एखादी आंटी तिच्या गालाचा मुका घेई तेव्हा त्या क्रियांत मनःपूर्वक्ता नाही काहीसा यांत्रिकपणा आहे असे तिला जाणवे तेवढ्यापुरती ती हिरमुसली होई आणि काही वेळ बाजूला जाऊन बसे.

28) यजमान व्यवसायाने डॉक्टर पण त्यांचा शास्त्रोक्त संगीताचा व्यासंग होता ते स्वतः चांगले गात आणि मैफिली करीत होते आता पाहुण्यांच्या करमणूकीसाठी त्यांनी आपल्या एका मैफिलीची टेप लावली होती माणसे खात होती गप्पा मारीत होती गाणे ऐकत होती गाण्यातल्या नेमक्या जागांना दर्दीपणे दात देत होती.

29) अचानकपणे विजांचा कडकडाट व जोराचा पाऊस आल्यामुळे छोटीच्या आयुष्यात अगदी प्रथमच जीवनाची अनिश्चितता तिला कळली होती संकटाचे जे अनपेक्षित दर्शन तिला झाले होते त्यामुळे ती मुळापासून हादरून गेली होती

30) यजमान व्यवसायने डॉक्टर होते पण त्यांचा शास्त्रोक्त संगीताचा व्यासंग उत्तम होता ते स्वतः चांगले गात आणि मैफिल करी आता पाहुण्यांच्या करमणुकीसाठी त्यांनी आपल्या एका मैफीलीचे टेप लावली होती माणसे खात होती आणि गप्पा मारत होती तसे गाणीही ऐकत होती.

31) डॉक्टरांनी पाहुण्यांच्या करमणुकीसाठी आपल्या गाण्यांची टेप मैफिलीत लावली होती माणसे खात होती गप्पा मारत होती गाणे ऐकत होती गाण्यातल्या नेमक्या जागांना दर्दीपणे दाद देत होती वाहवा! 'क्या बात है' मार्व्हलस असे उदगार उमटत होते.

IV. संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

32) संदर्भ-वरील वाक्य ओळख या पाठातील असून या पाठाचे लेखिका शांता शेळके ह्या आहेत.
स्पष्टीकरण:-जेव्हा यजमानांच्या घरी सर्व पाहुणे जेवणासाठी जातात तेव्हा त्यांच्या करमणुकीसाठी यजमान आपल्या मैफिलीची टेप लावतात माणसे गाणे ऐकत त्या गाण्याचा नेमक्या जागांना दर्दीपणे दाद देत वरील वाक्य उद् गारतात.

33) **संदर्भ** -वरील वाक्य ओळख या पाठातील असून या पाठाचे लेखिका शांता शेळके हे आहेत.
स्पष्टीकरण :- जेव्हा यजमानांच्या घरी पाहुणे जेवत असतात तेव्हा बाहेर विजेचा कडकडाट होऊन वादळीवाऱ्याचं झोत वेगाने आत शिरतो त्याचवेळी छोटी दाराजवळ उभी असते तिला वाटते की तिचा स्विमिंग पूल वाऱ्याने उडून गेला म्हणून ती वरील वाक्य उदगारते.

34) **संदर्भ -** वरील वाक्य ओळख या पाठातील असून या पाठाचे लेखिका शांता शेळके हे आहेत.
स्पष्टीकरण :- अचानक वादळ सुरू झाल्याने माणसे दचकली होती त्यात छोटीचे किंचाळणेही सुरू झाले होते वादळाने थैमान घातले होते वारे वेड लागल्यासारखे घुमत होते आणि त्या साऱ्या कल्लोळावर छोटीचा सूर उंच चढला होता आणि विलक्षण किंचाळत होती हात पाय झाडत होती सगळी माणसे धावत तिच्यापाशी आली तेंव्हा वरील वाक्य उच्चारले.

V. खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

35) सारी संध्याकाळी छोटीची उपेक्षा करणारी माणसे तिला वेढून उभी होती तिच्यावर प्रेमाचा मायेचा वात्सल्याचा वर्षाव करीत होती कोणी तिला कुरवाळीत होते तर कोणी तिचे मुके घेत होते तर कोणी तिची समजूत घालत होते अशा प्रकारे सगळेजण छोटीचे लाड करत होते.

36) यजमानांनी आपल्या घरातील टेबलावर विविध प्रकारचे खाद्यपदार्थ मांडले होते पक्वानांचा रुचकर दरवळ सुटला होता हातात नॅपकिन्स घेऊन मंडळी टेबलाभोवती गोळा होऊन आपल्याला हवे ते पदार्थ

बश्यातून घेऊ लागली मग दिवाणखान्यात सोईस्कर जागा बघून कुणी कोचावर असणं ठोकले तर कुणी जमिनीवरच बैठक मारली यजमान व यजमानींन साऱ्यांकडे जातीने लक्ष देत होती काय हवे नको ते विचारीत होती प्रत्येकाच्या आवडीनुसार त्याला ते ते खाद्यपदार्थ आवर्जून देत होती अशी जेवणाची सोय केली होती.

37) जेव्हा वादळ ओसरले असेल तेव्हा छोटीला त्याचा विसरही पडला असेल पण जन्मभर तो तिचा पाठ पुरावा करील छोटी एका रात्रीत खूपच वाढलेली असेल शहाणी झालेली असेल आणि अपयशांना ती सामोरे जाईल निराशा अपमान अपेक्षाभंग ती पचवील यापुढे येणाऱ्या संकटांना छोटी अधिक धीराने तोंड देईल असे आईला वाटते.

38) परदेशात व्यवसाय निमित्त स्थायीक झालेल्या मराठी मंडळींचे विरंगुळ्याचे दिवस म्हणजे शनिवार , रविवार अशाच एक वीकेंडला शनिवारी संध्याकाळी पाच सहा मराठी कुटुंबे आपल्या एका मित्राकडे जेवणासाठी आली होती जेवण हे निमित्त एकत्र जमून काही गप्पा गोष्टीत मनोविनोदात घालविणे हा मुख्य हेतू होता परक्या देशात आपले पण शोधण्याचा जपण्याचा एक प्रयत्न त्यांचा होता

VI. खालील प्रश्नांची आठ ते दहा वाक्यात उत्तरे लिहा.

39) यजमानांची काही मित्रमंडळी एका वीकेंडला त्यांच्या घरी जमली होती थंड वारा सुटला होता मंडळी लॉनवर खुर्च्या टाकून बसली होती पुढ्यात पेये होती काही खाद्यपदार्थ होते पण गप्पांना रंग चढला होता सारीच माणसे प्रतिष्ठित सुसंस्कृत व बुद्धिमान होती पुरुषाप्रमाणे स्त्रिया ही नोकरी करणाऱ्या होत्या परदेशी पाणी साऱ्यांच्या चेहऱ्यावर चमकत होते पण मूळचे मराठी पण त्यातुन लपत नव्हते इथे मंडळी मराठीतूनच बोलत होती हसत होती सर्वांचीच अनेक वर्षांची ओळख असल्यामुळे त्यांच्या वागण्या बोलण्यात अकृत्रिम मोकळेपणा होता एकमेकांना एकेरी नावाने संबोधले जात होते घरगुती चौकशी चालल्या होत्या हास्य विनोदाचे रंगीत गुच्छ फुलत होते अशा प्रकारे यजमानांच्या घरी एक सहज सुंदर वातावरण तयार झाले होते

40) यजमानांच्या घरी मैफिल रंगली होती जेवणे आटोपली होती इतक्यात बाहेर विजेचा प्रचंड कडकडाट झाला आणि वादळी वाऱ्याचा झोत वेगाने आत शिरला दारे खिडक्या धाड धाड उघडून वारे आत आले त्यावेळी छोटी दारापाशी उभी होती तिने एकदम किंचाळी फोडली आणि ती मोठमोठ्याने रडू लागली अचानक सुरू झालेल्या वादळाने माणसे दचकली होती त्यात छोटीचे किंचाळणे सुरू झाले नेमके काय घडले आहे कुणालाच काही कळेना मध्यंतरी कसलाच अडथळा नसलेले वादळ क्षितिजापासून विना अट घरात घुसले होते

41) वाक्यप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा

1) लगट करणे - जवळ करणे

वाक्यात उपयोग :- माझी आई मला लगट करते.

2) कटवले जाणे - दूर करणे

वाक्यात उपयोग :- दहावी झाल्यावर मला माझ्या मैत्रिणींनी कटवले .

3) आसन ठोकणे - बसून राहणे

वाक्यात उपयोग :- चक्रधर स्वामी दोन गावच्या सीमेवरती आसन ठोकले होते,

4) छातीशी घट धरणे - प्रेमाने जवळ करणे

वाक्यात उपयोग :- श्यामच्या आईने श्यामला छातीशी घट्ट धरले.

42) समानार्थी शब्द

सूर्य - रवी, वारा - पवन, पाऊस - वर्षा, आई - जननी , चिंता - काळजी , रात्र - निशा.

गद्य 7

गद्य: संत पुरंदरदास

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) ब) डॉ.प्र.न.जोशी
2) क) काय भुललासी वरलिया रंगा
3) ब) 400
4) ड) सराफी
5) क) संत पुरंदरदास
6) अ) तिजोरीत
7) ड) मंत्रोपदेश
8) क) डॉ.प्र.न.जोशी

II. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा संबंध लिहा

9) 1564
10) 2004
11) लक्ष्मीअक्का
12) क्रोध अनावर होणे.
13) व्यंजन संधी
14) पाहुणचार करणे
15) इतरेतर द्वंद्व समास
16) स्वार्थी
17) राग

III. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

18) पुरंदरगडावर
19) श्रीनिवास
20) सरस्वती
21) उदारता, दया, क्षमा, २२.सहानुभूती इ. गुण शोभून दिसतात.
22) आज काही बोलू नकोस उद्या ये परत.'
23) पाच-सहा महिने
24) मुलीचे लग्न
25) वडिलांनी
26) सोन्याची नथ
27) गरिबांना, कंगालाना, गरजूंना २९.संपत्ती दान केली .
28) पंढरपुरास
29) कृष्णदेव
30) श्री व्यासराय
31) श्री व्यासराय

32) पुरंदर विठ्ठल

33) द्रौपदीवस्त्रहरण ,सुदामचरित्र, परतत्वसार इत्यादी

34) तुंगभद्रा, कावेरी नद्यावर

35) हंपी क्षेत्रास चक्रतीर्थ जवळ

36) विठ्ठलाची

IV. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

37) गरीब ब्राह्मणाने सरस्वतीकडे मदतीची विनवणी करताच तिने आपली नथ ब्राह्मणाला दिली .त्या ब्राह्मणांनी पुन्हा शिवप्पाकडे जाऊन त्याबद्दल मोहरा मागितल्यावर पत्नीची नथ ओळखून तो रागाने पत्नीला बोलतो. तेव्हा पत्नी नथ घरात आहे असे काहितरी सांगते.म्हणून आपण खोटे बोलण्याचा अपराध केला असून त्याचे प्रायश्चित्त म्हणून सरस्वती विष पिणार होती.

38) परिचय पूर्ण नाव- डॉ. प्रल्हाद नरहर जोशी .

जन्म 1924, निधन 2004

विसाव्या शतकातील प्रसिद्ध साहित्यिक

यांनी पुणे विद्यापीठाची पीएच.डी. संपादन केली व तेथेच काही काळ अध्यापन व लेखन केले.

साहित्य संपदा अ .विज्ञान विषयावर:१. अनुयुगाचे निर्माते २.असे शोध असे शोध३. नव विज्ञान कथा

ब. संत साहित्यावर : १.भारतीय संत भाग एक २. भारतीय संत भाग दोन

क. कादंबऱ्या : १.असे धर्मवीर २.आंधळी गवळण ३. काय भुललासी वरलिया रंगा

ड.वैचारिक :१.मराठी वाङमयाचा विवेचक इतिहास -प्राचीन २.मराठी वाङमयाचा विवेचक इतिहास -अर्वाचीन ३.आदर्श मराठी शब्दकोश, पुरस्कार :महाराष्ट्र शासनाकडून आठ वेळा पुरस्कार.

39) शिवप्पाच्या दुकानांमध्ये एक गरीब ब्राम्हण मुलीच्या लग्नासाठी मदत मागत होता. त्यावेळेला शिवप्पाने 'आज काही बोलू नकोस उद्या ये परत' असे गरीब ब्राह्मणास सांगितले . गरीब ब्राह्मण पुन्हा उद्या येऊन मदत मागू लागला पण शिवप्पाचे उद्या ये संपेना व ब्राह्मण हेलपाटे घालण्याचे थांबविना .सतत पाच ते सहा महिने सारखे असेच सांगून त्या ब्राह्मणास खूप त्रास दिला व शेवटी एक पैसा फेकून घेऊन जा असे सांगितले .अशा पद्धतीने गरीब ब्राह्मणास शिवप्पाने पाच-सहा महिने त्रास देऊन शेवटी नाराज केले.

40) **संदर्भ : -** वरील उद्गार डॉ.प्र.न.जोशी यांच्या आपले संत या पुस्तकातील असून संत पुरंदरदास या चरित्र पाठातील आहे.

स्पष्टीकरण :- आपल्या नवऱ्याच्या संतापाला घाबरलेली सरस्वती चुकीचे प्रायश्चित म्हणून विषाचा पेला तयार करते व तो प्राशन करताना परमेश्वराला उद्देशून म्हटलेल्या वरील वाक्यातून तिची देवावर असणारी भक्ती दिसून येते.

V. खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

41) शिवप्पाचे वडील दिवंगत झाल्यावर शिवप्पाच्या हातात सर्व कारभार आला .त्यावेळी शिवप्पाने आपल्या बुद्धीच्या जोरावर वडिलांचा व्यवसाय अल्पावधीतच वाढवला .कष्टाने चांगला जम बसविला .संपत्तीची रास उभी केली .बुद्धीच्या जोरावर विजयनगर ,गोवळकोंडा, गुलबर्गा आधी राज्यात हिरे ,मोती, माणके इत्यादी रत्नांचे उत्तम पारखी म्हणून त्यांचा लौकिक वाढला .विद्या ,संगीतादी कलांमध्ये सुद्धा शिवपाने प्राविण्य संपादन केले .त्यांना पत्नी सुद्धा सत्वशील, सुशील व धार्मिक प्रवृत्तीची पतीपरायण अशी सरस्वती लाभली. या दोघांचा प्रपंच उत्कर्षाने व ऐश्वर्याने चालला होता त्यामुळेच सर्व लोक त्यांना नवकोट नारायण म्हणून ओळखू लागले.

42) गरीब ब्राह्मण साध्वी सरस्वतीकडे जाऊन म्हणतो की, मी एक दरिद्री ब्राह्मण असून घरी फार गरिबी आहे मुलीचे लग्न करण्यासाठी घरी काहीच नाही. थोडी कृपा करा .मदत द्या आणि कन्यादानाची पुण्य घ्या. अशी विनंती गरीब ब्राह्मण सरस्वतीकडे करतो.तेव्हा सरस्वती तुम्ही आमच्या दुकानात जाऊन सर्व सांगा कदाचित तुम्हाला ते मदत करतील असे सांगते . पण ब्राह्मणाने घडलेली सर्व हकीकत सांगताच सरस्वती अधिकच प्रश्नात पडते आणि विवंचनेत असताना तिच्या ध्यानात येते की आपल्या नाकातील नथ वडिलांनी दिलेली आहे. त्यावेळी ब्राह्मणाची दया येऊन क्षणाचाही विलंब न लावता भारी किमतीची सोन्याची नथ नाकातून काढून ती ब्राह्मणाला देते. अशा पद्धतीने सरस्वती गरीब ब्राह्मणांची मदत करते.

43) शिवप्पाच्या दुकानाकडे जेव्हा गरीब ब्राह्मण मदतीसाठी येतो त्याला शिवपाने पाच-सहा महिने हेलपाटे घालायला सांगून सुद्धा शेवटी रिकामी माघारी पाठवले . पण ब्राह्मण घरी गेल्यावर पत्नीने त्याला लगेच सोन्याची नथ दिली. ती नथ जेव्हा शिवप्पाने ओळखली आणि तिजोरीतील अदृश्य नथ त्याला दिसली. एवढ्या सीलबंद केलेल्या पिशवीत नथ नव्हती इतक्या बंदोबस्तात ठेवलेली नथ घरी कशी गेली या प्रसंगाने श्रीनिवास शेटजीच्या बुद्धीस जोराचा धक्का बसला .

VI. खालील प्रश्नांची आठ ते दहा वाक्यात उत्तरे लिहा.

44) संत पुरंदरदासांच्या व्यक्तिमत्व व त्यांच्या विचारांचे आणि भक्तिमार्गाचे वर्णन प्र.न जोशी यांनी संत पुरंदरदास या चरित्र पाठात खालील प्रमाणे केले आहे. कर्नाटकी संगीत कीर्तन पद्धतीचे प्रवर्तक म्हणून पुरंदर दासांचा लौकिक वाढीस लागला. गुरु व्यासरायाकडून मंत्रोपदेश घेतल्यानंतर पुरंदर विठ्ठल असे नामकरण त्यांनी केले. विठ्ठलाचे संगीत कीर्तन पुरंदर दासांनीच करावे अशी ख्याती सर्वत्र पसरली . त्यांच्या पत्नीने दारिद्र्याचे व्रत तंतोतंत पाळले. कर्नाटकी संगीताचे उद्धारक म्हणून दासांची कीर्ती वाढली. कन्नड भाषेचे वैभव पुरंदर दासामुळे वाढीस लागले .द्रौपदी वस्त्रहरण ,सुदामचरित्र ,परतत्व सार यासारखे ग्रंथ त्यांनी लिहिले.अशाप्रकारे व्यासरायाकडून मंत्रोपदेश घेऊन विठ्ठलाची भक्ती करून कन्नड भाषेचे वैभव वाढीस लावले व भक्तिमार्गातील कार्य चांगल्या तऱ्हेने मार्गी लावले.

45) पंढरपूरच्या विठ्ठल भेटीच्या आनंदाचे वर्णन प्र.न.जोशी यांनी संत पुरंदरदास या चरित्र पाठात खालील प्रमाणे केले आहे.पुरंदरदास पंढरपुरात येऊन विठ्ठलाचे दर्शन घेतल्यावर त्यांचे मन तल्लीन झाले. जेव्हा विठ्ठल भेटला , त्यांची जवळीक लाभली त्यावेळी अनुभव सांगताना ते म्हणतात,' हा पहा देवा आला. साक्षात परमेश्वर आला. माझा स्वामी आला. देवाधिदेव शिखामणी आला. शेषावर शयन करणारा, गरुडावर बसणारा, अर्जुनाला वश असणारा, नंदालाही गोचर न होणारा, नारायण, श्रीकृष्ण ,हसतमुख असा हा विठ्ठल भेटीसाठी आला आहे . अशाप्रकारे पुरंदरदासानी माझा देव, माझा स्वामी, शिखामणी, गरुडारुड, साक्षात नारायण अशा अनेक उपमा देऊन विठ्ठलाच्या भेटीचा आनंद व्यक्त केला आहे.

गद्य 8
बाबाखान दरवेशी

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) ब) अंबेजोगाई
2) ब) बाबाखानच्या
3) क) अस्वल
4) अ) दरवेशी
5) क) येण्या-जाण्याच्या रस्त्यात
6) अ) शेरभर भरडलेल्या कण्या
7) अ) ते त्याचे उदरनिर्वाहाचे साधन होते.
8) ब) दळण दळण्यासाठी.

II. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा संबंध लिहा

9) अस्वलाचा खेळ दाखवणारा
10) कौशल्य
11) मरण पावणे
12) माणदेशी माणसं

III. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

13) दरवेशाच्या घरातून गोंधळ ऐकू येत होता म्हणून.
14) बाबाखान दरवेशी
15) अस्वलाच्या खेळातून मिळणाऱ्या उत्पन्नावर बाबाखानच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत असे.
16) बाबाखान खूप तापट स्वभावाचा असल्यामुळे.
17) गावच्या पाटलांनी.
18) सात - तीन मुली व चार मुलगे.
19) तानाजीच्या पोवाड्यापासून परब्रम्ह, माया, प्रकृतीपर्यंतच्या सर्वगाण्यांचा साठा
20) बाबाखान दरवेशी
21) भडक हिरव्या रंगाचा कोसला पटका ,अंगात रंगीत कापडाची मुंडेछाट पैरण, तिला चांदीची बटणं, खाली भारी किमतीचं धोतर, पायात गोंड्या चं पायताण.
22) 'माणदेशी माणसं' या पुस्तकातून

IV. संदर्भासहित स्पष्टीकरण करा..

23) **संदर्भ -** वरील वाक्य 'बाबाखान दरवेशी' या पाठातील असून याचे लेखक 'व्यंकटेश माडगूळकर' हे आहेत.

स्पष्टीकरण - मध्यान्हरात्र टळून गेल्यावर एकाएकी बाबाखानच्या राहत्या छपरापुढे गोंधळ ऐकू आला. तेव्हा तेथे पाच-पंचवीस माणसं गोळा झाली. ती सर्व गडबड कोणाला काहीच कळेना तेव्हा उमाजी नाईकाने बाबा खानच्या घराचे कवाड ठोठावले व वरील वाक्य म्हटले.

24) **संदर्भ -** वरील वाक्य बाबाखा न दरवेशी' या पाठातील असून याचे लेखक 'व्यंकटेश माडगूळकर' हे आहेत.

स्पष्टीकरण - मध्यान्ह रात्री बाबाखानच्या राहत्या छपरापुढे गोंधळ ऐकू आला- आजूबाजूवी माणसं तेथे गोळा झाली. जेव्हा बाबाखानच्या मुलीने दरवाजा उघडला आणि सांगितले की बाबाने आपल्या आईला मारलं.तेव्हा तेथे उपस्थित सर्वांना प्रश्न पडला की हे नवरा-बायकोचं भांडण आहे त्यात कोण काय बोलणार?

25) **संदर्भ -** वरील वाक्य 'बाबा खान दरवेशी' या पाठातील असून हा पाठ' व्यंकटेश माडगूळकर' यांनी लिहिला आहे.

स्पष्टीकरण - एके दिवशी बाबाखानचं वर्षा-दीड वर्षाच पोरं अस्वलानं पुढच्या दोन पंजात धरलं होत आणि ते त्याला घुसळत होतं. तेव्हा तेथे 'माणसं जमा झाली. तेवढ्यात दळायला गेलेल्या बाबाखानच्या बायकोनं सपाट्यानं पुढे होऊन आपलं पोरगं अस्वलाच्या पंजातून ओढून घेतले तेव्हा तिला उद्देशून हे वाक्य तेथील माणसांनी म्हटले आहे.

26) **संदर्भ -** हे वाक्य 'बाबाखान दरवेशी' या पाठातील असून हा पाठ 'व्यंकटेश माडगूळकर' यांनी लिहिला आहे.

स्पष्टीकरण - आदल्या दिवशीच्या घडलेल्या प्रकारानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी लेखक दोन कोंबड्यांची एकमेकांशी चाललेली झुंज पाहत होते. तेव्हा बाबाखान तेथे आला. त्यावेळेला लेखक बाबाखानला तापट' असे म्हणतात. तेव्हा बाबाखान हे वाक्य म्हणतो.

V. खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

27) बाबाखान दरवेशी हिरवट टाळक्याचा माणूस होता, पण सामान्यतः इतरांशी त्याची वागणूक तशी काही वावगी नव्हती, लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांचा आदर करणारा, सर्वांशी मोठ्या अदबीन वागे बाबाखानपाशी बोलण्याबरोबर उत्तम ' भेदिक' गाण्याचे कसब होते. तानाजीच्या पोवाड्यापासून तो परब्रम्ह, माया, प्रकृतीपर्यंतच्या सर्व गाण्यांचा साठा होता. त्याच्या या कसबांमुळं आसपासच्या पाच-पंचवीस खेड्यांत तो सर्वांना परिचित होता.

28) अस्वलाचा खेळ दाखवणाऱ्या माणसाला दरवेशी' म्हणतात, सुगीच्या हंगामात हा खेळ हे लोक गावोगावी जाऊन दाखवतात व लोकांचे मनोरंजन करतात.अस्वलांना नाचवून, विविध कसरती दाखवून लोकांचे मनोरंजन करतात. बाबाखान हा सुध्दा अस्वल घेऊन वाड्यांवर, वस्त्यांवर फिरत असे मनगटातील लोखंडाची घंटा वाजवून म्हणत असे 'खडे रहो बेटा, बंदूक घेऊन लढाईला चालला गंगाराम, ओ हो रे गंगाराम, शाब्बास गंगाराम' असं ओरडून अस्वलाचा खेळ करून दाखवी.

29) बाबाखानची बायको, वेडसरच म्हणजे भोळी भाबडी होती. वेडंबागडं रूप, झिंज्या सदा विस्फारलेल्या, अंगावर कसं तरी गुंडाळलेला साडीचा छोटासा तुकडा, बाबाखानची बायको म्हणजे खरोखरच एक ध्यान होतं. पोरांचं लेंढार मागं घेऊन गावात ती कुठंतरी भटकत असे.

30) बाबाखान अस्वलाचा खेळ करून त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नातून तो आपले वआपल्या कुटुंबाचे पोट भरत असे. तो अस्वलाला खूप जपत असे. अस्वलाला शेरभराच्या कण्या भरडून घालत असे. तो त्या अस्वलाला कधीही मारत नसे. बाबाखानचे त्या अस्वलावर खूप प्रेम होते.

31) **वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

1) गहिवर मांडणे - कंठ दाटून येणे

वाक्यात उपयोग :- खूप दिवसांनी आईला पाहून गीताने गहिवर मांडला.

2) धोंडा घालणे - घात करणे

वाक्यात उपयोग :- बाबाखान रागाच्या भरात कोणाच्या डोक्यात धोंडा घालेल सांगता येत नव्हते.

3) खर्ची पडणे - संपणे

वाक्यात उपयोग :- काही वेळा वाईट गोष्टी करण्यातच माणसं आपलं आयुष्य खर्ची पाडतात.

4) गुर्मी असणे - मगरूरी असणे

वाक्यात उपयोग :- बाबाखानची गुर्मी त्याच्या वागण्यातून दिसून येते.

5) गळा काढणे - मोठ्याने रडणे.

वाक्यात उपयोग :- बाबाखानने बायकोला मारल्यानंतर तिने गळा काढला.

गद्य 9

वाचू आनंदे.

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) अ) तंत्रयुगातील उमलती मने
2) क) मुंबई
3) ब) विज्ञानाच्या
4) ब) डॉ. बाबासाहेब आंबेडकर
5) क) संगणक
6) अ) इलेक्ट्रॉनिक
7) ब) वैचारिक लेख
8) अ) चरक संहिता.

II. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा संबंध लिहा

9) गंगा लहरी
10) आठवण
11) शक्ती ,ताकत

III. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

12) वाचू आनंदे या पाठाच्या लेखिका डॉ.स्नेहलता देशमुख होय.
13) वाचू आनंदे पाठाचे मूल्य 'वाचन आणि संस्काराचे महत्त्व 'हे आहे.
14) डॉक्टर स्नेहलता देशमुख यांची अरे संस्कार संस्कार, गर्भसंस्कार तंत्र मंत्र ,तंत्रयुगातील उमलती मने, लोकशाहीत जाणीव व जोखीम, अन्न संस्कार, टेक केअर, आई इत्यादी संस्कारक्षम साहित्य प्रसिद्ध आहे.
15) संस्कार म्हणजे गुणांचा गुणाकार आणि दुर्गुणांचा भागाकार, सहजगता, संवेदनशीलता, सहयोग, सुसंस्कृतता, सहमत ,सहभाग ,सहिष्णुता आणि सदसदविवेक बुद्धीने वागणे होय.
16) वाग्भट हे प्राचीन काळातील आयुर्वेदातील पारंगत वैद्य होय.
17) वाचनाने प्रगल्भता येते रोज काहीतरी वाचत जावे असे लेखिकेला आजोबा वारंवार सांगत.
18) उत्खननामध्ये सापडलेले शिलालेख ,ताम्रपट हे संस्कृतीचे प्रतीक त्या काळाची माहिती देतात.
19) कवी ब्राऊनिंग असे सांगतात की, कविता करतो तेव्हा ती माझी असते पण एकदा का ती कागदावर उतरली की ती लोकांची होते ही गोष्ट जीवाला भिडते.
20) आजकाल दृकश्राव्य माध्यम जास्त लोकप्रिय आहे .
21) मुलं प्रगल्भ होण्यासाठी पुस्तके मासिके सतत वाचनाची सवय लावावी.
22) आजकाल माणसांचे सर्वस्व वाचन विचार व ज्ञान मिळविणे हे आहे केवळ पैसा मिळविणे नाही.
23) अन्न हे पूर्णब्रह्म आहे असे म्हटले आहे.
24) अन्न जसे शरीराचे पोषण करते तसेच वाचन मनाची शुद्धता ठेवते आणि मनाचे पोषण करते.

IV. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

25) वाचनालयात जाणारी मुले साधारणतः शांत स्वभावाची निपजली .गर्भावस्थेत बाळाच्या आईने वाचन केले, मनन केले ,चिंतन केले व गर्भाशय संवाद साधला तर गर्भावर निश्चित चांगला परिणाम होतो त्याचा भावनिक बुद्ध्यांक उत्तम असतो असा निष्कर्ष या प्रयोगाद्वारे सिद्ध झाला. वृत्तपत्रातले उपयुक्त स्तंभ मासिके, नियतकालिके पुस्तके ,काव्य हे सगळे वाचनीय चिंतनीय ठरतात. त्यांचा स्पर्श ,रंग , रूप ,रस ,गंध साठवून वाचनाची सवय वाढते आणि बुद्ध्यांक वाढतो.

26) आपल्याला अनेक भाषांमधील प्राचीन ग्रंथ ,ताम्रपट, शिलालेख ,पानांवर लिहिलेले लेख यातून भूतकाळाची माहिती होते.

27) **संदर्भ :-** वरील वाक्य लेखिका डॉ. स्नेहलता देशमुख यांच्या वाचू आनंदे या पाठातील आहे. **स्पष्टीकरण :-** आपले भूतपूर्व प्रेसिडेंट सर्वपल्ली राधाकृष्णन म्हणत, विज्ञान आणि ज्ञान हे दोन्ही घटक अतिशय महत्त्वाचे आहेत. ज्ञानाला विज्ञानाचे डोळे असले म्हणजे प्रगती निश्चित म्हणून संस्कार हे विज्ञाननिष्ठ असावेत.

V. खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

28) लेखिकेने आजच्या परिस्थितीचे वर्णन करताना माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात संगणक हा अविभाज्य घटक आहे .त्यातही बदल होत आहेत पूर्ण खोलीत व्यापणाऱ्या संगणकापासून ते हाताच्या तळव्यात मावणाऱ्या संगणकापर्यंत प्रगती झाली .हार्ड ,फ्लॉपी, कॉम्पॅक्ट ,डिस्क असे बदल झाले पण हे बदल कितपत शाश्वत आहेत .प्राचीन ग्रंथ ,शिलालेख ,ताम्रपट ,पानांवर लिहिलेले लेख यामुळे त्या भूतकाळाची माहिती झाली. पण या डिस्कचे तसे होईल का? याची खात्री नाही. पण अशा अडचणी वाचनात येणार नाहीत. कारण त्यात कोणताच अडथळा नाही.150 वर्षापूर्वी विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी निबंधमालेत लिहिलेला वाचन लेख आज ही वाचता येतो. कारण वाचनही 64 कलांपैकी एक कला आहे.

29) लेखिकेच्या मैत्रिणीने वाचनालयाच्या सहाय्याने सुसंस्कारित वाचन चळवळ सुरू केली. त्यांना आवडलेल्या एका पुस्तकाचा शेवट त्या मुलांना सांगत असे .पुस्तक घेऊन वाचावेसे वाटावे असे त्यांचे संवादकौशल्य होते .साहजिकच मुलांना पुस्तक वाचण्याचे आवड निर्माण होत असे.लहानपणीच हे वाचन संस्कार झाले एवढेच नव्हे तर बाळ गर्भावस्थेत असताना वाचन संस्कार झाले तर पुढील आयुष्यात त्या बाळाचे व्यक्तिमत्व घडवण्यात वाचनाचा सिंहाचा वाटा असतो .वाचनाने विद्यार्थी स्वत्वाचा व सत्वाचा विचार करतो त्यामुळे लेखिकेच्या मैत्रिणीने वाचनाची साथ पसरविली.

VI. खालील प्रश्नांची आठ ते दहा वाक्यात उत्तरे लिहा.

30) एका प्रथितयश उद्योजकाने आपल्या चार मुलांना त्यांना पुढे काय व्हायचे आहे ?असे विचारले . पहिला मुलगा म्हणाला, डॉक्टर व्हायचंय, दुसऱ्याला इंजिनीयर व्हायचे होते तर तिसऱ्याला आय ए एस करायचे होते. चौथा पुत्र म्हणाला, मला समजून घ्यायचे आहे .साहजिकच वडील चकित होऊन म्हणाले ,काय समजून घ्यायचेय? तेव्हा मुलाने उत्तर दिले मला माणसं समजून घ्यायची तसं शिक्षण हव मुलगा संस्कारीत होता त्याने अनेक ग्रंथ वाचले होते आज खरंच माणुसकी जपायला वाचन संस्कारच उपयोगी ठरतील. तसेच बालक -पालक संवाद ही घडायला हवा. आई-वडिलांनी वाचलेली मुलांना सांगावे आणि मुलांनी वाचलेले ,अनुभवलेले आई-वडिलांना सांगावे. त्यामुळे घरात मनमोकळी चर्चा व्हावी.

31) लेखिकेने लहान मुलांच्या वर वाचण्याचे संस्कार होणे अत्यंत आवश्यक असल्याचे म्हटले आहे आज आपण संक्रमण काळात आहोत. चंगळवाद वाढलाय मानसिकता बदलली आहे पैसा हे सर्वस्व वाटू लागले त्यामुळे शिक्षण आहार वागणूक आचरण विचारात बदल मोठ्या झपाट्याने होत आहेत. मनाचे पोषण म्हणजे उत्तम वाचन लेखन मनन आणि चिंतन होय. डॉ.आंबेडकरां यांच्या शब्दात उद्युक्त करायचे तर वाचाल तर वाचाल हे अगदी तंतोतंत आचरणात आणायला हवे. लेखिकेच्या आजोबा संस्कृत पंडित असल्यामुळे रोज काहीतरी वाचलं पाहिजे असे वारंवार सांगत त्यामुळे वाचन संस्कार लेखिकेवर घरातच झाले. एकदा भाषा वाचायला आली की संगणकासारखी वाचनात अडचणी येत नाहीत. वाचन ही 64 कलांपैकी एक आहे. वाचकांनी वाचावे म्हणून लेखक लिहितो वाचनाने मन समृद्ध व शांत होते. वाचनाने बहुश्रुत झालेला ज्याला इंग्रजीत वेल रेड म्हणतात. तो सर्वांना हवाहवासा वाटतो. वाचनामुळे ज्ञानाचा साठा मिळतो. तो दिल्याने वृद्धिगत होतो .नवनवीन विचारतात चित्तवृत्ती उल्हासित होते. मनाला भरारी मारण्याची बळी येते .मुलांना हा वाचन संस्कृतीचा ठेवा देता येतो .जो त्याने जतन करून वाढवावा लागतो. त्याचा माणूस म्हणून घडविण्यासाठी उपयोग होतो . माणुसकी जपायला वाचन संस्कारच उपयुक्त ठरतात. म्हणून लेखिकेला सुसंस्कारित वाचन घडो अशी प्रार्थना करावीशी वाटते.

32) **खालील वाक्यप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

1) आकाशाला गवसणी घालणे -अशक्य वाटणारे शक्य करणे.
   वाक्यात उपयोग :- गणेशने बँकिंग परीक्षेत आकाशाला गवसणी घातली.
2) झुगारून टाकणे-नाकारणे.
   वाक्यात उपयोग :- देशभक्तानी ब्रिटिशांच्या नोकऱ्या झुगारून टाकल्या.
3) पगडा असणे -वर्चस्व असणे.
   वाक्यात उपयोग :- आज समाजावर प्रसार माध्यमांचा पगडा आहे
4) चकित होणे -आश्चर्य वाटणे.
   वाक्यात उपयोग :- सीमाचे बुद्धिबळ स्पर्धेतील यश पाहून सर्वजन चकित झाले.

गद्य 10

उडती तबकडी आणि अफलातून टोळी

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) 1) टाईम मशीनची किमया
2) 2) गारगोटी
3) 3) मन्यामामा
4) 4) डॉ. जयंत नारळीकर
5) 5) चौकसबुद्धि
6) 6) दोन मैलावर
7) 7) रहस्य शोधून काढण्याची
8) 8) रॅकेटचे चित्र
9) 9) काश्मीरला

II. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा संबंध लिहा

10) दिवस
11) बातमी
12) डॉ. जयंत नारळीकर
13) 1938

III. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

14) मोडकळीला आलेली गढी गारगोटी पासून दोन मैलावर आहे.
15) मन्यामामा उडत्या तबकडीच्या शोधा करिता सरकारी हुकूमानुसार आला होता.
16) पिंट्याने आपल्या सहकाऱ्यांना गावच्या वेशीजवळ रात्री अकरा वाजता बोलाविले.
17) हवालदाराने घरच्या वडाच्या झाडाखाली भाला पुरून ठेवला होता.
18) ॲम्बेसिडरवर बाजीरावांनी चित्र काढले होते.
19) डॉ. जयंत नारळीकर
20) घडीचे रहस्य शोधून काढायची कल्पना पिंट्याच्या डोक्यात शिजत होती.
21) सुटाबुटातला गृहस्थ रामसिंघानी होता.
22) पिंट्या,ललि, चंपी,सुंदर,बाजीराव ही टोळीतील मुलामुलींची नावे आहेत.

IV. संदर्भासहित स्पष्टीकरण

23) **संदर्भ :-** वरील विधान उडती तबकडी आणि अफलातून टोळी या डॉ. जयंत नारळीकर यांच्या वैज्ञानिक कथेतून घेतले आहे.

स्पष्टीकरण - गढीत प्रवेश कारण्याआधी बाजीराव घाबरून म्हणाला बापरे आज अमावस्या आहे.तेव्हा पिंट्याने वरील वाक्य म्हटले आहे.

24) **संदर्भ :-** वरील वाक्य डॉ. जयंत नारळीकर यांच्या उडती तबकडी आणि अफलातून टोळी या पाठातून घेतले असून हा पाठ टाईम मशीनची किमया या कथासंग्रहातून घेतला आहे.

स्पष्टीकरण :- पिंट्या व सुंदर याला पांढऱ्या अंब्यासिडर मधून घेऊन गेले असता त्यांची शोधाशोध सुरू झाली. पिंट्याच्या टोळीची खून रॅकेट चे चित्र बाजीरावाने कारवर काढले होते. त्यावेळी बाजीरावाने मन्यामामाला वरील वाक्य म्हटले आहे.

25) **संदर्भ :-** वरील ओळ उडती तबकडी आणि अफलातून टोळी या पाठातून घेतले असून हा पाठ' टाईम मशीनची किमया या कथासंग्रहातून घेतला आहे.

स्पष्टीकरण :- मन्या मामाने पिंट्याला आपल्यावरच्या अधिकाऱ्याबरोबर बोलून विचारले व सांगितले.सरकारने तुमच्या टोळीला बक्षीस देण्याचा इरादा दाखवला आहे सांगा तुम्हाला काय हवे त्याप्रमाणे मुंबईला फोन करून सांगेन. तेव्हा सुंदर चंपी आणि बाजीराव यांनी त्यांना काय पाहिजे ते सांगितले. पिंट्या म्हणाला, तेव्हा तुला आणि ललिला असे विचारताच त्याच्या डोळ्यासमोर त्याच्या आईची मूर्ती उभी राहिली आणि तो म्हणाला आम्हाला आई-बाबा बरोबर विमानातून काश्मीरला जाऊन यायचं आहे.

26) **संदर्भ :-** हे विधान उडती तबकडी आणि अफलातून डोळे या पाठातून घेतले असून हा पाठ डॉ.टाईम मशीनची किमया या कथासंग्रहातून घेतला आहे.

स्पष्टीकरण :- एरवी शांत असणाऱ्या गारगोटी गावात पुष्कळच गडबड चालू होती. मोटारगाड्या,पत्रकार, पोलीस आले होते.ते पाहून पिंट्याने टोळीची तातडीची सभा बोलावली. सभेत काय नवीन बातमी आहे असे सुंदरला विचारताच सुंदर म्हणाला परवा रात्री गारगोटीत उडती तबकडी उतरली होती.

27) **संदर्भ :-** वरील उद् गार उडती तबकडी आणि अफलातून टोळी या पाठातून घेतले असून हा पाठ डॉ. जयंत नारळीकर यांच्या टाईम मशीनची किमया या कथासंग्रहातून घेतला आहे.

स्पष्टीकरण :- गारगोटीत उडती तबकडी उतरली होती याबद्दलचे रहस्य जाणून घेण्यासाठी पिंट्या व त्याची टोळी शोध घेत होती. रात्री आपण गढी जवळ जाऊन या प्रश्नाचा छडा लावायचा असे पिंट्याने सर्वांना रात्री अकराला गावच्या विषयी जवळ यायला सांगितले. त्यावेळी बाजीराव घाबरून "बापरे! आज तर अमावस्या आहे!"असे उद्गार काढतो.

V. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

28) दामू गाडीवानाने उडत्या तबकडी विषयी सांगितले की, अंधार पडत असताना तो गाडीतून येत होता,तर त्याला त्याच्या डोक्यावर प्रकाश दिसला. त्याने पाहिले तर एक गोल गोल चमकदार काहीतरी वर उडत होते आणि तो गढीकडे गेला.दामू भेदरलाच पण त्याचे बैल देखील उधळले होते. त्यांना आवरून शांत करेपर्यंत ती चकती अदृश्य झाली होती.

29) गुप्त पोलिसात अधिकारी असलेला मन्यामामा गारगोटीत उडती तबकडी कुठे गेली याबद्दलचे रहस्य शोधून काढण्यासाठी आला होता. पिंट्याने मन्यामामाला ही तुझी टोळी त्याच कामात गुंतली असेल नाही का?असे विचारताच मन्या मामाने "होय आम्ही पण त्यात लक्ष घालतोय असे म्हटले. तेव्हा मामा, पिंट्या व त्याच्या टोळीने परस्परांना मदत करून एकमेकांना माहिती पुरविण्याचा ठराव पास केला.

30) रामसिंघानीनीने ठरल्याप्रमाणे दामूला ठरविलेले हजार रुपये देऊ केले व बाकीच्यांनाही पोलिसांना जे सांगितले तसे सांगण्यास बजाविले. सुभानराव व दामूला स्वतःची डोके न चालविण्यास व जसे सांगितले त्याप्रमाणे पोलिसांना सांगून भाला पोलिसांना सापडणार नाही अशा ठिकाणी लपवून ठेवण्यास सुभानरावांना सांगितले

31) गारगोटीत उडती तबकडी उतरली होती हे गढीतील रहस्य शोधून काढण्यासाठी पिंट्या, सुंदर, बाजीराव, मन्यामामा, लली यांनी प्रयत्न केले. आपण गढीजवळ जाऊन या प्रश्नाचा छडा लावायचा असे ठरवून रात्री अकराला गावच्या वेशीजवळ सर्वांना येण्यास सांगितले. दामू आणि सुभानराव यांच्या जबानीतील वेळा जुळत नव्हत्या हे सगळे पाहून सगळे गढीत गेले व दामू,सुभानराव रामसिंघांनी यांना पिंट्याच्या टोळीने शोधून काढले.

VI. खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

32) सुभानरावाला कोणीतरी सांगितले की, गढीत स्मगलर आहेत म्हणून तो गढीपासून पाव मैलावर असताना आकाशातून चकचकीत काहीतरी येताना दिसले. त्यातून दोन हिरवा पोशाख घातलेली हिरवी माणसे उतरून गढीत गेली. त्यावेळी सुभानराव दबकतच त्या यांना कडे गेला त्याला दारी नव्हती मग ते जीव बाहेर कसे आले गुप्तदार आहे काय म्हणून तोच आज पडून पाहू लागला ते पाहून त्याला जबरदस्त धक्का बसला होता.तो बेशुद्ध पडला. शुद्धीवर आला तेव्हा मध्यरात्र झाली होती.सुभानराव गढीच्या पटांगणात पडला होता आणि ते यान नाहीसे झाले होते.

33) उडती तबकडी वगैरे हा सगळा प्रकार झूट होता. आणि गढीचा मालक मुंबईत राहायला होता .हा सर्व रामसिंघानीने रचलेला हा डाव होता. जर आपल्या वडीजवळ उडती तबकडी उतरली होती हे जग जाहीर झाले तर या जागेला खूप प्रसिद्धी मिळेल व महत्त्वाची जागा म्हणून लोक पहायला येतील मग त्यांच्या सरबराईकरिता सरकार या भागात छान रस्ते बांधील, वीज पुरवठा वाढवेल,तसेच दुकानदारांना व हॉटेलवाल्यांना धंदा मिळवून जागेच्या किमती वाढतील, आणि आपण मालामाल होऊ असा रामसिंघानीने डाव रचला होता.थोडेफार तसेच घडायलाही लागले होते.

34) गारगोटी पासून दोन मैलावर एक मोडकळीस आलेली गढी होती. तिथे कोणी राहत नसे. आणि भुताखेतांच्या गोष्टीमुळे तिकडे गावकरी जात नसत. गढीचे मालक मुंबईचे, ते तर कधीच तिकडे फिरकत नसत.अशा या गढीचे रहस्य शोधून काढायची कल्पना पिंट्याच्या डोक्यात शिजत होती.

VII. खालील प्रश्नांची आठ ते दहा वाक्यात उत्तरे लिहा.

35) पिंट्या व त्याच्या सहकाऱ्यांनी यानासंबंधित, त्या यानाच्या पायांना सपाट किंवा विमानासारखी चाके असली पाहिजेत. यान उतरताना त्याच्या तळाशी जाळ झाल्याचे सुभानरावाच्या जबानीत होते. पण फोटो पाहता फोटोमध्ये यानाखालची वनस्पती

36) जळलेली दिसत नव्हती. दामूने यान पाहिले तेव्हा नुकताच सूर्यास्त झाला होता. आणि सुभानराव सांगतो की तो गढीपाशी गेला तेव्हा रात्रीचे आठ वाजले होते. सूर्य तर साडेसातला मावळतो. दीड तास ते यान काय करत होते. बाकीच्या गावकऱ्यांना किंवा मला ते यान कसे दिसले नाही असे अनेक प्रकारचे निष्कर्ष पिंट्याच्या टोळीने काढले.

37) **खालील वाक्यप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

1) डोके खाजविणे - विचार करणे

वाक्यात उपयोग :- गावामध्ये तबकडी मधून लोक आल्याचे ऐकून पिंट्या डोके खाजवू लागला.

2) छडा लावणे - शोध घेणे

वाक्यात उपयोग :- खरोखरच तबकडीतून मानसे आली काय याचा छडा लावण्याचे पिंट्याच्या टोळीने ठरविले.

3) आज्ञा करणे - हुकूम करणे

वाक्यात उपयोग :- सरकारने मन्यामामाला तबकडी संबधी तपास करण्याची आज्ञा केली.

4) पाळत ठेवणे - पहारा ठेवणे

वाक्यात उपयोग :- गढीमध्ये कोण केव्हा येते आणि जाते यावर पाळत ठेवण्यास पोलिसांना सांगण्यात आले.

5) डाव रचने - युक्ती आखणे

वाक्यात उपयोग :- खेळाडूंनी विरुद्ध संघाच्या जास्तीत जास्त खेळाडूंना बाद करण्यासाठी नाव रचला.

6) खो घालणे - सुरळीत चाललेल्या कामात विघ्न आणणे.

वाक्यात उपयोग :- शोध घेण्याचे काम चालू असताना लोकांनी मध्येच खो घालण्याचा प्रयत्न केला.

7) पथ्यावर पडणे - फायदेशीर होणे

वाक्यात उपयोग :- हवालदाराने दिलेल्या माहितीमुळे शोध घेणे पथ्यावर पडले.

गद्य 11

सा रम्या नगरी मास्को

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) ब) ती
2) क) ओकेबोके
3) ड) कार्ल मार्क्स
4) अ) वर्तुळाकार
5) ब) प्रवासवर्णन
6) क) पाच
7) अ) अव्ययीभाव
8) ब) दहा दिवस
9) अ) इंग्रजी
10) ब) मास्को
11) अ) वसंत
12) ड) नव्वद लाख
13) क) युरी गागारीन
14) अ) स्फुटनिक
15) अ) पिकासो

II. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा संबंध लिहा

16) अपारदर्शक
17) डोळे नेत्र चक्षुअक्ष
18) समाहार द्वंद्व समास
19) भूतकाळ
20) विशेषण

III. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

21) स्वच्छता शिस्त व सौंदर्य
22) देशांतर या पुस्तकातून निवडला आहे
23) ऐतिहासिक सांस्कृतिक सामाजिक व वैज्ञानिक
24) आतला आणि बाहेरचा
25) शेवंती सारख्या पिवळ्या धम्मक फुलांच्या मळा
26) आठ विविध मार्ग व तीन पातळ्यात
27) मेट्रोचे प्रत्येक स्टेशनला
28) रा. भि.जोशी
29) मीना प्रभू
30) लेनिन, स्टॅलिन, मार्क्स

31) टॉलस्टाय, पुष्कीन, गॉर्की

32) युरी गागारीन,व्हॅलेंटिना, टेरेस्कोवा

33) कॉन्स्टंटाईन रिओलकोव्हस्की,

34) बॉटीसेली, व्हेरॉनिस,व्हॅ न्गॉग, पिकासो, रॉडीन, रेम्ब्रा

35) बॅले आणि ऑपेरा

36) शांत, प्रामाणिक आणि कष्टाळू आणि शोषिक

37) शहराला जिवंतपणा देणारे रक्तामासाची माणसं

38) कार्ल मार्क्स

39) स्टॅलिन

IV. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

40) परतीच्या प्रवासात प्यान्गॅन्ग ते मॉस्को या 12 तासांच्या दिवस उजेडाच्या प्रवासात मास्कोमध्ये पुन्हा 12 तासांचा म्हणजे एकूण 24 तास उजेडाचा एक दिवस अनुभवला होता.

41) एकादे शहर म्हणजे त्यातल्या निर्जीव वस्तू आणि हिरवा परिसर नव्हे. त्या शहराला जीवंतपणा देणारी रक्तामासाची माणसं म्हणजे त्या शहराचा खराखोरा चेहरा.माणसांचे स्वभाव जगाच्या पाठीवर कोठेही गेलो तरी सारखेच हे खर असलं तरी लेखिकेला रशियन लोक शांत,प्रामाणिक,कष्टाळू व शोशिक वाटले.

42) मास्कोच्या वैभवत भर टाकणाऱ्या दुसऱ्या महत्त्वाच्या वास्तू म्हणजे इथली प्रचंड दालनाने सजलेली वस्तू संग्रहालये.60 संग्रहालयातून साहित्य, कला, क्रांती, शिल्पे, चित्रे यांच्या स्मृती जतन. पुष्कीन म्यीजियम पाहताना युरोप आणि रशिया यांच्या चित्र शिल्पाची जुगलबंदी पाहणे हा मोठा आनंद ही अनुभव.

43) सूर्य हिवाळ्यात या शहराच्या वाट्याला फक्त पाच सहा तास येतो आणि त्यावेळी बर्फाच्या थंडगार चरणस्पर्शाने हिरव्या झाडांच्या खराट्यावर केवळ पांढरी धोप बर्फ फुले फुललेली असतात.यावर माझा या वसंतोत्सवात तरी विश्वास बसला नाही .इतक या शहराचे हिरवं रूप सुखावल.

44) **संदर्भ पाठाचे नाव** – 'सा रम्या नगरी मास्को,' लेखिका 'अश्विनी धोंगडे'
संदर्भ ग्रंथ - देशांतर या प्रवासवर्णातून निवड
स्पष्टीकरण :- मेट्रो रेल्वे ना धूर ना आवाज.ना शिट्या ना भोंगे, गर्दी पुष्कळ पण कोणताही भेदभाव नाही.बोलण्याचा आवाज नाही. प्लॅटफॉर्म एका सरळ रेषेत म्हाताऱ्या माणसांची व गृहिणीची बिनधास्त चढत .

45) **संदर्भ पाठाचे नाव** - सा रम्या नगरी मास्को लेखिका - अश्विनी धोंगडे
संदर्भ ग्रंथ - देशांतर या प्रवासवर्णातून निवड
स्पष्टीकरण - स्टेशनवर असणारी रंगीबेरंगी काचेच्या सुंदर म्यूरल्सचे शेकडो पारदर्शक झुंबर, भिंतीत कोरलेले ऐतिहासिक व्यक्तींचे चेहरे, छतावर कोरलेली रंगीत चित्रे एवढ्याशा दोन डोळ्यांनी नयनसुख कोठे साठवू किती नको असं वाटताना वरील वाक्य लेखिका म्हणते.

46) खालील वाक्यप्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा

मनात घर करणे :- मनात ठासणे

ठाण मांडून बसणे :- एकाच ठिकाणी बसून राहणे

भर घालणे :- वाढ करणे

जतन करणे :- राखून ठेवणे

V. खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

47) लेखिका वसंत बहार मध्ये मास्कोत गेल्या. क्षणोक्षणी आपला रूप पालटणाऱ्या हवाई सुंदरी हिरवी हिरवी गार गालीचे पसरलेले आणि त्यावर नक्षी रेखाटल्यासारखी हजारो पिवळी धमक फुल, शेवंती सारखी गोल माळा बनवून केसात माळणाऱ्या गोरिपान फुलपरी, मोटारीच्या वेगात पटकन दिसली व नाहीशी झाली. अनेक रंगाची, आकाराची, वासाची व बिनवासाची हजारो फुलं, सफरचंदाची झाड, उंच उंच देवदार, हिरवेगार बर्च,सुंदर सुंदर बागा, स्वच्छ जलाशय, विहरणारी बदक, स्केटिंग आणि स्किईंग च्या वेगवान पायाला चाक लावून भिरभिरणारी मुलंमुली.

48) बॅले आणि ऑपेरा ही खासियत असणाऱ्या रशियन कलेच्या सादरीकरणासाठी मास्कोमध्ये 90 च्या आसपास नाट्यगृहे,100 सिनेमागृहे, जवळ जवळ 4200 लहान मोठी ग्रंथालये. इथली प्रचंड दालनाने सजलेली वस्तुसंग्रहालये, जवळजवळ 60 संग्रहालयातून साहित्य, कला, क्रांती,शिल्पे, चित्रे यांच्या स्मृती जतन केलेल्या आहेत.

49) आठ विविध मार्गातील तीन पातळ्यामधले मेट्रोचे जग .साठ सत्तर सेकंदांनी आगगाड्या,नाद भोर ना धूर ना शिट्या ना भोंगे काचेचा तेवढाच आवाज. गर्दी पुष्कळ पण लेडीज कंपार्टमेंट, फर्स्ट क्लास असा जातिवाद नाही.गर्दीलाही शिस्त.सौजन्य, लोकांच्या बोलण्याचा आवाज नाही.हास्यविनोद, हा हा हू हू गप्पागोष्टी नाही. आमच्या मोठमोठ्याने बोलण्याची लाज वाटे.प्लॅटफॉर्म आणि रेल्वे एकाच पातळीत.म्हातारी कोतारी व गृहिणींची सोय. सामानाच्या अथवा बाळांच्या छोट्या बाबा गाड्या सरळ रेषेत आत ढकलून गृहिणी बिंधास्त गर्दीत शिरत. मेट्रोचे प्रत्येक स्टेशन देखने की चीज है. रंगीबेरंगी काचेच्या सुंदर म्यूरल्स, शेकडो पारदर्शक झुंबर, भिंतीत कोरलेले ऐतिहासिक व्यक्तींचे चेहरे, कोरलेली रंगीत चित्रे दोन डोळ्यात पुरुन उरेल एवढे नयन सुख. दुबळी माझी झोळी असे वाटे.

गद्य 12
यंत्र

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) ब) योगीराज वाघमारे
2) ड) दलित .
3) अ) गुडदाणी
4) क) श्रमप्रतिष्ठा
5) ड) दलित कथा.
6) अ)आबा सावकार
7) ब) बायकांवर
8) क)लहान वाट
9) ड) आनंद यादव.
10) क) अतिशय घाबरणे

II. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा संबंध लिहा

11) जवारीची : खुडणी : : हरभऱ्याचे : बडवणं
12) पालापाचोळा : समाहार द्वंद्व समास
13) धनगराचा : राणू : : मांगाचा : जना
14) मोगरी : लाकडी हातोडा : : बिदागी : मिळकत

III. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

15) वास्तव दलितांच्या वेदना दुःख समस्या प्रश्न आणि अनुभव व्यक्त होतो.
16) केळीची बाग बाग ओलांडली की आबा सावकारांचा मळा येतो?
17) आबा सावकारांचा वाडा विहिरीजवळ बांधलेला होता.
18) आबा सावकारांना अनंता माळी सुपारी कातरून देत होता.
19) वामनने बारकीला माश्याची अंगठी केली.
20) आबा सावकारांच्या मळ्यात ज्वारीची मळणी होते.
21) शेतकरी वामनला पावसाळ्यात उसनं - पासनं देतात.
22) मोकळ्या रानात आबा सावकाराची जनावरे चरत होती.
23) मळणी यंत्र लातूरहून गावाहून आणले होते.
24) आबा सावरकराने यंत्रावर मळणी करणार होता म्हणून

IV. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

25) जवारीची खुडणी, गव्हाची कापणी, हरबऱ्याचं बडवणं आणि करडा थोपणं अशा चार पिकांची मळणी करायची म्हणजे महिनाभर काम करावे लागते. सावकाराचे चार गडी किती काम करतील? पुढं चैत्र-पुनव (चैत्री पौर्णिमा) येते. जत्रा भरतीय, जत्रेच्या आधी खळीदळी झाली पायजेत. नायतर केव्हा बवा अवकळ गभण येतंय (पाऊस येतो). रास पडलेली असते आणि पाऊस येतो. तोंडघशी आलेला घास (धान्य) वाया जातोय. माणूस बळ कमी पडतंय. म्हणूनच जत्रेच्या आगोदरच मळण्या करतात.

26) आबा सावकाराच्या विहिरीजवळच्या वाड्यासमोरच खळ तयार होतं. आबा सावकार वाड्याच्या कठड्यावर बसले होते. अंगात मलमलचा शर्ट घातला होता. त्यातून जानव्याची रेघ दिसत होती. दातकोरणं दाताच्या फटीतून अधून मधून चालून उगाच ते दात उचकीत होते. त्यांच्या हाताबुडाशी अनंता साळी बसला होता. पानाची चंची सोडली होती. तो सुपारी कातरून आबाना देत होता. पान लावलं जात होतं. आबा मात्र बायांकडे बघत होते. 'आवला, चला... आटपा... म्हणत होते.

27) वामनाने गेल्यावर्षी दिवसातून दोन तीन शिवारांतील खळी केली. एक एकाला दोन-दोन पोती धान्य वाटून आलं. खूप मिळकत झाली. जत्रा घाटात केली. बायकूला लुगडं घेतलं. स्वतःला धोतर घेतले, पायात वहाणा घेतल्या. आणि बारकीला दोन माश्याची (सोन्याची) अंगठी केली.

V. संदर्भांसहित स्पष्टीकरण करा .

28) **संदर्भ -** हे विधान 'यंत्र' या पाठातील असून 'गुडदाणी' या योगिराज बाघमारे यांच्या कथासंग्रहातून घेतले आहे.

स्पष्टीकरण - आबा सावकार धान्याची मळणी होत असताना बायांच्याकडे बघत म्हणत होते. "आवला, चला... आटपा..." असे शब्द त्यांच्या तोंडून बाहेर पडत होते. असे शब्द बाहेर पडताच करीम गुमास्ता बायकांवर डाफरत होता व त्या त्या खळ्याच्या भोवती फिरत होता.

29) **संदर्भ -** हे विधान 'यंत्र' या पाठातील असून 'गुडदाणी' या योगिराज बाघमारे यांच्या कथासंग्रहातून घेतले आहे.

स्पष्टीकरण - वामन बाजीराव जाधवाच्या मळ्याकडे ढेंगा टाकीत जात असल्याचे पाहून जाधवाच्या गाडीवानाने वामनाला विचारले आहे. गाडीवान गाडीत कणसाची पोती घेऊन मळणीसाठी आबा सावकाराकडे निघाला होता. हे विधान 'यंत्र' पाठातील असून योगिराज वाघमारे यांच्या 'गुडधाणी' कथासंग्रहातून ही कथा घेतली आहे.

30) **संदर्भ -** वरील विधान 'गुडदाणी' कथासंग्रहातील 'यंत्र' या पाठातील आहे. योगिराज वाघमारे यांचा हा कथासंग्रह आहे.

स्पष्टीकरण - कणसांची मोडणी संपली होती. तसे आबा सावकार ओरडले. "झालं का मिस्तरी." "हाव मालक !" म्हणत मळकटलेल्या हाताचा माणूस पान्हा, हातोडी घेऊन सावकाराकडे येत होता. हे ऐकून व पाहून वामन सावरला. 'काय झालं?' म्हणून त्याने विचारलं. त्याच्याकडे न पाहताच "इथे.... डिग्या.... अं.... चला आटपारं... करा सुरू इंजेन, आजच्या आज झालं पाह्यजे." हे ऐकून वामन दचकला.

VI. खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

31) यंत्राचा खेळ बघून वामन गर्भगळीत झाला. सावकाराने असा कसा झोपेत धोंडा घेतला असे वाटून त्याच्या डोळ्यासमोर सगळा अंधार पसरला. घशाला कोरड पडली. हातातली मोगरी (लहान हातोडी) लटलटू लागली, तो मटकन खाली बसला. हताश झाला. त्याला पोटाला रोजगार मिळून पावसाळा सुखाचा जाईल असे वाटले होते. हे यंत्र आपले हात तोडत चालले आहे, असे वाटले. यंत्र पोटावरून फिरतंय, आता यापुढे आम्ही (वामनने) कोणाच्या तोंडाकडे बघायचं? काय खायचं? कसं जगायचं? असे प्रश्न उभे राहिले.)

32) वामन मालकाकडे 'आबा मला काम सांगा!' म्हणून गेल्यानंतर मालकच 'तुला दिसत नाय व्हय काय काम करायचं ते!' असे म्हणत असे. मग वामनच कामाला लागे. बडवणं उफवणं करायचं, पोती टाकायची, वाड्यात आणून थापी लावायची. मग आपुणच पदर पसरायचा अन् म्हणायचं.... 'मालक.... जवारी घाला...... मग शेतकरी जे काय पिकलेलं असतंय ते. ऐनवेळी कामाला मदत आपला शीण ठेवीत

नाही. सहज चारदोन पायली जवारी देतात. असं चार दोन खळ्यावर काम केलं की, पोतं अर्ध पोतं धान्य सासायच गहू, हरभरे सठत्त. आणि त्या बिदागीवरच पावसाळा घालवायचा. मागे काम केलं म्हणून कुणीही बळीराजा उसनं-पासनं द्यायला कमी करत नसे.

VII. खालील प्रश्नांची आठ ते दहा वाक्यात उत्तरे लिहा.

33) अनंता माळ्याकडे वामनाने पाहिले तरी माळ्याने त्याच्याकडे लक्ष दिले नाही. त्याने आबा सावकार बोलण्याआधीच कामाला सुरवात केली. काही पेंढ्या उचलल्या तोपर्यंत मोडणी संपली. एक एक बाई हलू लागली. "झालं का मिस्तरी?" मालक ओरडले. "हाव मालक' म्हणून पान्हा, हातोडा घेऊन तो पुढे सरसावला. सावकार वामनाकडे न पाहताच म्हणाले "इथे.... डिम्या.... अं... चला.... आटपारं... करा सुरू इंजेन." वामन दचकला. इंजन सुरू झालं झिक्.... झिक. त्याचा पट्टा लपालपा पळू लागला. यंत्र वाजू लागलं. वामन घाबरला. "मालक.... खळं करायचं?' त्याने विचारले. पण यंत्राच्या आवाजात त्याचं बोलणं गरगरत गेलं. गड्यानी कणसाची पोती भरून मळणी यंत्रात टाकायला सुरवात केली. "मालक !" पुन्हा वामन ओरडला. आबा सावकार निर्विकार होता. "काय" मालकाने विचारताच, "हो खेळ!" तो घोगऱ्या आवाजात बोलला. "सुरु झालं नव्हं..... आरं, कालच लातूरहून मळणीचं यंत्र आणलं. आता बघ खळं कसं व्हायचं ते.... तोंडांला नुसतं पोत लावायचं. बस् बडवण नाय की वाऱ्यावर उफण नाय.... काय?' वामन गर्भगळित झाला. त्याला पोटाला रोजगार मिळेल असं वाटलं होतं. घशाला कोरड पडली होती. यंत्र वामनकडे न बघताच कच् कच् वच् वच् आवाज करीत होतं. जोंधळ्याची पोती भरली जात होती. गड्यांची धावपळ सुरू होती. मालक ओरडत होते. डाफरत होते. वामन शुद्धीवर आला. मालकाकडे 'काम द्या' म्हणून ओरडला. पण ती हाक मालकाच्या कानापर्यंत पोहोंचलीच नाही.

34) 'वामन' एक शेतकामगार आहे. खळ्यावर कामे करून रोजंदारी, धान्य मिळवायचे व घरसंसार वर्षभर चालवायचा. असे मिळविण्यासाठी तो दरवर्षाप्रमाणे तो आबा सावकाराच्या शेतावर खळ्यात काम करण्यासी जातो. खुडणी, कापणी, बडवणी व मळणीची कामे पूर्ण होण्यास महिना जातो. सावकाराचे कायमचे चार गडी पुरत नाहीत. अवकळ गाभण येऊन पाऊस पडला तर नुकसान होतं. शेतकऱ्याकडे ? माणूसबळ असेल तर ही कामे निभावतात, आबा सावकाराचं शेत मोठं होतं. वामन दरवर्षी त्यांच्याकडे कामाला जात असे. त्यांच्याकडे असा कोणी काम मागण्याला आला तरी ते मिळत असे. काम झाल्यानंतर वाड्यात धान्याच्या पोत्यांनी भरलेली थापी लावून सावकारासमोर पदर पसरून धान्य मागायचे, धान्य चांगले पिकले असेल तर त्याला चार-दोन पायल्या मागितल्यास जास्तीचेही मिळत असे. सुगीमध्ये अशा कामाची तलात उठे, वामन जेथे बोलावतील तेथे जाऊन कामे करून रोजंदारी मिळवी. परंतु आता 'आबा सावकाराने मळणी करण्याचे यंत्र आणल्याने वामनाच्या पोटावरच यंत्राचा पाय आला होता. वामन 'आबा सावकाराचा मळा सोडून काम नाही म्हटल्यावर बाजीराव जाधवाक निघाला होता. परंतु जाधवाचा गाडीवान गाडीमध्ये कणसे भरून आबा सावकाराकडे निघाल्याचे कळताच तो गर्भगळित झाला. हे मळणी यंत्र त्याच्या पोटावर पाय देण्यासाठी आलं असं त्याला वाटलं. आता आपण कुणाच्या तोंडाकडे बघायचं....? काय खायचं.... कसं जगायचं....? रोजगार कशी मिळवायची.....? हे जीवन जगण्याचा प्रश्न त्याच्यापुढे उभा राहिला.

पद्य विभाग

पद्य उत्तरे

पद्य 1

अभंग त्रिदल

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) क) तेर
2) ब) गोरोबाकाका
3) ब) अव्यक्त
4) ब) आळंदी
5) क) निष्कम कर्मयोग
6) ड) संत मुक्ताबाई
7) क) संत नामदेव
8) अ) संत नामदेव
9) क) संत मुक्ताबाई
10) क) विसोबा खेचर
11) अ) दार
12) क) माऊली
13) अ) आई
14) क) दगडासमान
15) क) भावगीत
16) ड) परक्या लोकांना मदत करावी
17) ड) अध्यात्मिक ऊन्नतीसाठी
18) ब) टाळावी

II. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

19) परमेश्वराच्या भक्तीची व नामस्मरणाची परमेश्वराशी एकरूपता साधून अननुभूत आनंद होतो हे सांगण्यासाठी संत गोरा कुंभारानी साखरेचे उदाहरण दिले.
20) आत्मज्ञान, भगवद्भक्ती, प्रेम व समता ही संताची लक्षणे मुक्ताबाईनी सांगितली आहेत.
21) ज्यांच्या मनात लोभ, अहंकार नाही. त्यांना विरक्त म्हणावे.
22) संत ज्ञानेश्वरांना मुक्ताबाईनी दार उघड अशी विनंती केली आहे.
23) संत समुदाय मिळतील तिथे लोटांगण घालावे असे संत नामदेव म्हणतात,
24) प्रेमाने परमेश्वराचे नाव घ्यावे.
25) मनात प्रत्येक कणात परमात्मा आहे असा भाव दृढ धरावा.
26) जननी याचा समानार्थी शब्द आई, माता होय.
27) रोजच्या प्रापंचिक जिवनात व व्यवहारात माणसाने कसे वागावे याबद्दलचा विचार सतत नामदेवानी मांडला आहे.
28) पंढरीमहात्म्य, नाममहात्म्य, संतसमागम या विषयावर मुक्ताबाईची अभंगवाणी प्रसिद्ध आहे.
29) संतमंडळात मोठे स्थान व पारमार्थिक अधिकार संत मुक्ताबाई यांना आहे

30) संत गोरा कुंभार यांच्या वडिलांचे नाव माधवबुवा व आईचे नाव रखुमाई होय.

31) गोरा कुंभार यांनी विठ्ठल सदैव स्वतःच्या कर्मामध्ये पाहिला.

32) मुका माणूस बोलता न येण्यामुळे कधीही आपला आनंद व्यक्त करू शकत नाही.

33) मुक्ताबाईच्या भावंडाची नावे निवृत्तीनाथ,ज्ञानदेव,सोपान देव

34) आपल्याला प्रत्येकाला परलोकाशी जावे लागणारच आहे त्यामुळे माणसाने नेहमी आहे त्या गोष्टीत समाधान मानावे

35) पराव्या कारणे म्हणजे दुसऱ्याच्या कल्याणासाठी

36) अशांती खऱ्या दुःखी

37) संत कवयित्री हे पुस्तक पिरोज आनंदकर यांनी लिहिले आहे

38) आपले संधी या पुस्तकाचे लेखक श्री प्र.न.जोशी हे होत.

39) पैसा पत्नी प्रेम

40) मुक्ताबाईने अद्वैत तत्त्वज्ञान आत्मसात केले.

III. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

41) भक्तीचा आनंद शब्दातून व्यक्त करता येत नाही तेव्हा भक्ताची स्थिती कशी होते ?

परमेश्वराच्या भक्तीची व नामस्मरणाची परमेश्वराशी एकरूपता जर साधली तर नाला अननुभूत आनंद होतो. तो आपल्याला शब्दातून व्यक्त करता येत नाही.तेव्हा भक्ताची अवस्था मुक्या माणसासारखी होते.

42) संत मुक्ताबाईनी संतांच्या सद्गुणांचे वर्णन कसे केले आहे ?

ज्यांच्या अंगी दया क्षमा हे गुण असतात त्यांनाच जगामध्ये संत म्हणावे त्याचबरोबर जी व्यक्ती कोणत्याही प्रकारचा लोभ किंवा मनी गर्व धरत नाही त्यांनाच आपण संत म्हणावे

IV. खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

43) संत मुक्ताबाईनी ताटीचे अभंग कोणत्या प्रसंगी लिहिले आहेत?

संत ज्ञानेश्वरांना त्याकाळी संन्यासाची मुले म्हणून फार त्रास सहन करावा लागला. तरीही त्यानी सर्व परिस्थितीवर मात करून उत्तम प्रतीचे लेखन केले. 21 व्या वर्षी त्यांनी संजीवन समाधी घेतली.त्यावेळी ज्ञानेश्वर निराश होऊन ताटी दरवाजा लावून बसले असता त्यांना उद्देशून मुक्ताबाईने काही अभंग म्हटलेले आहेत हे ताटीचे अभंग म्हणून प्रसिद्ध आहेत.

पद्य 2
सत्वर पाव गे मला

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) संत एकनाथ
2) देवीला वहावयाचा विशिष्ट रोट
3) यमक
4) नणदेचेच पोर
5) भारुड
6) गांवी
7) अहंकार
8) नाश करणे

II. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

9) एक संत एकनाथ पैठण येथे राहणारे होते.
10) सत्वर पाव गे मला या कवितेचे मूल्य भक्ती ,श्रद्धा हे आहे.
11) संत एकनाथांचे गुरु जनार्दन स्वामी हे होते .
12) सासुरवाशीण भवानी आईकडे मागणे मागत आहे.
13) संसाराच्या जाचाला सासुरवाशीण कंटाळली आहे.
14) एकनाथांनी सासुसाठी देहबुद्धी हे रूपक वापरले आहे.
15) सासुरवाशिणीला जाऊ फडफड बोलते.
16) विंचू चावला हे भारुड संत एकनाथांचे आहे.
17) खरूज नणदेच्या मुलाला होऊ दे असे सासुरवाशीण म्हणते.
18) नाथांच्या जीवनात प्रपंच आणि परमार्थ यांचा समन्वय आढळतो.

III. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

19) नाव - संत एकनाथ
कालखंड -1538 -1599 ,पैठण येथे रहिवासी
ग्रंथ - एकनाथी भागवत, भावार्थरामायण ,रुक्मिणी स्वयंवर रचना - अभंग ,पदे ,गवळणी ,भारुडे

20) संसाराच्या जाचाला कंटाळून सासुरवाशीण भवानी आईला प्रसन्न करून संसारातून मुक्ती दे असे मागणे मागत आहे. तेंव्हा ती भवानी आईला म्हणते की ,भवानी आई तू मला पाव मी तुला रोडगा वाहीन अशी मागणी मागते आहे .

21) या भारुडातील सासुरवाशीणीला तिची सासू जाच करत आहे .जाऊ फडफड बोलत आहे .ननदेचे पोर किरकिर करत आहे. या सगळ्यांचा जाच सासुरवाशीणीला भोगावं लागत आहे.

22) **संदर्भ :-** वरील ओळ 'सत्वर पाव गे मला' या कवितेतील असून या कवितेचे कवी संत एकनाथ हे आहेत.

स्पष्टीकरण - जेंव्हा मुलीचे लग्न होऊन ती सासरी जाते तेंव्हा ती सासुरवाशीन बनते व तिथे तिला सासू कडून झालेला त्रास सहन होत नाही. तेव्हा ती भवानी आईला मागणी मागत असताना वरील ओळ सासुरवाशीण म्हणते.

23) **संदर्भ :-** वरील ओळ 'सत्वर पाव गे मला' या कवितेतील असून या कवितेचे कवी संत एकनाथ हे आहेत.

स्पष्टीकरण - सासरी केलेला छळ ,जाऊचे फडफड बोलणे ,नणदेच्या पोराने केलेली किरकिर ,सासूने केलेला जाच सासुरवाशीणीला सहन होत नाही. तेव्हा ती भवानी आईला मला यातून मोकळी कर मला एकटीच राहू दे ,हे सांगताना वरील ओळ भवानी आईला सासुरवाशीणे म्हटले आहे.

24) संत एकनाथांच्या या भारुडातून प्रकटणारे रूपक म्हणजे :

1) सासुरवाशीण - जीव

2) सासरा - अहंकार

3) सासू - देहबुद्धी

4) जाऊ - वासना

5) नणदेचं पोर - मोह

6)नणंद - आशा

25) संत एकनाथांनी या भारुडात सासुरवाशींणीचे रूपक वापरले आहे. संसाराच्या जाचाला कंटाळून सासुरवाशीण भवानी आईला प्रसन्न करून संसारातून मुक्ती दे ,तसेच त्याचं कांहीतरी बरे वाईट होऊ दे, सासू मला खूप जाच करते माझा, छळ करते तिला लवकर घेऊन जा माझी जाऊ सतत फडफड बोलत असते तिला विधवा कर ,नणदेचे पोर सतत किरकिर करत असते त्याला खरूज होऊ दे, मी तुला रोडगा वाहीन आणि या सगळ्या त्रासातून एकटीच राहू दे, असे भवानी आईकडे सासुरवाशीण आपले मनोगत व्यक्त करत आहे

पद्य 3
सुश्लोक वामनाचा

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) ब) पंडिती परंपरा
2) क) वामन पंडित
3) ड) केकावली
4) ब) नम्र होणे
5) क) जलदाता
6) क) मुलगा बिघडतो
7) अ) दुष्ट, स्वार्थी, लाचखाऊ मंत्र्यांमुळे

II. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा संबंध लिहा.

8)	मकर	: मगर	:: सुम	: फूल
9)	सिंधु	: समुद्र	:: वृक्ष	: झाड
10)	मेघ	: ढग	:: जल	: पाणी
11)	कमल	: नलिनी	:: पैसा	: अर्थ
12)	कर	: हात	:: नृप	: राजा
13)	उपकार	: अपकार	:: नम्र	: विनम्र
14)	गमन	: आगमन	:: तप्त	: थंड
15)	दुष्ट	: सुष्ट	:: अध्ययन	: निरक्षर
16)	बलवान		:: पात्र	: अपात्र

III. संधी सोडवा.

17) दुर्मंत्रे	- दुर् + मंत्रे	= दुर्मत्रे.	- विसर्ग संधी.
18) दुष्पुत्र	- दुः + पुत्र	= दुष्पुत्र.	- विसर्ग संधी.
19) खलाराधने	- खल + आराधने	= खलाराधाने.	- स्वरसंधी

IV. खालील शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.

20) महासर्प - महा म्हणजे मोठा असा साप मोठा साप - कर्मधारय समास.
21) महासिंधु - महा म्हणजे मोठा, सिंधु म्हणजे समुद्र सागर, मोठा समुद्र - महासागर - कर्मधारय समास.
22) जलद- जल म्हणजे पाणी, द म्हणजे देणारा, धारण करणारा- असा - मेघ, ढग; कर्मधारय समास.
23) फलभार - फल फलांचे, भार म्हणजे ओझे -वजनः फळांच्या ओझ्याने वाकणारा असा तो वृक्ष, झाड. षष्ठी बहुव्रीहि समास, किंवा फळांचे ओझे (वजन) षष्ठी तत्पुरुष समास.
24) गमनमार्ग गमन म्हणजे जाणारा (नेणारा) मार्ग म्हणजे रस्ता वाट; जाण्याचा रस्ता षष्ठी तत्पुरुष समासः

25) दुष्पुत्र - दुष म्हणजे दुराचारी (वाईट मार्गाचे आचरण करणारा), पुत्र म्हणजे मुलगा, वाईट मार्गाचे आचरण करणारा असा तो कर्मधारय समास.

26) दुर्मंत्रे - दुः म्हणजे वाईट चुकीच्या, मंत्रे म्हणजे सल्ला, शिकवण, मार्गदर्शन -चुकीच्या मार्गदर्शनामुळे षष्ठी तत्पुरुष समास.

V. अलंकार ओळखा.

27) वृक्ष फार लवती फलभारे
लोंबती जल - द घेऊनी नीरें
थोर गर्व न धरी वि - भवाचा
+हा स्वभाव उपकार पराचा

लक्षणे : या पद्यपंक्ती मधून कवी वामन पंडितानी फलभारे नीरें; वि-भवाचा पराचा अशा शब्दालंकारातील अंत्य यमक अलंकाराचा उपयोग केला आहे.

VI. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

28) वामन पंडितांनी आपल्या काव्यात कोणत्या अलंकाराचा विपुल प्रमाणात वापर केला आहे?
शिखरिणी
मगरीच्या दाढेतील मणी कसा काढू शकतो?

29) सामर्थ्यानिशी

30) बाहुसामर्थ्याने महासागराच्या लाटातून कोठे जाऊ शकतो?
पैलतीराला

31) एक वेळ फूलाप्रमाणे कोणाला मस्तकावर धारण करू शकतो?
मोठ्या सापाला

32) काळे ढग काय घेऊन येतात ?
पाणी घेऊन येतात

33) दुसऱ्या वर उपकार करणाऱ्या माणसांचा स्वभाव कसा असतो?
नम्रपणे वागतात

34) स्वाती नक्षत्रात पाण्याचा थेंब शिंपल्यात पडल्यावर काय होते?
सुंदर मोती बनतो

35) वामन पंडित यांना कोणत्या नावाने संबोधले जाते.
यमक्या

36) झाडे कशाच्या ओझ्याने खाली वाकतात ?
फळाच्या

37) थोर माणसे कशाचा गर्व करीत नाहीत ?
आपल्याजवळील संपत्तीचा गर्व

38) पाण्याचा थेंब केव्हा मोत्याप्रमाणे चमकतो ?
कमळाच्या पाकळीवर पडला असता

39) लोखंडाच्या उदाहरणातून कवीने कोणता विचार मांडला आहे?
त्याचा लवलेशही राहत नाही

40) धनाच्या तीन अवस्था कोणत्या ? उदाण उपभोग नाश होणे?
अधम, मध्यम व उत्तम

41) राजाचे जीवन केव्हा नष्ट होते?

दुष्ट स्वार्थी लाचखाऊ मंत्र्यांच्या मुळे

42) प्रापचिंक माणसाच्या संगतीने कोणाचे जीवन नष्ट होते?

संन्यासी माणसाचे

43) मुलाचे खूप लाड केल्याने काय होते?

बिघडतात

44) दुराचारी पुत्रामुळे कशाचा नाश होतो?

कुळाचा नाश होतो

45) शील केव्हा बिघडते?

दृष्टांच्या संगतीने

46) शेती केव्हा नष्ट होते?

शेतीची नीट देखभाल न केल्यामुळे

47) लक्ष्मी कधी निघून जाते?

उन्मत्तपणाच्या वागण्याने

48) अब्रु कधी नष्ट होते?

मद्यपानामुळे

49) मैत्री कधी नष्ट होते?

लबाडीने वागल्यास

50) स्नेह कधी नष्ट होतो?

सतत प्रवासाला गेल्याने

51) पैसा कधी नष्ट होतो?

चुकीच्या मार्गाने पैसा खर्च केल्याने

52) ब्राह्मणजात कशामुळे नष्ट होत आहे असे वामनपंडितांना वाटते ? वेदांचा अभ्यास न केल्याने व आत्मसात केलेले ज्ञान इतरांना न दिल्यामुळे

53) शेती कोणत्या कारणाने नापीक बनते ?

शेतीची नीट देखभाल न केल्यामुळे

54) लक्ष्मी कोणत्या कारणाने नष्ट होते ?

उन्मत्तपणाच्या वागण्याने

VII.खालील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.

55) मूर्खाचे लक्षण सांगा?

उत्तर :- एक वेळ मगरीच्या दाढेत अडकलेला मणी (खडा), आपण आपल्या सामर्थ्याने काढू शकतो. मोठ्या सामर्थ्याच्या आत्मविश्वासाने महासागरही ओलांडून त्याच्या लाटातून पैलतीराला जाऊ शकतो. एखाद्या मोठ्या सापाला फुलाप्रमाणे मस्तकावर एकवेळ धारण करू शकतो. परंतु आपण मूर्ख माणसाच्या मनाची समजूत घालणे आपल्याला थोडेही जमणार नाही.

56) 'परोपकारी व्यक्तीचा स्वभाव संपत्तीकाळातही नम्र असतो' यासाठी कोणती उदाहरणे दिली आहेत.

उत्तर :- फळझाडे त्यांच्या फळांच्या ओझ्याने खाली वाकतात (नम्र होतात.) काळे ढग पाणी घेऊन (जमिनीच्या दिशेने) खाली वाकतात. त्याचप्रमाणे परोपकारी व्यक्तीचा स्वभाव त्याच्याजवळील संपत्ती

काळातही संपत्तीचा गर्व न करता अत्यंत नम्रपणानेच दुसऱ्याशी वागतात, नम्र असतात त्यामध्ये बदल होत नाही.

57) सज्जनांच्या संगतीने उत्तम अवस्था प्राप्त होते हे पटवून देण्यास कोणते उदाहरण दिले आहे ?

उत्तर :- पाण्याचा थेंब कमळाच्या पाकळीवर पडला असता सुंदर मोत्याप्रमाणे

VIII. संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

58) परंतु क्षुद्राचे हृदय धरवेना क्षणभरी ॥

संदर्भ - हे काव्यचरण 'सुश्लोक वामनाचा' या काव्यातील मूर्खाचे लक्षण सांगताना कवी वामन पंडितानी लिहिला आहे.

स्पष्टीकरण - एक वेळ मगरीच्या दाढेत सापडलेला मणी (दगड) आपण आपल्या शक्तीने काढू शकतो, महासागराच्या लाटा ओलांडून त्याच ताकत व इच्छाशक्तीवर परतीर गाठू शकतो किंवा मोठ्या सर्पाला फुलाप्रमाणे डोक्यावर घेऊ शकतो परंतु एखाद्या मूर्ख माणसाच्या मनाची समजूत घालणे अत्यंत कठीण असल्याचे कवी सांगतो.

59) हा स्वभाव उपकार - पराचा ॥

संदर्भ - हे काव्यचरण कवी वामन पंडितांच्या 'सुश्लोक वामनाचा' या काव्यातील तिसऱ्या श्लोकातील माणसाच्या स्वभावाबाबत सांगितला आहे.

स्पष्टीकरण - माणसाला उत्तम स्वभाव प्राप्त व्हावा असे वाटत असेल तर तो चांगल्या उत्तम माणसाच्या संगतीत राहिला तर त्या संगतीनेच त्याचा स्वभावही उत्तमच (चांगलाच) होतो असे म्हटले आहे. त्या माणसाचा स्वभाव उपकारकच बनेल कारण उपकारकर्त्या माणसांच्याच सहवासात तो सदैव राहतोः

60) ते स्वातीस्तव अब्धिशुक्ती - पुटकीं मोती घडे नेटकें ।

संदर्भ - हा चरण त्यांच्या 'सुश्लोक वामनाचा' या काव्यातील.आहे.

स्पष्टीकरण - कवी वामन पंडितानी स्वाती नक्षत्रात समुद्रातील शिंपल्यात पडणारे पाण्याचे थेंब जसे सुंदर मोत्याचे रूपच धारण करतात त्याचप्रमाणे ज्या व्यक्ती चांगल्या स्वभावाच्या माणसांच्या संगतीत राहतात त्या उत्तम (मोत्यासारख्याच) अवस्था प्राप्त करून घेतात असे आपल्या तिसऱ्या श्लोकात माणसाच्या संगतीच्या होणाऱ्या परिणामाबद्दल म्हटले आहे. हा चरण त्यांच्या 'सुश्लोक वामनाचा' या काव्यातील आहे.

IX. खालील प्रश्नांची पाच ते सहा ओळीत उत्तरे लिहा.

61) द्रव्याच्या तीन अवस्थांचे वर्णन कर.

उत्तर :- द्रव्याच्या तीन अवस्था सांगताना आपल्या 'सुश्लोक वाननाचा' काव्याच्या चौथ्या श्लोकात सांगितल्या आहेत. द्रव्य मिळाले असता काळानुसार त्याचा योग्य तऱ्हेने उपभोग घ्या. तो न घेतल्यास किंवा वेळेनुसार सत्पात्र दान न दिल्यास त्या सर्व

62) संपत्तीचा - पैशाचा - नाश होतो. म्हणून उपभोग दान अथवा नष्ट होणे अशा संपत्तीच्या तीन अवस्था आहेत.

63) मूर्खाची समजूत घालणे कठीण आहे यासाठी कोणती उदाहरणे दिली आहेत.

आ) मूर्खाची समजूत घालणे कठीण आहे यासाठी कोणती उदाहरणे दिली आहेत?

उत्तर :- मूर्ख माणसाची समजूत घालणे कठीण असल्याचे सांगताना कवी वामन पंडितानी मगरीसारख्या रागीट प्राण्याच्या तोंडातील दाढेत सापडलेला मणी-दगड-आपण तिचा जबडा ताकतीने उघडून एकवेळ काढू शकू किंवा आपल्या पोहण्याच्या बाहुसामर्थ्याच्या जोरावर महासागराच्या उत्तुंग लाटातूनही पोहून जाऊन पैलतीर गाठू शकू. अथवा भयानक मोठ्या अशा सापालाही फुलासारखे

डोक्यावर ठेवू शकू. परंतु एखाद्या मूर्ख माणसाची समजूत घालणे मात्र अत्यंत कठीण अवघड असल्याचे कवीने म्हटले आहे.

X. खालील प्रश्नांची आठ ते दहा ओळीत उत्तरे लिहा.

64) परोपकारी व्यक्तींचा स्वभाव कसा असतो ? हे सांगण्यासाठी कोणती उदाहरणे दिली आहेत ?

परोपकारी व्यक्तीचा स्वभाव अत्यंत नम्रतेचा असतो हे पटवून देण्यासाठी, सोगण्यासाठी कवी वामन पंडितानी झाडे (वृक्ष), ढग (मेघ) आणि ज्यांच्याजवळ अमाप संपत्ती आहे किंवा त्यांना मिळाली असून जर ते दुसऱ्यांवर उपकार करण्याच्या वृत्तीचे असतील तर त्यात नम्रताच आढळून येते. फळ भाराने झाडे (वृक्ष) ओथंबलेले असताना ते वाकतात. त्यांच्या फांद्या वाकतात. नम्र होतात. पाण्याने भरलेले काळे ढग (मेघ) आकाशातून जाताना खाली जमिनीकडेच वाकतात. नम्र होतात. त्याचप्रमाणे दुसऱ्यावर उपकार करणाऱ्या माणसांचा वैभवकाळ जवळ असताना नम्रपणाने वागणे हाच त्यांचा मूळ स्वभाव असतो. अशी उदाहरणे कवीने दिली आहेत.

65) जीवनातील कोणत्या गोष्टी हातातून निघून गेल्यास जीवन वाया जाते असे कविला वाटते

उत्तर :- वामन पंडितानी आपल्या जीवनातून (माणसाच्या) त्याच्या हातून जाणाऱ्या बारा गोष्टीद्वारे आपले जीवन वाया जाते असे आपल्या श्लोकाद्वारे सांगितले आहे. त्या म्हणजे दुष्टता, स्वार्थ, लाचखाऊपणा असलेल्या मंत्र्यामुळे राज्य व राजा, संन्याशाने प्रापंचिक माणसाशी केलेली संगत (मैत्री), मुलांचे प्रमाणाबाहेर लाड, वेदांचा अभ्यास न केल्याने व आत्मसात केलेले ज्ञान इतरेजनास न दिल्याने ब्राह्मण जात, दुराचारी पुत्रामुळे स्वकुळाचा नाश, दुष्टांच्या संगतीने शील बिघडते, शेतीकडे दुर्लक्ष केल्याने शेती नष्ट होते. उन्मत्तपणे वागण्याने लक्ष्मी (पैसा, संपत्ती) निघून जाते, लबाडीने (फसवणूक करून) वागल्याने मैत्री नष्ट होते. सतत प्रवास अतिपरिचय यामुळे स्नेह नष्ट होते (अवज्ञा होते) आणि चुकीच्या मार्गाने पैसा खर्च केल्यास धन (संपत्ती) नष्ट होते. अशा गोष्टी कवीने सांगितल्या आहेत.

XI. लघुगुरु खुणा करा व वृत्त ओळखा.

66) तोयाचें परि नावही न उरतें सं-तप्त-लोहांतरी ॥

लक्षण :- प्रत्येक चरणात अक्षरे १९ असतात.

गण - म, स, ज, स, त, त, ग असे असतात.

यति १२ व १९ व्या अक्षरानंतर असते.

या वृत्ताला 'शार्दूलविक्रीडित' अक्षर-गण-वृत्त असे म्हणतात.

67) द्रव्यास हे गमनमार्ग यथावकाश

लक्षण :- प्रत्येक चरणात अक्षरे १४ असतात,

गण - त, भ. ज. ज. ग. ग. असे असतात.

यति. - ८ व १४ अक्षरानंतर.

या वृत्ताला अक्षर-गण-वृत्तातील 'वृत्त-वसंततिलका' असे म्हणतात.

68) दुर्मंत्रे नृप, संगतीस्तव यती, कीं पुत्रही लालने ।

लक्षण - प्रत्येक चरणात अक्षरे १९ असतात.

गण - म, स, ज, स, त, त, ग असे येतात. यति १२ व १९ अक्षरानंतर असते. हे अक्षर गण वृत्तातील 'वृत्तः शार्दलविक्रीडित' आहे.

पद्य 4

फटका

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) अ) अनंत घोलप
2) ड) अहमदनगर
3) अ) अनंत घोलप
4) अ) माधवग्रंथ
5) अ) अहिल्याबाई
6) अ) धोपट
7) अ) मायबापावर
8) ड) मुर्खांची
9) ब) आस्तिक
10) अ) कर्मधारय

II. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा संबंध लिहा.

11) अधर्म
12) शहाणा
13) कर्मधारय समास
14) अनंत फंदी

III. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

15) कठिण वाट
16) कष्टाची
17) सत्कार्य केल्यानंतर
18) पैजेचा
19) कुणाची निंदा स्तुती करू नका
20) सदाचार
21) पैंजण
22) आवेशपूर्ण , जोरकस भाषेत
23) जनसामान्यांना सरळमार्गी आयुष्य व्यतीत करण्याचा उपदेश केला आहे.
24) सराफीचा

IV. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

25) अंगी सालसपण, नम्रता, भलाई, सर ळ मार्ग अवलंबविणे , कोणावर रागाऊ नये हे गुण असावेत व निंदा, गर्व , मत्सर, मायबापावर रुसणे हे गुण नसावेत.

26) स्वतःला जगामध्ये शहाणा, श्रेष्ठ (धनाढय) असे समजून माणूस गर्व करतो. हा गर्व मानवाने करु नये म्हणजेच माणसाला संपत्तीचा, श्रीमंतपणाचा, हुशारीपणाचा गर्व धरू नको असे कवी सांगतात.
संपत्ती आहे या गोष्टींचा तू गर्व धरू नको.

27) या जगामध्ये एकापेक्षा एक अनेक थोर माणसे आहेत. तेव्हा आपल्या हाती सर्व सत्ता आहे असे समजून गोरगरिबांना धमकावू नको त्यांच्यावर गुरकावू अथवा कुरगोडी करण्यास जाऊ नको. कारण ही सत्ता एकाच्याच हाती कायम टिकणारी नसते तर ती दोन दिवसांची, अल्पकाळ राहणारी असल्याने त्यामध्ये अपयश घेऊ नको. स्वतःला कमीपण करून घेऊ नको व हातची सत्ता घालवू नको,

V. संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

28) **संदर्भ :-** वरील पद्य चरण फटका या कवितेतील याचे कवी अनंत फंदी हे आहेत .

स्पष्टीकरण :- माणसाला या समाजात वागताना, वावरताना त्याला त्याने आपले चांगले विचार न सोडण्यास, त्यांचा त्याग न करण्यास सांगितले आहे. त्याचप्रमाणे माणसानी संतसज्जनांचा सहवास संगतही सोडू नये असे फटकारून जागे केले आहे.

29) **संदर्भ :-** वरील पद्य चरण फटका या कवितेतील असून याचे कवी अनंत फंदी हे आहेत

स्पष्टीकरण :- व्यक्तीला समाजात वावरताना आपण मोठे , धनाढय म्हणून मन मानेल तसा पैसा उधळू नकोस आणि कर्जबाजारी होऊ नकोस असे बजावले आहे. कारण कधी कधी तो आपल्या मित्राच्या प्रेमापोटी पदरमोड करून त्याला नको तेथे जामिन होतो व पैसा घालवितो. म्हणून परखडपणाने हे विचार मांडले आहेत.

VI. खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

30) कवी अनंत फंदी आपल्या 'फटका' या कवितेतून माणसाने कोणतेही कारण नसताना दुसऱ्या व्यक्तीची निंदा करू नये. त्याचप्रमाणे त्याने अकारण एखाद्याची वारेमाप स्तुतीही करू नये. कारण त्यामुळे शहाणा म्हणून स्तुती करावी तरी चालत नाही, पण ती योग्य तेथे मात्र करावी. त्यामुळे आपल्याकडेच मोठेपण येते.

31) आपली भाजी भाकरी कष्ट करून मिळविणे. तूपसाखरेची चोरी न करणे. अचानक आलेल्या पाहुण्याला तो भुकेला असता असेल त्यातील देऊन संतुष्ट करणे, देवाने आपल्याला ज्या गरीब, मध्यम व धनवान परिस्थिती दिली त्यातच समाधान मानून राहणे व सुख मिळत नाही म्हणून मनातून दुःखी न होणे, योग्य कार्य-कामे-करून पैसा मिळविणे, सत्कार्य करताना मागे-पाय न घेणे, सत्कर्मेच करणे असे माणसाजवळ अनेक सद्गुण आहेत. त्यांचाच वापर त्यांनी करावा. तो केल्यानेच त्यांच्या कार्याचा गौरव होतो.सर्वत्र नावाचा मोठेपणा गाजतो.

VII. खालील प्रश्नांची आठ ते दहा वाक्यात उत्तरे लिहा.

32) अनंत फंदी यांनी आपल्या 'फटका' या प्रकारच्या काव्यातून माणसाला त्यानी आपला नित्याचा धोपट-सरळ मार्ग सोडू नये. आपल्या संसारात कारण नसताना दुसऱ्यांच्या उचापती, भानगडी किंवा उपद्व्याप करीत बसू नये. खोटे बोलू नये आणि अकारण कोणावरही राग धरू नये. देवच नाही असे अज्ञानाने बोलू नये किंवा ज्या गोष्टी करणे अयोग्य अशा अधर्मी गोष्टी करू नयेत. आपल्याच आई-वडिलावर रागावू, रूसू नये, अकारणच सर्वांपासून दूर जाऊन बसू नये. व्यवहार करताना सावधतेने करावा त्यात फसू नये किंवा एखाद्या रिकामटेकड्या प्रमाणे कोणतेही काम न करता गप्प बसू नये. असे असले तरी आपल्या पोटाला हवे म्हणून ज्या अयोग्य गोष्टी आहेत त्याही करू नयेत. उणे बोलू नये, हेवा करू नये, गर्व करू नये, मोठेपणा मिरवू नये. अशा अनेक गोष्टी न करण्यास सांगितले आहे.

पद्य 5
अखंड

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) अ) कटगुन
2) ब) जुन्या चालीरीती
3) क) महात्मा फुले
4) ड) सत्यशोधक समाज
5) अ) 1827
6) ब) 1890
7) क) सावित्रीबाई

II. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

8) एकोणिसाव्या शतकातील थोर करते समाजसुधारक 'महात्मा ज्योतिराव फुले ' होय .
9) महात्मा फुलेंनी स्वतःच्या काव्यरचनेला 'अखंड 'असे नाव दिले .
10) पीडा म्हणजे ' दुःख 'होय
11) रोकडा म्हणजे 'खरा ' किंवा 'सत्य ' होय .
12) कोण आहे ती म्हणजे 'दुष्टनिती ' होय .
13) लोभ म्हणजे 'हाव 'होय
14) जेव्हा सत्याचा जिव्हाळा व मनाची स्वच्छता असते तेव्हा मानवी चित्तास स्वस्थता लाभते .
15) यशवंत होण्यासाठी संयम ' धीर ' सत्य या गुणांची गरज आहे .
16) 'सत्य 'हा मानवाचा धर्म आहे .
17) जो दुसऱ्याचे भले व्हावे व सर्वजण सुखी व्हावे असा विचार करतो अशा व्यक्तीला ज्ञानी माणूस म्हणतात.
18) 'महात्मा ज्योतिराव फुले ' हे चरित्र 'धनंजय कीर ' यांनी लिहिले आहे .
19) 'सत्य ' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द 'असत्य 'आहे .
20) 'मानव ' या शब्दाचा समानार्थी शब्द मनुष्य ' मनुज ' माणूस इ .
21) आपले जीवन 'सत्य वर्तनात 'खर्ची करावे असे महात्मा फुले म्हणतात .
22) मानवाने 'सत्याने ' वागावे असे महात्मा फुले म्हणतात .
23) अखंड ही कविता महात्मा फुलेंच्या ' समग्र वाङमय ' या पुस्तकातून घेतली आहे .
24) महात्मा फुलेंनी ' समाज सुधारणेच्या ' हेतूने विपुल असे लेखन केले आहे
25) 'सत्य तोच धर्म 'कायम करावा असे महात्मा फुले म्हणतात.

III. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

26) महात्मा फुलेंनी जातीव्यवस्था ' वर्णव्यवस्था आणि गुलामगिरी यांच्या विरुद्ध क्रांतिकारक लढा दिला.
27) महात्मा फुलेंनी 'ब्राह्मणांचे कसब ' गुलामगिरी 'शेतकऱ्यांचा असूड' इशारा ' सार्वजनिक सत्यधर्म ' तृतीय रत्न 'इत्यादी ग्रंथांचे लेखन केले आहे .
28) महात्मा फुलेंनी शिक्षणाचा प्रवाह समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचण्यासाठी ' दिनदलितांचे उद्धार करण्यासाठी ' बहुजन समाजातील लोकांना शिक्षित करण्यासाठी अपार कष्ट घेतले .

IV. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा संबंध लिहा.

29) ज्ञानी : अज्ञानी : : स्वच्छता : अस्वच्छता

30) आशा : निराशा : : धर्म : अधर्म

31) जिव्हाळ : प्रेम : : चित्त : मन

32) संताची रचना : अभंग : : फुलेंची रचना : अखंड

V. खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

33) यशवंत होण्यासाठी माणसाने सत्याची वाट धरून सरळ मार्गी वर्तन करावे .आपला अमूल्य वेळ सदरवर्तनात चांगल्या माणसातून खर्ची घालावा . दुसऱ्याची दुःखे संकटे समजून घेऊन रंजल्या गांजल्याना मदत करावी . फळाची अपेक्षा न ठेवता धीर धरून सर्वांना सुख द्यावे . यशवंत होण्यासाठी अशा सद्गुणांची आवश्यकता असते .

34) जो माणूस सत्याच्या मार्गावरून वाटचाल करतो .कसलीही अपेक्षा न ठेवता सतत चांगले कार्य करतो .जगातील सर्वांना सुखी करण्यासाठी जो धडपडतो .त्याला सदगुणांची हाव आहे .दुसऱ्याची दुःखे आपण होऊन जाणतो ती निवारण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करतो . सर्वांनाच भावंडे मानून त्यांची सेवा करतो .असे मानवतेचे ' परोपकाराचे 'सदविवेक बुद्धीचे ज्याच्याजवळ गुण आहेत .त्याच मानवाला फुलेंनी सद्गुनी म्हटले आहे .

35) महात्मा फुलेंनी या अखंडमध्ये मानवी आचार विचारात सत्याचे स्वरूप कसे असावे याचे स्पष्टीकरण केले आहे .ज्याला सत्याबद्दल जिव्हाळा असतो .त्याचे मन निर्मळ असतेच तो नेहमी सत्याचाच अवलंब करतो 'त्याच्या मनात शांतता वास करते . जो दुसऱ्याची दुःखे पूर्ण करण्यासाठी मनःपूर्वक प्रयत्न करतो रंजल्या गांजलेल्याना मदत करतो .स्वतः धीर धरून सर्वांना सुख देतो असा सत्य वचनी जीवनात यशस्वी होतो . सत्य शिवाय कुठलाच धर्म पूर्ण होत नाही .खोटे बोलल्यास मतभेद निर्माण होतात .त्यासाठी सत्य धर्माचेच आचरण करावे. वाईट गोष्टींचा त्याग करावा .आपले नितीनियम सत्याच्याच मार्गाने आखावे .तेव्हाच मानवाला आराम मिळतो जो सत्याचा लोभी असतो तोच मानव जातीला शोभतो 'सुखी होतो ' सर्वजण सुखी व्हावेत म्हणून जो धडपडतो दुसऱ्याची दुःखे निवारणासाठी प्रामाणिकपणे कार्य करतो तोच आयुष्यात धन्य होतो अशा प्रकारे फुलेंनी अनेक दाखले देऊन सत्याचे स्वरूप स्पष्ट केले आहे .

VI. संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

36) "धीर धरुणीया सर्वा सुख देती ॥ यशवंत होती । ज्योती म्हणे " ॥

संदर्भ :- वरील ओळ महात्मा फुले यांच्या अखंडातील असून .महात्मा फुले समग्र वाङमय या पुस्तकातून ती घेतली आहे .

स्पष्टीकरण :- जो इतरांच्या पीडा दुःख दूर करण्यासाठी स्वतः प्रयत्न करतो .रंजल्या गांजलेल्यांना मदत करतो .स्वतः संयम ठेवून दुसऱ्यांना सुखी करतो . तोच यशस्वी माणूस होतो असे यशाचे रहस्य येथे सांगितले आहे .

37) "मानवाचा धर्म सत्य हीच नीती ॥ बाकीची कुनीती ज्योती म्हणे " ॥

संदर्भ :- वरील ओळ महात्मा फुलेंच्या अखंडातील असून 'महात्मा फुले समग्र वांङमय ' या पुस्तकातून ती घेतली आहे .

स्पष्टीकरण : - मानवाचे वर्तन नेहमी सत्य असावे . असे असल्यास त्याच्या जीवनात शांती नांदेल . इतर वाईट गोष्टींचा त्याग करून सत्यालाच धर्म व नीति माणून आचरण करावे असे सत्याचे महत्त्व येथे सांगितले आहे .

38) "आप सुखदुःख पराचे जाणतो ॥ त्याच्याशी वततो ॥ तोच धन्य ॥

संदर्भ :- वरील ओळमहात्मा फुलेंच्या अखंडातील असून महात्मा फुले समग्र वाङमय ' या पुस्तकातून ती घेतली आहे .

स्पष्टीकरण :- इतरांना सुख देण्यासाठी जो धडपडतो जो सत्याचा लोभी असून दुसऱ्याची सुख दुःखे स्वतः जाणून त्यांना मदत करतो . तोच आयुष्यात धन्य होतो असे सहकाराचे तत्व येथे सांगितले आहे.

पद्य 6
प्रेम स्वरुप आई

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) ड) रवीकिरण मंडळ
2) अ) खंडकाव्य
3) ब)आई हवी
4) अ) कैलास
5) ड) माधव ज्युलियन
6) अ) गज्जलांजली
7) अ) मातृप्रेम

II. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा संबंध लिहा.

8) राजपुत्र	: तत्पुरुष समास	:: यथाशक्ती	: अव्ययीभाव समास
9) सेवक	x मालक	:: सुयोग	: कुयोग
10) मुलगा	: नाम	:: भारत देश	: विशेष नाम
11) आज्ञा	- हुकूम	:: पुत्र	- मुलगा

III. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

12) कवी माधव ज्युलियन यांना प्रणय पंढरीचे वारकरी म्हणून संबोधण्यात येत असे.
13) कवीचे पूर्ण नाव माधव त्रिंबक पटवर्धन हे आहे.
14) कवीजवळ त्यांची आई नसल्यामुळे विद्या धन प्रतिष्ठा लाभूनसुद्धा कवी पोरकाच आहे.
15) आपल्या डोळ्यांनी दुसऱ्याच्या आई मुलांचे प्रेम पाहून ही पोरक्याची भूक शांत होत नाही.
16) प्रणय पंढरीचे वारकरी असे माधव ज्युलियन यांना म्हणतात.
17) कवीच्या जीवनात आईची उणीव जाणवत आहे.
18) कवी आईचा हेका सोडेना.
19) कवी आईच्या आठवणीने व्याकुळ होत आहे.

IV. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

20) कवीला त्याच्या आयुष्यात विद्या मिळाली तो सुशिक्षित झाला धनसंपत्ती आणि मानसन्मान मिळाला सर्व काही मिळाले तरी प्रेम देणारी वात्सल्य देणारी जवळ करणारी आई मिळाली नाही आणि ती पुन्हा मिळणार ही नाही म्हणून कवीला ब्रम्हांड आठवत आहे.

21) कवीने आपल्या आईला वात्सल्य व प्रेम करणारा महासागर असे म्हटले आहे कवीला विद्याधन संपत्ती पुन्हा पुन्हा मिळू शकते परंतु प्रेम देणारी आपुलकीने जवळ घेणारी लाड करणारी आई पुन्हा मिळणार नाही तिच्याशिवाय कोणीही या गोष्टी करू शकणार नाही कृपेचा वात्सल्याचा समुद्र म्हणजे आई असे कवीने म्हटले आहे

22) एखाद्या मातेने आपल्या मुलाचे केलेले लाड त्याच्यावर केलेले प्रेम पाहून आपण मात्र अशा सुखापासून वंचित झालो आहे असे कवीला वाटते आपली आई जिवंत असती तर तिने ही आपले तसेच लाड प्रेम केले असते आपणही धावत जाऊन आईच्या कुशीत झोपलो असतो तिच्याशी प्रेमाने बोलून हसलो असतो आणि जीवनानंद मिळविला असता असे कवीला वाटते

V. संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

23) **संदर्भ :-** वरील काव्यपंक्ती प्रेम स्वरूप आई या कवितेतील असून या कवितेचे कवी माधव ज्युलियन हे आहेत.

स्पष्टीकरण:- कवीची आई जिवंत नसल्याने त्यांना पोरकेपणा वाटतो आपल्यावर प्रेम करणारे वात्सल्यतेने जवळ करणारे कोणी नाही म्हणून कवीला वाईट वाटते आपली आई नसल्याने आपण पोरकेच राहणार आहोत यांचे दुःख कवीला होते

24) **संदर्भ :-** वरील काव्यपंक्ती प्रेम स्वरूप आई या कवितेतील असून या कवितेचे कवी माधव ज्युलियन हे आहेत.

स्पष्टीकरण :- कवी आपल्या आई बद्दलचे प्रेम कृतज्ञता व्यक्त करताना म्हणतात की तुझ्याकडे पाहून हसावे तुला डोळे भरून पाहावे आणि तुझे रूप चेहरा माझ्या मनात कायमचा राहील अशा रीतीने मनात साठवावे की ज्याचा विसर मला कधीच पडणार नाही

25) **संदर्भ : -** वरील काव्यपंक्ती प्रेम स्वरूप आई या कवितेतील असून या कवितेचे कवी माधव ज्युलियन हे आहेत

स्पष्टीकरण :- कवींची आई जिवंत नसल्याने त्यांना तिची वरचेवर आठवण येते कारण ती वात्सल्याची प्रेमाची मूर्ती होती तिच्या विना कवी पोरका झाला आहे त्यांच्या जीवाची जरी आबाळ झाली नसली तरी आई नसल्याचे दुःख त्यांच्या मनात आहे.

VI. खालील प्रश्नांची आठ ते दहा वाक्यात उत्तरे लिहा.

26) कवी माधव ज्युलियन यांची आई जिवंत नसल्याने त्यांना तिची वरचेवर आठवण येते कारण ती वात्सल्याची प्रेमाची मूर्ती होती तिच्याविना कवी पोरका झाला आहे आणि आई नसल्याचे दुःख त्यांच्या मनात आहे आपल्याला जगात विद्या धन संपत्ती मानसन्मान मिळवता येते परंतु वात्सल्य देणारी प्रेम करणारी आई मिळवता येत नाही तो पोरकाच राहतो आणि आई आपल्याला आयुष्यात पुन्हा भेटत नाही त्याचे त्यांना दुःख होते म्हणून तो उल्के प्रमाणे कैलास सोडून ये अशी विनंती करीत आहे तुला पुन्हा भेटायची माझी भूक शांत होईना तसेच त्यांना आईचा वियोग सहन होत नसून तिच्या संगतीत राहावे आणि जीवन व्यतीत करावे असे कवीला वाटते.

27) अव्यक्त म्हणजे न दिसणारे परंतु येथे हा विरोधाभास आहे कारण डोळ्यातून अश्रू ओघळल्यानंतर ते दिसणारच मग ते अव्यक्त कसे? कवीची आई जिवंत नाही परंतु कवीला ती आई शरीराने समोर नसली तरी आत्म्याच्या रूपाने त्यांच्या अवतीभोवती फिरून त्यांच्यावर प्रेम करत आहे असे वाटते आई दिसत नाही किंवा तिचा चेहराच आठवत नाही त्यामुळे त्यांच्या अश्रूधारा ही दिसत नाही त्या अव्यक्त असल्या तरी त्यामागचे प्रेम वात्सल्य यांची जाणीव आपल्याला होत असे कवी माधव ज्युलियन म्हणतात.

पद्य 7
पोया

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) बैलपोळा
2) पूर्णपोळ्या
3) बैलाला
4) ग.ल.ठोकळ
5) शेतकरी
6) ग्रामीण कविता
7) कृतज्ञता

II. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा संबंध लिहा.

8) 1951
9) कृतज्ञता
10) पैंजण
11) झूल
12) चुल
13) पौष्टिक खाद्य
14) मध्यम पदलोपी तत्पुरुष समास

III. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

15) बहिणाबाई चौधरी
16) जित्राब: मराठी ग्रामीण कविता
17) बैलांच्या शिंगाना रंगवण्यासाठी
18) पोळा सण असल्यामुळे बैलांच्या
19) उपकाराची परतफेड करणे.
वाक्यात उपयोग - पशु-पक्षी उपकाराचं देणं फेडतात.
20) खाऊन सुस्त होणे.
वाक्यात उपयोग आळशी मनुष्य नेहमी खाऊन मगदूल होतो.
21) पुरणपोळ्या करण्यासाठी
22) पुरणपोळ्यांचा

IV. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

23) पोळा सणाची पूर्वतयारी कशी करण्यास सांगितली आहे?
उत्तर. बैलपोळा हा शेतकऱ्याचा सर्वात मोठा सण असल्याने शेतकऱ्यांनी वाट्यामध्ये शेंदूर तयार करावा घरादाराला तोरण बांधून सजवावे. बैलांना आंघोळ घालावी. शेतकऱ्यांच्या पत्नीने लवकर उठून बैलांसाठी पुरणपोळ्या तयार कराव्यात. अशा पद्धतीने पोळा सणाची पूर्वतयारी आनंदाने करावी.

24) बैलपोळ्याच्या दिवशी बैलांना कसे सजविण्यात सांगितले आहे?

उत्तर. बैलपोळा सणा दिवशी घरदार सजवून बैलांना आंघोळ घालावी .शिंगाणा शेंदूर लावून शिंगांच्या टोकाला घुंगराच्या शेंब्या लावाव्यात. गळ्यामध्ये घुंगुर आणि कवड्याच्या माळा बांधून अंगावर छानदार झूल घालावे. माथ्यावर रेशमाचे गोंडे बांधून चारी पायामध्ये पैंजण बांधावेत. असे बैलांना छान सजवण्यासाठी सांगितले आहे.

25) पोळा सणा दिवशी स्त्रियांना काय करण्यास सांगितले आहे?

उत्तर: बैलपोळा हा शेतकऱ्यांचा सर्वात मोठा सण असल्याने शेतकऱ्यांच्या पत्नीने लवकर उठून चूल पेटवावी. बैलांना नैवेद्य म्हणून पुरणाच्या पोळ्या तयार करण्यासाठी गडबड करावी. चुल लवकर पेटवून बैलांना खुराक म्हणून पुरणाच्या पोळ्या भरपूर तयार कराव्यात .अशा पद्धतीने स्त्रियांनी बैलपोळा सणा दिवशी नैवेद्याची तयारी करावी.

26) परिचय लिहा .बहिणाबाई चौधरी.

उत्तर : पूर्ण नाव -बहिणाबाई नथुजी चौधरी.

जन्म 1880 मृत्यू 1951

खानदेशातील खेड्यात एका अशिक्षित शेतकरी कुटुंबात यांचा जन्म झाला.

जन्मजात असलेल्या काव्य प्रतिभेमुळे सुशिक्षितानाही विचार करायला लावणारी त्यांची बुद्धी होती .

निरक्षर असून सुद्धा त्यांच्या कवितेतून जीवनाचे यथार्थ दर्शन घडते.

ग्रामजीवन ,संस्कृती व निसर्ग यांचा सुरेख संगम त्यांच्या कवितेतून दिसतो .

अनुभवाचा अस्सलपणा, सुंदर कल्पनाविलास, गेयता ,कल्पकता ,बोली भाषेचा गोडवा ही त्यांच्या काव्य लेखनाची वैशिष्ट्ये होत .

त्यांच्या कवितेमधून खानदेशी व्हराडी भाषेचा वापर केला असून ळ बद्दल य चा वापर दिसतो.

निसर्गकन्या म्हणूनही त्यांचा गौरव केला जातो .

काव्यसंग्रह :बहिणाबाईची गाणी

27) बैलाच्या कष्टाचे वर्णन कसे केले आहे ?

V. खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

28) पोळा सणादिवशी बहिणाबाई कोणते मागणे मागते?

उत्तर : पोळा हा शेतकऱ्यांचा अतिशय महत्त्वाचा मोठा सण आहे. पोळा सणादिवशी बहिणाबाई मागणे मागते की, शेतकरी बांधवानो लवकर उठून बैलांना सजवून त्यांची पूजा करा. त्यांना पोटभर पुरणपोळ्या द्या. पण बैलांच्या शर्यती लावून झुंझी लावून त्यांना मारबड करून त्यांच्या जीवाशी खेळणे बंद करा. जरी तुमची हौस, मौज होत असली तरी मुक्या प्राण्यांना खूप त्रास होतो .त्यामुळे हे प्रकार बंद करा अशी कवयित्री पोळा सणादिवशी मागणे मागते.

VI. संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

29) ' उभे कामाचे ढिगारे ,बैल कामदार बंदा!'

संदर्भ :- वरील कवितेची ओळ निसर्गकन्या बहिणाबाई चौधरींच्या पोया या ग्रामीण कवितेतील असून प्रा. भैरव कुंभार व प्रा. मंदा कदम यांनी संपादित केलेला 'जित्राब :मराठी ग्रामीण कविता' या पुस्तकातून ती घेतली आहे .

स्पष्टीकरण :- बैलाला शेतकऱ्यांचा सच्चा मित्र मानले जाते. अनेक कामाचे ढिगारे एखाद्या कामगाराप्रमाणे तो पूर्ण करतो. त्यासाठी गोड खाऊची गरज नसून साधे चारा, पाणी दिले तरी सर्व कामे करतच असतो असे प्राण्यातील प्रामाणिकपणानचे वर्णन येथे केले आहे.

VII. खालील प्रश्नांची आठ ते दहा वाक्यात उत्तरे लिहा.

30) बैलांशी कृतज्ञतेने कसे वागावे असे कवयित्री सांगतात?

उत्तर: बैलाशी कृतज्ञतेने वागून त्याच्या उपकाराचे देणं कसं फेढावं हे बहिणाबाईंनी पोळा या कवितेत सांगितले आहे.बैलाच्या उपकाराचे देणं फेडण्यासाठी बैलपोळा हा सण शेतकऱ्यांना संधी असून त्यांनी वर्षभर केलेल्या कष्टामुळे आपल्या घरी धाण्याच्या राशी येतात .त्याबद्दल कृतज्ञता म्हणून त्या दिवशी बैलांना विश्रांती द्या. घरदार सजून बैलांना आंघोळ घाला. शिंगाणा शेंदूर, शेंब्या, घंट्या, घुंगरू, पायात हार, अंगावरती झुल असे छान सजवून त्यांची पूजा करून पोटभर पुरणपोळ्या द्या. एक दिवस विश्रांती घेऊन हा सण साजरा करून बैलांच्या उपकाराचे देणे फेडावे. अशाप्रकारे बैलाशी प्रामाणिकपणे वागून, त्यांना देव मानून त्यांची सेवा करून बैलाशी कृतज्ञतेने वागावे असे बहिणाबाई सांगते.

31) बैलपोळा सणाचे वर्णन करा.

उत्तर : पोळा या कवितेत बहिणाबाई चौधरी यांनी बैलाच्या कृतज्ञते विषयी होणाऱ्या पोळा सणाचे वर्णन केले आहे. शेतकऱ्यांचा अतिशय मोठा पोळा हा सण आल्याने बैलांच्या शिंगाणा लावण्यासाठी शेंदूर घोटा. घरादाराला तोरण बांधून बैलांना स्वच्छ अंघोळ घालून त्यांना शेंदूर, शेंब्या व घुंगराने सजवावे . त्यांच्या अंगावर छानदार झूल घालून मस्तकी रेशमाचे गोंडे, चारी पायात पैंजण घालावे. घरातील गृहिणींनी लवकर उठून भरपूर पुरणपोळ्या तयार कराव्यात. बैल वर्षभर काबाडकष्ट करतो आणि फक्त चारा पाणीच खातो. त्यामुळेच त्याला एक दिवस भरपूर पोळ्या खायला देऊन शांतपणे बसू द्या. त्यांच्या शर्यती, झुंजी लावू नका. त्यादिवशी बैलांना परमेश्वरासमान मानून त्या अतिथीची पूजा करून कृतज्ञता दाखवा. अशाप्रकारे कवयित्री बहिणाबाई यांनी मोजक्या शब्दात, ग्रामीण शैलीत पोळा सणाचे वर्णन कवितेत आपुलकीने केले आहे.

पद्य 8
आचंद्रसूर्य नांदो

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) 1919
2) कादंबरी
3) माधवाने
4) जनशासनाचा
5) 1976
6) ग.दि. माडगूळकर
7) वाटेवरल्या सावल्या

II. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा संबंध लिहा.

8) रघुतम्	: श्रीराम	: : माधव	: श्रीकृष्ण
9) चंद्र	: शशी	: : सूर्य	: भास्कर

III. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

10) पद्मश्री
11) ग. दि. माडगूळकरांना
12) सामर्थ्य व संयमाचा
13) शिवप्रतापी
14) गीताख्य अमृताचे
15) पराक्रमाची
16) पौराणिक, ऐतिहासिक व राजकीय दृष्टांत देऊन
17) ग. दि. माडगूळकर
18) मराठमोळ्या जीवनाचे विविधरंगी चित्रण व उत्कट भावना शीलता
19) भगवद्गीता
20) देशप्रेम, देशभक्ती
21) गजानन दिगंबर, माडगूळकर

V. संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

22) **संदर्भ -** ही काव्यपंक्ती 'आचंद्रसूर्य नांदो' या कवितेतील असून ही कविता ग. दि. माडगूळकर यांनी लिहिली आहे.

स्पष्टीकरण - भारत हे राष्ट्र शांततेचे, विक्रमाचे प्रतिक आहे या देशासाठी अनेक पराक्रमी वीरांनी आपल्या प्राणांचे बलिदान केले आहे. आजही देशासाठी अनेक पराक्रमी वीर प्राणपणाने लढत आहेत. हे सांगताना ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची गोष्ट आहे. म्हणून ही ओळ येथे कवींनी म्हटली आहे.

23) **संदर्भ :-** ही काव्यपंक्ति आचंद्रसूर्य नांदो' या कवितेतील असून ही कविता ग. दि. माडगूळकर यांनी लिहिली आहे.

स्पष्टीकरण :- कवी म्हणतात की, भारतीय जनशासनातळीचा पाया सत्याचा आहे. येथे सर्वजण गुण्या गोविंदाने राहात आहेत. भारताच्या विजयाची ही पताका सातासमुद्रापारही पोहोचली आहे .

24) **संदर्भ :-** ही कवितेची ओळ 'आ चंद्र सूर्य नांदो 'या कवितेतील असून या कवितेचे कवी ग. दि . माडगूळकर हे आहेत.

स्पष्टीकरण : - भारत हे राष्ट्र शांततेचे , विक्रमाचे प्रतिक आहे ही भूमी कर्तव्यदक्ष भूमी आहे. येथील भूमी सीता रघुत्तमाच्या पदस्पर्शाने पावन झालीआहे. भारताचा इतिहास हा पराक्रमाच्या अनेक गोष्टींनी घडून आलेलाइतिहास आहे.

IV. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

25) या भारतभूमीमध्ये सामर्थ्य व संयमाचा मेळ झाला आहे. सिद्धार्थ, गौतमबुद्धसारख्या पुण्याचे प्रतिक असणाऱ्या अनेक महान व्यक्तींचा जन्मही याभूमीमध्येच झाला आहे. यामुळे भारतभूमीचे हे क्षेत्र पुण्यदायी बनले आहे.

26) भारतातील जनशासन म्हणजे इथली लोकसत्ता सत्यावर आधारित आहे.येथील परंपरा, भारतीय संस्कृती, सण, उत्सव सर्वजण गुण्यागोविंदाने साजरे करतात. सर्वपरंपरांचा सन्मानही एका पिढीकडून दुसऱ्यापिढीकडे नित्य होत आहे .म्हणून येथील परंपरांचा सन्मान नित्यआहे असे कवीने म्हटले आहे.

27) भारत हे राष्ट्र शांततेचे, विक्रमाचे प्रतिक आहे. या देशासाठी अनेकपराक्रमी वीरांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले आहे. आजही याभारतातीलअनेक वीर सत्यासाठी झुंजणारे पराक्रमी वीर आहेत. त्यामुळे परंपरांचा मानराखणे, सत्यासाठी लढणे, सर्वांचा सन्मान करणे हीच या देशातीलजागती प्रथा आहे.

28) ग.दि. माडगूळकर यांचे पूर्ण नाव- गजानन दिगंबर माडगूळकर. त्यांचा जन्म इ. स.. 1919 साली तर मृत्यू इ. स. 1977 साली. प्रसिद्ध कवी, कथाकार, कादंबरीकार, पटकथालेखक. 'जोगिया' ,' चैत्रबन', 'गीतरामायण' इ. काव्यसंग्रह, "आकाशाची फळे' ही कादंबरी, 'वाटेवरल्या सावल्या' हे आत्मचरित्र ही त्यांची ग्रंथसंपदा.'जोगिया', 'चैत्रबन', 'मंतरलेले दिवस' या पुस्तकांना महाराष्ट्र शासनाची पारितोषिके. भारत सरकारतर्फे 'पद्मश्री' किताबाने सन्मानित. च्या यवतमाळ येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. गीत रामायणाच्या रचनेनंतर त्यांना 'आधुनिक वाल्मिकी' म्हणून ओळखले जाऊ लागले.

29) भारतामध्ये पराक्रमाची आणि न्यायाची परंपरा आहे. येथील लोकांमध्ये देशभक्तीची भावना कायम आहे. येथे रामायणासारखे पराक्रमाचे घडावे व हिमालयाप्रमाणे भारताचे नाव उंच व्हावे असे कवीला वाटते.

VI. खालील प्रश्नांची आठ ते दहा वाक्यात उत्तरे लिहा.

30) 'आ चंद्र सूर्य नांदो' ही कविता भारताच्या गौरवशाली इतिहासाचे आणि परंपरेचे वर्णन करते. या कवितेत कवी म्हणतात की भारतभूमी ही देवता आणि प्रेषितांची भूमी आहे. जोपर्यंत चंद्र आणि सूर्य आहेत, तोपर्यंत भारताचे स्वातंत्र्य कायम राहो. ही भूमी कर्तव्यदक्ष आहे आणि येथे रामासारखे प्राक्रमी लोक होऊन गेले येथे रामायणासारखे पराक्रमाचे कार्य घडावे. हिमालयाप्रमाणे भारताचे नाव उंच व्हावे.

VII. निबंधलेखन करा.

31) अ) राष्ट्रीय एकात्मता

"भिन्न वेष, भिन्न भाषा, भिन्न धर्मरीती
भिन्न पथ, भिन्न पंथ, तरीही एक संस्कृती।"

भारत एक खंडप्राय देश आहे. येथे निसर्गाची विविधता आहे. माणसांच्या जीवनपद्धतीतही विविधता आढळून येते. भाषा, पंथ, वेशभूषा, रीति-रिवाज, आहार-विहार, आचार-विचार यांतही भिन्नता आढळून येते. असे असले, तरी इथल्या संस्कृतीचे वस्त्र मानवतेच्या धाग्यांनी विणलेले आहे. आमच्या संस्कृतीची शिकवण सहिष्णुतेच्या पायावर आधारलेली आहे. इथला इतिहास, सांस्कृतिक वारसा राष्ट्राला एकात्मता प्रदान करणारा आहे. कारण, राष्ट्रातील विविधतेतूनही एकात्मतेचे दर्शन घडते. धर्मांनीही पवित्र मानलेल्या नद्या, पर्वत, नगरे, तीर्थक्षेत्रे भारताच्या एकाच भागात नसून सर्वत्र विखुरलेली आहेत. त्यामुळे अनेक प्रकारचे भेद असूनही भारतीयत्वाची कल्पना प्राचीन आहे. भारताची एकात्म संस्कृती हाच एकात्मतेचा पाया आहे.

अशा ह्या प्राचीन संस्कृतीचा वारसा लाभलेल्या देशावर इंग्रजांनी दीडशे वर्षे राज्य केले. त्या काळात देशाची जास्तीत जास्त पिळवणूक, शोषण केले. 'फोडा आणि झोडा' या नीतीचा त्यांनी अवलंब केला. लोकां-लोकात फूट पाडली. धर्मा-धर्मात झुंज लावली. त्यामुळे फुटीरता निर्माण करून भारताची फाळणी केली. भिन्नत्वाची ही भावना भारतीय एकात्मतेस अडथळा ठरू लागली.

राष्ट्रीय एकात्मता साधण्यासाठी राष्ट्रीय वृत्तीची जोपासना करणे गरजेचे होते. त्याशिवाय राष्ट्राचे सामर्थ्य वाढणार नाही. जोपर्यंत सामर्थ्य वाढणार नाही, तोपर्यंत राष्ट्रीय एकात्मता साधणार नाही. यासाठी समाजात प्रबोधन घडवून आणण्याची गरज होती. अनेक भारतमातेच्या तेजस्वी पुत्रांनी हे काम केले व देशातील एकात्मतेला बळ दिले. त्यामुळे भारतमातेच्या पायातील शृंखला गळून पडल्या व भारत स्वतंत्र झाला. आज भारत स्वतंत्र होऊन साठ वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. आजही शत्रूच्या कारवाया चालूच आहेत. शत्रू अधून-मधून डोके वर काढत आहे. घरभेदीही आहेतच. दहशतवादाच्या भोवऱ्यात देश फिरत आहे. अशा वेळी भारतातील सर्व नागरिकांनी एकत्र येणे गरजेचे आहे. दरवर्षी केवळ राष्ट्रीय सण साजरे करून भागणार नाही; तर सामाजिक परिवर्तन, आर्थिक प्रगती, शांततामय जीवन, जगात देशाची प्रतिमा उंचावण्यासाठी सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे. 'आम्ही सारे भारतीय आहोत', अशी केवळ प्रतिज्ञा करून चालणार नाही; तर अंतःकरणांपासून तसे वाटले पाहिजे. तेव्हाच 'बलशाली भारत होवो, विश्वात शोभूनी राहो' या ध्येयाकडे वाटचाल करता येईल.

जेव्हा भारतावर परचक्र येते, तेव्हा सारा भारत सर्व भेदभाव विसरून एक होतो. आमचे सैनिक देशासाठी अगदी प्राणपणे लढतात. तसेच, प्रत्येक भारतीय भ्रष्टाचार, चोरटी आयात, निर्यात, देशद्रोह यासारख्या गोष्टींपासून दूर राहील नि 'देश माझा, मी देशाचा' ही भावना अंगी बाणवेल, तेव्हा भारत जगात श्रेष्ठ देश ठरेल.

पद्य 9

हिरवळ आणिक पाणी.

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) ब) निसर्ग कविता.
2) अ) बोरी.
3) अ) हिरवळ आणिक पाणी.
4) ब) आरस पाणी.
5) ड) स्मितात
6) विश्वास
7) अ) गुरे वासरे.
8) क) अव्ययीभाव समास
9) ड) मुलगी
10) क) दृष्टांत

III. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

11) हिरवळ आणिक पाणी या कवितेचे कवी बा. भ . बोरकर हे आहेत.
12) नादमाधुर्य आणि सौंदर्य सृष्टी ही कवी बा. भ. बोरकर यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये आहेत.
13) हिरवळ आणिक पाणी या कवितेचे मूल्य निसर्ग प्रेम आहे.
14) ही कविता चित्रविणा या कवितसंग्रहातून घेतली आहे
15) भारतीय संस्कृती व जीवनमूल्य यावर कवीची अपार श्रद्धा होती.
16) ज्या ठिकाणी कोमल अशा हिरव्या गवताची पाती पसरलेली दिसतात तेथे आनंदाचे पाझर सापडतात.
17) ऋतू ऋतुतून जेथे जेथे नवे नवे सोहळे या सृष्टीवर मोकळेपणाने पाहता येतात अशा उघड्या अंगणात शृगाराची निर्मळ अमृतवाणी आढळते.
18) माणसाला दुसरा माणूस ज्या ठिकाणी हवा हवा वाटतो तेथे ओवी अभंगांमध्ये दिलासा वाटतो.
19) ज्यांच्या हृदयात परमेश्वराबद्दल सदैव आदर असतो अशा माणसांच्या मनाला उद्या काय होणार कसे होणार याचा भार नसतो. प्रश्न 3. खालील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.
20) जेथे उत्तम असे हिरवे कोळे गवत उगवले आहे . स्वच्छ आणि पारदर्शी वाऱ्याची झुळूक आरोग्य देणारी आहे तेथे गुरे वासरे आनंदाने चरतात.
21) ज्या भूमी बद्दल माणसाच्या मनात आपुलकी माया उत्पन्न होते . ही भूमी समृद्धतेने नटलेली असते. मुले आणि पती-पत्नी सर्व कुटुंब आनंदाने सुखाने नांदत असते. अशा प्रकारच्या जागी परिश्रमरुपी लक्ष्मी रममान झाली आहे तिचे मूळचे लाभणे खुलून दिसते असे कवींनी समृद्ध धरतीचे वर्णन केले आहे.
22) धरतीवर प्रत्येक ऋतूत वेगवेगळे सोहळे पहावयास मिळतात. वसंत ऋतु सारखा ऋतुराजाचा सोहळा असतो . जेथे उघड्या मोकळ्या माळावर आणि घराघरातील अंगणातून वसंत ऋतूच फुललेला असतो. तेथे अमृता सारखा गोडवा असलेले बोल ऐकावयास आणि पहावयास मिळतात.

IV. संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

23) जिथे अशी समृद्ध धरित्री घुमते घरे अन् पुत्र कलत्री. संदर्भ : वरील कवितेच्या ओळी हिरवळ आणिक पाणी या कवितेतील असून याचे कवी बा. भ .बोरकर हे आहेत. प्रस्तुत कविता चित्रविणा या काव्यसंग्रहातून घेतली आहे. स्पष्टीकरण: कवी असे सांगतात आपली भूमी समृद्धतेने ,वैभवतेने नटलेली आहे घराची अंगण मुलाबाळानी गजबजलेली आहेत. पती-पत्नी आनंदाने नांदत असतात अशा सुंदर वातावरणात कवीला कविता स्फुरत असते असे म्हटले आहे .

24) माणूस जेथे हवाहवासा अभंग -ओवीमध्ये -दिलासा. संदर्भ: वरील कवितेच्या ओळी कवी बोरकर यांच्या हिरवळ आणिक पाणी या कवितेतून घेतल्या आहेत. स्पष्टीकरण: कवीने माणसाला दुसरा माणूस आपल्या सोबतीला हवासा वाटतो. एकमेकांबद्दल प्रेम आपुलकी असते .त्यांच्या तोंडून अभंग ओवी सारखे वाणी ऐकू येते त्या ठिकाणी एकमेकांना एकमेकांबद्दल विश्वास दिलासा वाटतो.

V. खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

25) आपल्या सख्या -प्रियकरा -बाबत जसे बंधन नसते. त्याच्याविषयी आदरयुक्त प्रेम असते. त्या प्रियकराकडे पाहून हसताना त्या हास्यातून जणू काही शरद ऋतूचे पिठूर चांदणेच सर्वत्र पसरल्यासारखे वाटत असते. आपल्या गोड हास्यातून जणू शरद ऋतूला आमंत्रण देऊन बोलवत असतो आणि त्याचा आनंद घेतो. चांदणे म्हणजे शरदाचे प्रेमाचे सहज उद्गार बोलणे होय. त्या चांदण्याचा गार गार अशा बर्फाचा पण हवासा वाटणारा स्पर्श आहे. असे हे शरद ऋतूचे भूल टाकणारे प्रेम निर्माण करणारे लोभस चांदणे आहे असे कवी म्हणतो.

VI. खालील प्रश्नांची आठ ते दहा वाक्यात उत्तरे लिहा.

26) कवी बा. भ .बोरकर यांनी हिरवळ आणिक पाणी या कवितेतून आपल्याला काव्य केव्हा स्फुरते लिहावेसे वाटते याचे वर्णन केले आहे. कवीला जेथे हिरवळ आणि पाणी आहे. निळ्या आकाशातून पाखरे किलबिलाट करत फिरतात तेथे कवीला कविता स्फुरत असते. अशा कोमल हिरवळीवर गुरे वासरे चरत सुखात आनंदात फिरतात हवेची झुळूक आरोग्यदायक असते अशा भूमीबद्दल माणसाच्या मनात आपुलकी माया आहे. तेथे आनंदाचे पाझर पानोपानी फुटत असतात. त्या ठिकाणी भूमी भरपूर धान्य पिकविते. जेथे मुले -बाळे पतीपत्नी आपल्या कुटुंबासह आनंदाने राहतात. ज्या ठिकाणी सर्व ऋतूमध्ये वेगवेगळे सोहळे पहावयास मिळतात अशा ठिकाणी कवीला कविता स्फूरते. जेथे माणुसकी आहे माणसाला माणूस हवा आहे. ज्याने गायलेल्या अभंग ओवीतून दिलासा मिळतो. एकमेकाबद्दल विश्वास वाटत असतो. त्या माणसांच्या मनामध्ये परमेश्वराबद्दल आदर असतो त्या ठिकाणी उद्याची चिंता नसते. दुसऱ्याच्या सुखात आनंद होतो दुसऱ्याचे दुःख पाहून डोळ्यात अश्रू येतात तेथे कवीला कविता स्फुरत असते. माणसाला निसर्गाने कसे मोहवून टाकले आहे याचे वर्णन कवीने केले आहे.

पद्य 10

सुंदर ते ध्यान

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) शेतकरी
2) घामाच्या धारा
3) भुकेलेली
4) कष्ट करते
5) पोटाचे नगारे वाजवून
6) अव्ययीभाव समास
7) नांगर
8) वेडावणे
9) पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे

II. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा संबंध लिहा.

10) कमरेला
11) कुरूप
12) पु. ल. देशपांडे

III. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

13) शेतकऱ्याचे ध्यान शेतावरी आहे.
14) शेतकऱ्याने खादीचे धोतर, कमरेला पितांबर असा पोशाख परिधान केला आहे.
15) शेतकऱ्याला थंडीचा उबारा घोंगडीचा मिळतो.
16) शेतकऱ्याने कपाळावर चिखलाचा टिळा लावला आहे.
17) व्यक्ती आणि वल्ली या त्यांच्या पुस्तकाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला.
18) सुंदर ते ध्यान हा मूळअभंग संत तुकाराम यांनी लिहिला आहे.
19) तुकारामांच्या मूळ अभंगात विठ्ठलाच्या जागी शेतकऱ्याचे रूपक वर्णन केले आहे.
20) सुंदर ते ध्यान या कवितेचे मूल्य कष्टाळूपणा हे आहे.
21) एखादी प्रसिद्ध कविता समोर ठेवून याच धरतीची कविता कवी लिहितो. याला विडंबन काव्य म्हणतात.

IV. संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

22) **संदर्भ :-** वरील ओळ पु ल देशपांडे यांच्या सुंदर ते ध्यान या काव्यातील आहे. हे संत तुकारामांच्या सुंदर ते ध्यान या विठ्ठलाचे अभंगाचे विडंबन काव्य आहे

स्पष्टीकरण :- या काव्यातील कवीने समाजाला, शेतकरी आपल्या शेतात ध्यान लावून,पिकवून अन्न देणाऱ्या या शेतकऱ्याच्या घरची परिस्थिती,गरिबी व त्याची स्थिती उपासमारीची कशी आहे त्याचे दर्शन घडविते.

23) **संदर्भ :-** वरील काव्यचरण पु.ल. देशपांडे यांच्या सुंदरते ध्यान या काव्यातील आहे.हे संत तुकारामांच्या सुंदर ते ध्यान या विठ्ठलाच्या अभंगाचे विडंबन काव्य आहे.

स्पष्टीकरण :- शेतकऱ्यांची केवळ बायकोच भुकेलेली, झोपलेली नसून त्यांची मुले देखील उपाशीपोटीच, घरामध्ये आपल्या वडिलांच्या कर्तव्याचा गोष्टी करून त्यावर आधारित आरत्या म्हणत आहेत.वडिलांचा मोठेपणा गात आहेत.समाजातील अन्नदात्या शेतकऱ्यांच्या घरची परिस्थिती कशी आहे याचे दर्शन कवीने या विडंबन अभंगातून व्यक्त केले आहे.

24) **संदर्भ :-** वरील ओळ पु. ल.देशपांडे यांच्या सुंदर ते ध्यान या कवितेतील असून ही कविता व्यक्ती आणि वल्ली या पुस्तकातून घेतली आहे.

स्पष्टीकरण :- विठ्ठलाच्या जागी कष्टाळू शेतकऱ्याचे रूपक वर्णन केले आहे. शेतकऱ्यांच्या कष्टाळूपणाचे वर्णन करताना त्याची मकरकुंडले म्हणजेच घामाच्या धारा व थंडीपासून संरक्षणासाठी उबारा मिळावा म्हणून कांबळ्याची घोंगडी अंगावर घेतली आहे.

25) **संदर्भ :-** वरील काव्यपंक्ती सुंदर ते ध्यान या कवितेतील सोन्या कवितेचे कवी पु.ल.देशपांडे हे आहेत.

स्पष्टीकरण :- शेतकऱ्याच्या झोपडीत त्याची बायको,रखुमाई मुलांची आई अपार कष्ट करणारी असल्याने पोटासाठी कसे काबाडकष्ट करून उपाशी पोटीच भुकेलेली काम करत आहे याचे वर्णन वरील काव्यपंक्तीत केले आहे.

V. खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

26) शेतकरी शेतावर नांगरटी करण्यासाठी खांद्यावर नांगर घेऊन निघाला आहे त्याने पितांबर सारखे खादीचे हाताने विणलेल्या वस्त्राचे धोतर व लंगोटी नेसली असून त्यांनी आपल्या कानात घामाच्या धारांची कुंडले धारण केली आहेत. तसेच थंडीपासून संरक्षणासाठी उभारा मिळावा म्हणून कांबळ्याची ओंगळी अंगावर घातली आहे. गळ्यात तुळशीचा हार घालून त्याने आपल्या कमरेला वेळा, कोयता खोचला आहे. आणि कपाळावर गंधासारखा चिखलाचा टिळा लावला आहे.

27) शेतकऱ्यांच्या झोपडीत त्यांची बायको,पत्नी रखुमाई मुलांची आई अपार कष्ट करणारी असल्याने पोटासाठी कशी काम करून,कष्ट करून उपाशी पोटीच भुकेलेली काम करत आहे. शेतकऱ्यांची मुले देखील पोटाला न मिळाल्याने झोपडीतच आपल्या पोटाचे नगारे आपल्या हाताने वाजवीत जणू कष्टकरी बापाच्या कर्तुत्वाच्या आरत्याच म्हणून गात आहेत. असे कवीने विडंबनात्मक वर्णन केले आहे.

28) सुंदर ते ध्यान हा संत तुकाराम महाराजांनी रचलेला एक प्रसिद्ध अभंग आहे. विठ्ठलाच्या सुंदर रूपाचे वर्णन या अभंगात केले आहे कमरेवर हात ठेवून विटेवर उभे असलेले गळ्यात तुळशीची माळ आणि अंगावर पितांबर वस्त्र घातलेले विठ्ठलाचे रूप कवीला नेहमीच आवडते असे या अभंगात म्हटले आहे.
तुकाराम महाराज म्हणतात की हे ध्यान माझे सर्व सुख आहे
असे सुशोभी ध्यान मला नेहमी आवडेल.

29) प्रत्यक्ष जमीन कसणारा म्हणजे शेतकरी होय. शेतात येणाऱ्या पिकांच्या उत्पन्नावरून शेतकऱ्यांची उपजिविका चालते. रात्रंदिवस सांभाळ कष्ट करून शेतकरी अन्नधान्य पिकवतो भारतीय समाज व्यवस्थेतील शेतकरी हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे शेतीवर उद्योगधंदे व मानवी जीवन अवलंबून असते म्हणून शेतकऱ्याला जगाच्या पोशिंदा म्हटले जाते.

VI. विठ्ठल माझा मित्र

30) विठ्ठल त्याला पांडुरंग विठोबा किंवा पंढरीनाथ या नावाने ओळखले जाते. हा एक हिंदू देव आहे जो भारतातील महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यात प्रामुख्याने पूजला जातो. तो महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचा प्रमुख देव आहे.. विठ्ठल हा माझा मित्र आहे ही भावना वारकरी लोकांच्या मनात खूप दृढ आहे..ते विठ्ठलाला आपले सवंगडी सोबती आणि मार्गदर्शक मानतात. विठ्ठलावरची भक्ती वारकरी लोकांमध्ये खूप खास आहे.ते विठ्ठलाला आपलेसे मानतात आणि त्यांच्यावर खुप प्रेम करतात.विठ्ठलाला भेटण्यासाठी ते पंढरपूरला पायी चालत जातात. त्याला महाराष्ट्राची दक्षिणकाशी म्हणून ओळखले जाते तिथे विठ्ठलाच्या दर्शनाने त्यांना खूप आनंद मिळतो. वारकरी संप्रदायातील लोक विठ्ठलाला आपले दैवत मानतात.त्यांच्या भक्तीत तल्लीन होतात. ते विठ्ठलाला आपले दुःख आणि सुख मानतात.त्यांच्यासाठी विठ्ठला हा एक मित्र, मार्गदर्शक आणि आधार आहे.

विठ्ठलाचे महाराष्ट्राच्या संस्कृतीत खूप मोठे स्थान आहे. त्यांचे नाव घेतल्याने लोकांना शांती आणि समाधान मिळते.विठ्ठलाच्या भक्तीमुळे लोकांमध्ये प्रेम समजूतदारपणा आणि एकोपा वाढतो.विठ्ठल हा वारकरी लोकांचा मित्र आहे. ज्याच्यावर ते ग्रुप प्रेम करतात आणि ज्याच्या दर्शनाने त्यांना आनंद मिळतो विठ्ठलाच्या भक्तीमुळे लोकांमध्ये प्रेम वाढते.त्यामुळे विठ्ठला महाराष्ट्राच्या संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे.विठोबाला अनेकदा एका सावळ्या रंगाच्या तरुण मुलाच्या रूपात चित्रित केले जाते.कटीवर हात ठेवून विटेवर उभा राहतो. कधी कधी त्याची पत्नी रखुमाई सोबत असते.

गरुड पुराणा मध्ये वर्णन केल्याप्रमाणे विठ्ठल हा विशाल भाल असलेला तेजस्वी नेत्रांचा मान धारण केलेला कटि -कर ठेवून उभा असा आहे. पुंडलिका आणि विट फेकल्याने आजही वारकरी त्यांचा उल्लेख पुंडलिक वरदा हरी विठ्ठल श्री ज्ञानदेव तुकाराम पंढरीनाथ महाराज की जय असे करतात.

पद्य 11

माहेराची वाट

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) अ) नाजूक निळी मलमल
2) क) कडूलिंब
3) ब) फळे फुले
4) ब) रुळलेली
5) अ) भावकविता
6) ड) गर्भ रेशीम
7) अ) द्विगु समास
8) ब) पुष्प
9) ड) बाबा
10) क) सासर
11) क) भाजी भाकरी
12) ड) दुर्गंध

II. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

13) नाजूक निळी मखमल अंथरलेली आहे.
14) वेशीवरला कडुलिंब पावलावर मोहर ढाळतो.
15) जिच्यासाठी माझे माहेर असे माहेरवाशीण तिच्या आईला म्हणते.
16) तिला आपले माहेर जवळच आहे असे वाटते.
17) " तुझे सौभाग्य अखंड राहो " असा आशीर्वाद देते.
18) इंदिरा नारायण संत
19) या कवितेचे मूल्य आपुलकी, मातृप्रेम.
20) साहित्य अकादमी पुरस्कार व जनस्थान पुरस्कार.
21) स्त्रीमनातील हळुवारपणा, विरह - व्याकुळता, वियोग, दुःख आणि निसर्ग सौंदर्य ही वैशिष्ट्ये आहेत.
22) माहेराची आठवण सासुरवाशींणीस येते.
23) सासुरवाशीणीस तिची आई भेटण्यास आली आहे असे वाटते.
24) पिसोळीचा रंग पिवळा असतो.
25) पापण्यावरून कडुनिंबाच्या मोहराचा सुगंध दरवळतो.
26) कुंकू चंद्रकोरीत ठेवले आहे.
27) आई आशीर्वादाच्या अक्षता लेकीच्या डोक्यावर टाकते.
28) डोळे उघडताच वेशीवरला कडूनिंब दिसतो.
29) या कवितेतील आई नाहीशी होते.
30) इंदिरा संतांचे महाविद्यालय शिक्षण कोल्हापूर पुणे येथे झाले.
31) ' घाल घाल पिंगा वाऱ्या ' या कवितेचे कवी प्रा.कृ.ब.निकुब आहेत.

III. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा संबंध लिहा.

32) प्राणी

33) रडत

34) कर्मधारय समास

35) भूतकाळ

36) शाप

IV. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

37) मुलीला आशीर्वाद देऊन तिच्या समोरून दूर होताना कारण मुलगी माहेराहुन पुन्हा तिच्या सासरी जाण्यास निघालेली असते पुन्हा चार दिवस माहेरी येऊन जा असे सांगताना डोळे डबडबून येतात.

38) डबडबलेले डोळे सावरित भेटते हसतमुखाने आपल्या लेकी समोरून निघून जाते.फळाफुलाने ओटी भरते.चंद्रकोरीतील कुंकू कपाळी लावत भांगावर आशीर्वादाच्या अक्षता टाकते.

39) कोकण आणि घाट माथ्याच्या जंगलात आढळणारा शाकाहारी प्राणी त्याचे तोंड खारी सारखे व शरीर मुंगुसासारखे असते. काट्याकुट्यातून न जाता सदैव रुळलेल्या मऊ वाटेवर जातो.

40) सहवास,शेला,मेंदी, मृगजळ,रंगबारी, बाहुल्या, गर्भरेशीम,चित्कळा,मृण्मयी,वंशकुसुम, निराकार

41) अलंकार :- चेतन्यगुणोक्ती

लक्षणे :- गद्यात किंवा गद्यात एखाद्या निर्जीव पदार्थावर सजीवाचा आरोप केला जातो.कडूलिंब एखाद्या माणसाप्रमाणे पावलावर सुगंधी मोहोर टाकतो.

42) अलंकार :- दृष्टांत

लक्षणे :- गद्यात किंवा पद्यात एखादी गोष्ट पटवण्यासाठी तसेच दुसरे उदाहरण दिले जाते.

43) **संदर्भ :-** वरील कवितेची ओळ माहेरची वाट, कवयित्री - इंदिरा संत, पुस्तकाचे नाव - गर्भ रेशीम

स्पष्टीकरण :- माहेराला जाणारी वाट ही किती चांगली व सुखदायी आहे त्या वाटेवर निळी मलमल अंथरलेली आहे ती वाट नाजूक आहे आनंददायी आहे.

44) **संदर्भ :-** वरील कवितेची ओळ माहेरची वाट, कवयित्री --- इंदिरा संत, पुस्तकाचे नाव--- गर्भ रेशीम

स्पष्टीकरण :- माहेरच्या वेशीवर कडूलिंबाचा मोहर पावलावर ढाळतो त्या मोहराचा सुगंध माहेरवाशींच्या डोळ्यांच्या पापण्यावरून दरवळला जातो.

45) **संदर्भ : -** वरील कवितेची ओळ माहेरची वाट, कवयित्री - इंदिरा संत, पुस्तकाचे नाव - गर्भ रेशीम

स्पष्टीकरण :- माहेरविशिण आईला भेटण्यास जाते तेव्हा आईच तेथे येते. तिने आपल्या लेकीची ओटी फळाफुलानी भरली आशीर्वादाच्या अक्षता डोक्यावर टाकल्या

V. खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

46) माहेराची वाट निळ्या मलमली सारखी नाजूक इतकी मऊ की पिवळ्या रंगाची पिसोळी त्या वाटेवर जाताना त्रास होत नाही. ती अलगद सहज जाते. वाट अशी की, तिचे माहेर अगदी जवळ वाटते तिला माहेराच्या वाटेवरील वेशीवरला कडुलिंब दिसतो. त्याचा मोहर पावलावर पडतो. त्याचा दरवळ पापण्यावरून दरवळतो. माहेरची वाट अत्यंत आनंददायी आहे.

47) सासुरवाशीण आईला भेटायला जाण्यासाठी तयार होते. तेवढ्यात तिची आईच तिला भेटण्यास येते. मन भरून येते.तिला आनंद होतो. आई चंद्रकोरीच्या कुंकवाच्या करंड्यातील कुंकू लेकीच्या कपाळी लावते. तिची फुलांनी ओटी भरते डोक्यावर अक्षता टाकून अखंड सौभाग्यवती हो असा आशीर्वाद देते. डबडबूनआलेल्या डोळ्यांनी तिच्याकडे पाहत लेकीचा निरोप घेते पुन्हा माहेरपणासाठी येण्यास सांगते.

48) पूर्ण नाव इंदिरा नारायण संत. नामवंत कवयित्री. शिक्षण कोल्हापूर व पुणे वास्तव बेळगाव.
काव्यसंग्रह- सहवास,शेला, मेंदी, मृगजळ, रंगबावरी, बाहुल्या, मृण्मयी, गर्भरेशीम, चित्कळा, वंशकुसुम, निराकार
कथासंग्रह -- श्यामला, कदली, चैतू
आत्मकथन पर ललित गद्य संग्रह --मृदगंध
साहित्य विषयक लेखन-- मालनगाथा, घुंगुरवाळा,
गर्भ रेशीम काव्यसंग्रहाला साहित्य अकादमी व जनस्थान पुरस्कार मिळाला आहे.

49) माहेरची वाट या कवितेतून इंदिरा संतांनी माहेरपणासाठी आणि आपल्या आईला भेटण्यासाठी आतूर झालेल्या सासुरवाशीणीच्या भावनांचे चित्रण केले आहे.ही भावकविता आहे सासुरवाशींना माहेरची वाट अत्यंत जवळची वाटते. निळ्या मखमली सारखी मऊ वाटते. डोळे उघडताच माहेराच्या गावच्या वेशीवरचा कडुनिंबाचा मोहर पावलावर ढाळतो. मोहराचा सुगंध पापण्यावर दरवळतो.

50) सासुरवाशींण माहेरी जाण्यास निघते तोच तिची आई तिला भेटण्यासाठी येते. असा भास होतो आई लेकीचे स्वागत करून आपल्या चंद्रकोरीच्या कुंकवाच्या करंड्यातून मुलीच्या कपाळी चंद्रकोर लावते. मुलीची फळाफुलानी ओटी भरते. डोक्यावर आशीर्वादाच्या अक्षता टाकून तुझे सौभाग्य अखंड राहो असे सांगते. डडबडबलेल्या डोळ्यांनी लेकीचा निरोप घेऊन पुन्हा माहेरपणाला येण्यास सांगून तिचा निरोप घेते.

पद्य 12
पाखरांनो तुम्ही

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) ब) रमेश तेंडुलकर
2) अ) सत्यकथा
3) क) कीर्ती
4) ड) सामाजिक कविता
5) क) सायरनचे
6) क) ऑल क्लिअरचे
7) ड) नभ
8) ब) माणसांचे

II. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा संबंध लिहा.

9) सप्तमी विभक्ती तत्पुरुष समास.
10) सराव .
11) प्रत्येक दिवस.
12) झाड .

III. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

13) सायरन म्हणजे धोक्याची सूचना देणारा ध्वनीक्षेपक (भोंगा).
14) आकाश स्वच्छ निरभ्र आणि निळे आहे .
15) हवेमध्ये सायरांचे (भोंग्याचे) ध्वनीक्षेपकाच्या साह्याने उंच आवाजाची सुरांची कंपने आहेत.
16) कवीने पाखरांना उद्देशून ही कविता लिहिली आहे.
17) पाखरांना सायरने ध्वनीक्षेपकाच्या साह्याने कर्कश सुरत केलेल्या सुरांची सवय झाली असेल .

IV. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

18) सायरनचे स्वच्छ, निळ्या आकाशात सूर (आवाज) पसरतात. त्या आवाजाच्या उठणाऱ्या लहरीने पांखरे उंच जातात तसाच उंच आवाजाचा परिणाम होतो. त्यातील धोक्याचे इशारेही त्या पाखराना समजतात. कारण ती सवय बनली आहे.
19) कवीची रोजची तालीम-सराव-सायरन ऐकून त्याबरहुकूम घड्याळ लावणे. त्या घड्याळ्याच्या वेळेवर त्याला कामे करायची असतात. तेव्हा धोका केव्हा आहे केव्हा संपतो त्याप्रमाणे पुढील कामांचे नियोजन त्याला करायचे असते.

V. संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

20) "हवेत चढत जातात त्या सुरांची उंच उंच कंपनने "

संदर्भ :- वरील पद्यचरण कवी रमेश तेंडुलकर यांच्या 'पाखरांनो तुम्ही' या कवितेतील आहे. ही कविता जून १९७७ च्या सत्यकथा मासिकातून घेतली आहे.

स्पष्टीकरण :- कवीने सायरनच्या ध्वनीक्षेपण यंत्राद्वारे जोराने उंच आभाळात पाठविलेले कर्कश स्वर (सूर) त्यांची कंपने, वरवर चढत जातात. हे पाखरांनो या कंपनांचा तुमच्यावर कोणता परिणाम होतो? त्यांचा अर्थ तुम्हाला कळतो काय असे कवी विचारतो.

21) "पाखरांनो तुम्हालाही आता याची सवय झाली असेल ..."

संदर्भ - वरील काव्याची ओळ 'पाखरांनो तुम्ही' या कवितेतील आहे. १९७७ च्या सत्यकथा मासिकाच्या जूनच्या अंकातून घेतली आहे.

स्पष्टीकरण - कवी रमेश तेंडुलकर यांनी हीयुद्ध्यजन्य परिस्थितीमुळे होणाऱ्या सायरनच्या (भोंग्याच्या) आवाजाचा माणसाबरोबरच पक्षांवरही कसा होत असावा या कल्पनेने लिहिलेली आहे. सायरनथ्या आवाजावरून कवी आपले घड्याळ लावून रोजच्या जीवनात केव्हा काय करायचे हे जसे ठरवतों तसाच परिणाम या पाखरावरही झाला असेल. त्याचा परिणाम झाला असेल असे

VI. खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

22) कवीने पाखरांना कोणकोणते प्रश्न विचारले आहेत ?

उत्तर :- कवीने पाखरांना माणसासारखीच सवय झाली आहे काय? सायरनचे (भोंग्याचे) सूर जेव्हा आकाशात दूर दूर पसरतात तेव्हा पाखरे कोठे असतात ? कोठे जातात? 'ऑल क्लिअर' सारखे भोंग्याने दिलेले इशारे पांखरांना कळतात, उमगतात काय ? आम्ही ज्याप्रमाणे जीवनसंघर्षाची तयारी रोजच करतो तशीच तुम्हीही करता काय? कामाला जाण्यासाठी आम्ही जशी घड्याळे लावतो त्याप्रमाणे पाखरांनो तुम्ही काय करता? असे अनेक प्रश्न विचारले आहेत.

23) सायरन चे सूर ऐकल्यावर माणसे कोणती प्रतिक्रिया व्यक्त करतात ?

उत्तर :- युद्ध्यजन्य परिस्थितीमुळे माणसांना आता सायरनच्या भोंग्यांच्या वेगवेगळ्या सुरावटीची सवय झाली आहे. स्वच्छ निळ्या आकाशात सूर पसरल्यावर त्यांचे इशारे जे चांगले किया धोकादायक आहेत ते रोजच्या सूरामुळे समजतात. सायरनच्या 'ऑल क्लिअर'चा अर्थ धोका संपला असे समजून माणूस आपले घड्याळ लावून आपल्या कामावर केव्हा कसे जायचे ते ठरवतो. अशात-हेने सायरनचा (भोंग्याचा) आवाज ऐकून माणूस वागतो.

VII. खालील प्रश्नांची आठ ते दहा वाक्यात उत्तरे लिहा.

24) उत्तर :- कवी म्हणतो सध्याच्या युद्ध्यजन्य पर्यावरण प्रदूषणाने मानवांची जीवन-अवस्थाच बिघडली आहे. मग निसर्गातील पक्षांची स्थिती काय होणार? म्हणूनच तो पाखरांना विचारतो की तुम्हालाही आम्हां मानवासारखीच मोठ्याने आणि वेगवेगळ्या सूरात वाजणाऱ्या सायरनच्या (भोंग्याच्या) सुरावटीने तुमच्याही जीवनप्रणालीवर परिणाम केला आहे. त्याने या पाखरांना भोंग्याचे उंच उंच जाणारे स्वर तरंग ऐकून तुम्ही कुठे जाता? काय करता? कुठे लपता? त्याने दिलेले धोक्याचे आणि धोका संपल्याचे इशारे ऐकून तुम्ही देखील तुमच्या कामाच्या घड्याळाचे काटे फिरवता काय ? ते कसे जमते? असे अनेक प्रश्न पाखरांना विचारले आहेत. आम्हां मानवावर या भोंग्यांच्या सुरावटीचा झालेला परिणाम त्यामुळे त्यांचे जीवनमान बदलले. त्याचप्रमाणे प्रदूषणाने या पृथ्वीतलावरील प्राणी, पक्षी, मानव यांचेही बदलले आहे असे कवीने म्हटले आहे.

पद्य 13

जग बदल घालुनी घाव

I. खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.

1) अण्णाभाऊ साठे
2) बंधुभाव
3) दलित कविता
4) वाटेगांव
5) शब्दयोगी अव्यय

II. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा संबंध लिहा.

6) अण्णा भाऊ साठे
7) दलित कविता
8) बंधुभाव
9) दुराचार
10) त्रैमासिक

III. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

11) जग बदल घालुनी घाव असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगून गेले आहे.
12) ऐरावत
13) धनवंतानी दलितांना अखंडळले पिळले असे कवी म्हणतो
14) मगराने माणिक गिळले होते.
15) घाव, भीमराव, छळले, पिळले, कलांकित, अंकित
16) वाटेगांव हे सांगली जिल्हातील आहे.
17) लोकनाट्य चळवळीचे प्रमुख आधार स्तंभ म्हणून अण्णा भाऊ यांना ओळखले जाते
18) एकजुटीच्या रथावर आरूढ होऊ असे कवी म्हणतो

IV. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

19) दलितांना धनवान लोकांनी आर्थिक शोषण करून त्रास दिला. धर्मांध लोकांनी त्याना छळले आणि त्यांचे, स्वातंत्र्य हिरावून घेतले समाजातील उच्चवर्गीय लोकांनी त्यांना शिक्षण नौकरी अणि चांगल्या संधीपासून वंचित ठेवले

20) परिचय -

पूर्ण नांव - अण्णा भाऊ साठे

जन्म - 3 आगष्ट

मृत्यू - 18 जुलै 1969

जन्मगाव वाटेगाव

विशेष माहिती

(1) अनेक कादंब-यावर त्यांचे चित्रपट निघाले आहेत.

(2) पहिले दलित साहित्य संमेलन ते अध्यक्ष होते.

21) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, दलितांना शिक्षण, संघटन आणि संघर्षाचा मार्ग सांगतात त्यांनी स्वतःच्या हक्कासाठी प्रयत्न करावा आणि अन्यायाविरुध्द संघर्ष करावा असा सल्ला देतात.

22) लक्षणे-

वरील ओळीत उत्प्रेक्षा, अलंकार आहे.

उत्प्रेक्षा, अलंकार - उपमेय जणू उपमानच आहे असे ज्यांमध्ये वर्णन केले आहे तेव्हा उत्प्रेक्षा अलंकार तयार होतो.

V. खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.

23) दलितांचे जगणे अत्यंत हालाखीचे अपमानस्पद आणि शोषणयुक्त होते त्याना शिक्षण हक्क, आर्थिक स्वातंत्र आणि मानवी सन्मान समाजाने त्यांच्यावर अनेक निर्बंध लादले होते आणि त्यांना कायम दुय्यम वागणूक दिली जात होती.

24) डॉ आंबेडकर दलिताना शिक्षाणाचा अवलंब करावा, स्वत्तःच्या हक्काची जाणीव ठेवावी आणि परंपरागत गुलामगिरीतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करावा असे सांगतात त्याना आत्मसन्मान जपण्याचा आणि अन्यायाविरुध्द संघर्ष करन्याचा सल्ला देतात.

25) दलितानी, आपले अपमानास्पद जीवन सोडून नव्या संघर्षशील जीवनाची सुरुवात करावी त्यांना शिक्षण, स्वाभिमान आदर आणि एकजुटीच्या जोरावर नव्या महाराष्ट्राच्या निर्मितीमध्ये योगदान द्यावे.

26) **संदर्भ -** वरील कवितेच्या ओळी अण्णा भाऊ साठे यांच्या "जग बदल घालूनी घाव" या कवितेतिल आहेत

स्पष्टीकरण - या ओळीमध्ये कवी अण्णा भाऊ साठे यांनी दलितांच्या शोषणाचे वर्णन केले आहे

27) **संदर्भ -** वरील कवितेच्या ओळी अण्णाभाऊ साठे यांच्या "जग बदल घालुनी घाव" या कवितेतील आहेत

स्पष्टीकरण - या ओळीतून कवी दलितांना एकजूट होऊन अन्यायाविरुध्द लढा देण्याचे आवाहन करतान संघटितपणे पुढे गेल्यास नव्या महाराष्ट्राची निर्मिती शक्य होईल. त्याचा उद्देश समाजात समानता आणण्याचा आहे

VI. खालील प्रश्नांची आठ ते दहा वाक्यात उत्तरे लिहा.

28) कवितेचा सारांश

" जग बदल घालूनी घाव ही कविता सामाजिक परिवर्तनाचे महत्व पटवून देणारी आहे. कवी अण्णा भाऊ साठे यांनी या कवितेत दलित समाजाच्या शोषणाचे वर्णन केले आह समाजातिल धनवान आणि धर्मांध लोकांनी त्यांना आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या गुलाम बनवले. मात्र, डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या प्रेरणेतून दलित समाजान शिक्षण, एकजुट आणि संघर्ष यांच्या जोरावर आपले स्थान निर्माण करावे त्यासाठी संघटित होऊन नव्या महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी प्रयत्न करावेत, असे कवी या कवितेतून सांगतात.